# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

**मुख्य कार्यालय : ८५५, बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणे ४११ ००२.**

**दूरध्वनी क्रमांक : ४४५९१५–१६–१७** | **तारेचा पत्ता : “ सेन्को बँक ”**

दिनांक ३१–१–१९८६ अखेर आर्थिक स्थितीचे बोलके आकडे ( रुपये लाखात )

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | ५४६.४७ |
| ठेवी | १०९३३.१४ |
| निधी | ५६९.०५ |
| कर्ज | ५४३७.९३ |
| खेळते भांडबल | १४०४४.६० |

**—: आमची वैशिष्टचे :—**

पुणे जिल्हचात एकूण १५४ शाखांचा विस्तार चालू, बचत, आवर्तक या शिवाय मुदतबाढ ठेव, आपोआप मुदतवाढ, मासिक उत्पन्न ठेव या बचतीच्या आकर्षक फलदायी योजना, पुनर्गुंतवणूक ठेव योजना अर्थात दामदुप्पट योजना. व्याजाचा आकर्षक दर, बँकींगच्या सर्व सुविधा, सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय ( मुख्य कचेरीसह ४० शाखा ) मुख्य कचेरीसह १३६ शाखांमध्ये सोनेतारण कर्ज व्यबहाराची सोय.

शेती, बिगरशेती, लघुउद्योग बगैरे व्यबसायांना कर्जपुरवठा करून राष्ट्रीय उत्पादन वाढबिण्यात अग्रेसर असणाऱ्या बँकेची मुख्य कचेरी अगर नजिकच्या शाखेत गुंतबणूक करून राष्ट्रीय कार्यास हातभार लावा.

**—: संचालक मंडळ :—**

मा. चंद्रकांत निबृत्ती जगताप, अध्यक्ष
मा. साहेबराब माधवराव सातकर, संचालक
मा. राजेंद्रकुमार बाबुराव भोलप, संचालक
मा. दत्तात्रय तात्याबा ढमढेरे, संचालक
मा. गोपाळ गोविंद गोसावी, अॅडव्होकेट, संचालक
मा. बाबुलाल साहेबराव काकडे, संचालक
मा. शिवाजीराव जगन्नाथराब भोसले, संचालक
मा. महादेव खंडूजी टापरे, संचालक
मा. संभाजी नरहरी टकले, संचालक
मा. भगवानराव साहेबराव काकडे, संचालक
मा. डॉ बामनराव रामकृष्ण कोरपे
शिखर बँक प्रतिनिधी
मा. सुधीर देवराम ठाकरे
जिल्हा उपनिबंधक सह. सं. शासनप्रतिनिधी

मा. रमेशराव किसनराव थोरात, उपाध्यक्ष
मा. शिवाजीराव महादेव काळे, संचालक
मा. रघुनाथराव शंकरराव सातकर संचालक
मा. रमेशचंद्र शंकरराव ढमाले, संचालक
मा. राजाराम लक्ष्मण कुसाळकर, संचालक
मा. जयसिंगराब यशवंतराब जेधे संचालक
मा. आ. अशोकराव नामदेवराव मोहोळ, संचालक
मा. नारायणराव महादेवराव हिंगे, संचालक
मा. दिलीप दत्तोबा लोहकरे, संचालक
मा. सुनिल राजाराम कुसाळकर, संचालक
मा. सदाशिवराब गणपतराव झेंडे
अध्यक्ष, पुणे जिल्हा परिषद, पुणे प्रतिनिधी
मा. यशबंत अनंत प्रधान, व्यबस्थापक

**सर्व सामान्य जनतेच्या विश्वासाची व जिव्हाळयाची एक अग्रगण्य जिल्हा बँक**



प्रकाशक : प्राचार्य डॉ. जे. के. गोधा, एम्. कॉम्., बी. ए. एल्एल्. बी , पीएच्. डी.

मुद्रक : अनेकान्त मुद्रणालय, बारामती ( पुणे )


# अनेकान्त

## १९८६-८७

## अंक २५ वा




तुळजाराम चतुरचंद महाविद्याल[य]
बारामती जि. पुणे

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती (पुणे)

### गव्हर्निंग कौन्सिल

अध्यक्ष– श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद, बी एस्सी. अर्थशास्त्र (लंडन)– मुंबई
उपाध्यक्ष– श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा, बारामती
सचिव– डॉ. वर्धमान माणिकचंद कोठारी, डो. ए. एस्. एफ्. (मुंबई)– बारामती
खजिनदार– श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, बारामती

**–:सभासद:–**

श्री. माणिकचंद जयकुमार चवरे, कारंजा
श्री. विमलचंद माणिकचंद गांधी, सोलापूर
श्री. विलास गौतमचंद शहा. बीं. ए. एल् एल् बीं.– सोलापूर
श्रीं. जीं. के. पाटील, एम्. ए. एल्. एल् बी.– इनामधाणी, सांगली
श्री. शिवलाल प्रेमचंद शहा (लेंगरेकर). बारामती
श्री. मोतीचंद फुलचंद शहा. बारामती
श्री. माणिकचंद ज. भिसीकर, एम्. ए., न्यायतीर्थ,– बाहुबली
श्री. मोतीलाल तुळजाराम शहा, बारामती
श्री. राजकुमार तुळजाराम शहा, बी. ए. एल्. एल्. बी.– बारामती
श्री. आमगोंडा आ. पाटील, जयसिंगपूर
श्री. जयपाल भूपाल झेले, जयसिंगपूर
प्राचार्य डॉ. जे. के. गांधा, एम्. कॉम्., बी. ए एल् एल्. बी. पीएच्. डी.– बारामती } पदसिद्ध
प्राचार्य डॉ. आर. टी. अक्कोळे, एम्. ए. पीएच्. डी.– जयसिंगपूर } सभासद

**निमंत्रित सभासद**

श्री शशिकांत शिवलाल शहा (लेंगरेकर) बी. ए. बारामती
श्री. पी. पी. लोहाडे, बी. कॉम., एफ. सी. ए . चार्टर्ड अकौन्टन्ट– पुणे
श्री. रत्नाप्पा कुंभार, बी. ए – कोल्हापूर
श्री. नलिनचंद्र फुलचंद गांधी. पुणे
श्री गौतमचंद गुलाबचंद शहा, बारामती
श्री. पो. बी. पाटील, अध्यक्ष, स्थानिक समिती, जयसिंगपूर

लाखो उमलत्या मराठी मनांची मशागत करून
शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारक प्रयोग करणारे
महाराष्ट्राचे द्रष्टे शिक्षणमहर्षी



**पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील
यांच्या जन्मशताब्दी निमित्त
शतशः विनम्र अभिवादन !**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः
अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

# अनेकान्त

वार्षिक नियतकालिक
(वरिष्ठ)
अंक पंचविसावा १९८६-८७

---

संपादक मंडळ

❊ अध्यक्ष
**प्राचार्य डॉ. जे. के. गोधा**

❊ सहाय्यक
**प्रा. एस्. आर्. नवाथे**
**प्रा. डॉ. के. एम् सुर्वे**
**प्रा. के. एस्. अय्यर**
**प्रा. कु. एम्. डी. वैद्य**
**प्रा. टी. डी. यादव**

प्रमुख संपादक
**प्रा. धनंजय शहा**

विद्यार्थी प्रतिनिधी
**कु. आशा रंगनाथ गोसावी**

# अनुक्रम


संपादकीय, — एक

मनोगत, — दोन

अनुचिंतन, — तीन

भावपूर्ण श्रध्दांजली, — चार

कॉमनवेल्थ देशातील शैक्षणिक पद्धती — पाच

**मराठी विभाग**

**चार कथा** :. कर्मण्येऽवाधिकारस्ते / विवेक ध. पांडकर / (६) .कैफियत एका प्रिन्टकराची / दस्तगीर मुल्ला (१२) .पूर्ती– शेंडगे व्ही. एस. / (१८) .घर / पवार शरदचंद्र बबनराव / (२१)

**लेख** :.कर्मवीरांची जीवन गाथा / दिलीप शिंदे (१) .राष्ट्रीय एकात्मता / मचाले पी एल्. (४).साक्षरता: एक जन आंदोलन / प्रमोद एल्. धुमाळ / (९) .आजचा तरुण म्हातारा आहे / जगताप विजयकुमार व्ही / (१४) .नामधारी सत्य / स्व. शिरीषकुमार लोंढे / (१६)

**एक ललित लेख**: .प्रिये पहा /कु. ज्योती मरकळे / (२०)

**एक साहस यात्रा वृत्त**: .प्रत्येकाने घ्यावा असा अनुभव : ट्रेकिंग / लक्ष्मीकान्त रोहाणी / (२३)

**अकरा कविता**: .एक फटका /कुसुमाग्रज / (२६) .यातना / कु लता रंगनाथ गोसावी /(२७). अश्रूंची लाट/ सुपेकर जयवंत /(२७) .कविता/ ज्योती मरकळे /(२८).वेदना / राजकुमार बाफना/(२८).लोकनीति/प्रदीप कदम/(२९).सवाल/ शेलार आर. पी. /(२९). पाऊलखुणा/संदीप सुभेदार /(२९) .रिकाम्या कपबश्या /सुनिल खडके /(३०)/ .रजनी /कु. शैला गायकवाड /( ३०) अखेर / दस्तगीर मुल्ला (३०)

**हिंदी विभाग**

**परिचय** :.राष्ट्रकवि मैथिलीशरण गुप्त /कांवळे विजयकुमार किसन /(३१)

**कहानी** :.ऑचल/ जाधव डी. टी. /(३३)

**चार कविताएं**: .तमन्ना/ अनिल पानसे /(३५) .कबिता /क्षितिजा ब. शहा/(३५) .सजा / रमेश एस. बगाडे/(३५) .गुजरा हुआ जमाना /सुपेकर जयवंत/(३६)

**ENGLISH SECTION**

.Computers /Jadhav S. S. /(37) .India Today / Deshpande U. S./(39) .Science .Past, Future & Present/ Miss Sunita Kulkarni /(41).

**Poems**: .The Image of Love /Gaikwad B. D. /(43) .Living a Full Life/ Adesh Shah/(44)

.कार्यवृतांत / (४५ते ५५) .प्राध्यापकाने अभ्यासेतर उपक्रम/ (५५), .प्रगतीची वाटचाल / (६२) .सूची विभाग /(५६ते ६१).


**अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती**

## लोकल कमिटी

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा | (चेअरमन) | १०) श्री.श्रीमल गुलाबचंद गुगळे | (सभासद) |
| २) डॉ वर्धमान माणिकचंद कोठारी | (सचिव) | ११) श्री. माणिकलाल रूपचंद शहा | (सभासद) |
| ३) श्री. मोतीचंद फुलचंद शहा | (खजिनदार) | १२) श्री. विलास माणिकचंद शहा | (सभासद) |
| ४) श्री. शशिकांत शिवलाल शहा | (खजिनदार) | १३) श्री. अरहुतदास हिराचंद शहा | (सभासद) |
| ५) श्री. माणिकलाल तुळजाराम शहा | (सभासद) | १४) श्री. माणिकलाल छगनलाल मुथा | (सभासद) |
| ६) श्री. खुशालचंद रतनचंद छाजेड | (सभासद) | १५) श्री. विलास दिपचंद शहा | (सभासद) |
| ७) श्री. भोगीलाल गुलाबचंद शहा | (सभासद) | १६) श्री. राजकुमार तुळजाराम शहा | (सभासद) |
| ८) श्री. पवनलाल गंगाराम गांधी | (सभासद) | १७) प्राचार्य डॉ. जे. के. गोधा | (पदसिद्ध सभासद) |
| ९) श्री गौतमचंद गुलाबचंद शहा | (सभासद) | १८) श्री. व्ही. एम. शहा,इंजिनिअर | (निमंत्रित) |

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**

## लोकल मॅनेजिंग कमिटी – १९८५ ते ८८

अध्यक्ष– श्री. जंबुकुमार चंदुलाल शहा — सचिव– प्रा डॉ जे. के गोधा

**सभासद**

१) श्री. विनोदकुमार रंगीलदास गुजर
अध्यक्ष, बारामती नगरपरिषद, बारामती
उपाध्यक्ष, विद्या प्रतिष्ठान, बारामती, जि. पुणे

२) श्री. राजेंद्रकुमार घोलप
चेअरमन, छत्रपती सहकारी साखर कारखाना लि. भवानीनगर ता. इंदापूर, जि. पुणे

३) श्री चंद्रराव कृष्णराव तावरे
चेअरमन, दि. माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. शिवनगर, ता. बारामती, जि. पुणे

४) श्री. भगवानराव साहेबराव काकडे, (निवृत्त)
प्रतिनिधी, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. पुणे

५) श्री. दिनकरराव (अप्पासाहेब) गोविंदराव पवार
अध्यक्ष, कृषिविकास प्रतिष्ठान, बारामती, जि. पुणे

६) डॉ. व. मा. कोठारी, बारामती

७) श्री. माणिकलाल तुळजाराम शहा, बारामती

८) श्री. शशिकांत शिवलाल शहा, बारामती

९) श्री. मोतीचंद फुलचंद शहा, बारामती

१०) श्री. खुशालचद रतनचंद छाजेड, बारामती

११) प्राध्यापक प्रतिनिधी–
१) प्रा. एस् आर. नवाथे, एम. एस्सी.
२) प्रा. एस्. पी. कदम, एम् ए. एम्. एड्.

१२) शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी–श्री. धन्यकुमार वालचंद शहा

## वरिष्ठ महाविद्यालय स्टुडंट मॅनेजिंग कमिटी,

१) अध्यक्ष — प्राचार्य डॉ. जे. के. गोधा

२) उपाध्यक्ष —
१) प्रा. डॉ. के. एम. सुर्वे
२) प्रा. डी. एस. शहा

३) नियुक्त प्राध्यापक —
१) प्रा. बी. बी. पाटील
२) प्रा. ए. एस. किणिगे
३) प्रा. एस. पी. कदम
४) प्रा. इ. के. पाटील
५) प्रा. ए. के. इसराणा

४) वर्ग प्रतिनिधी व तुकडी प्रतिनिधी

| अ. नं. | नाव | वर्ग |
|---|---|---|
| १) | श्री. ओगले सुरेश तुकाराम | एफ. वाय. बीं. ए. – अ |
| २) | श्रीं. कोकरे लालासो भिवाजीं | एफ. वाय. बीं. ए. – ब |
| ३) | श्रीं. बनकर अनिल ज्ञानदेव | ,, – क |
| ४) | श्रीं. तावरे सुरेश मुरलींधर | एस. वाय. बीं. ए. – अ |
| ५) | श्रीं. मेहत्रे रामचंद्र विठ्ठल | टीं. वाय. बी. ए. – अ |
| ६) | श्रीं. चव्हाण सूर्यकांत पांडुरंग | ,, – ब |
| ७) | श्रीं झांबरे कल्याण महादेव | एफ. वाय. बीं. एस्सी |
| ८) | श्री नेवसे अजय वासुदेव | एस. वाय. बी. एस्सी |
| ९) | श्री बडवे जयंत काशिनाथ | टी. वाय. बी. एस्सीं |
| १०) | श्री नेवसे अमोल रामभाऊ | एफ. वाय. बी. कॉम– अ |
| ११) | श्री मदने धनंजय मल्हारीं | ,, ब |
| १२) | श्री कोकरे हनुमंत नामदेव | ,, क |
| १३) | श्री धवडे भानुदास वामनराव | एस वाय. बी. कॉम– ब |
| १४) | श्री जगताप मुरलीधर विनायक | ,, क |
| १५) | श्री रत्नपारखी विजय वसंतराव | टी. वाय. बीं. कॉम – अ |
| १६) | श्री. धुमाळ प्रमोद लक्ष्मण | ,, ब |
| १७) | श्री. बागवान राजमहंमद शहाबुद्दीन | ,, क |
| १८) | श्री. सुरवडे विजयकुमार रामकृष्ण | एम. कॉम. |
| १९) | श्री. पोंदकुले शिवाजी हरिभाऊ | एम. कॉम. |
| २०) | श्री. गावडे शिवाजी किसन | एम. ए. |

## जिमाखाना मॅनेजिंग कमिटी ( सन १९८६-८७ )

| | |
|---|---|
| १) अध्यक्ष– | प्राचार्य डॉ. जे. के. गोधा |
| २) जिमाखाना चेअरमन | प्रा. ए. एस. किर्णिगे |
| ३) फिजिकल डायरेक्टर | प्रा. ए. एस. मेहेर |
| ४) नियुक्त प्राध्यापक सदस्य | १. प्रा. एस. बी. इंगवले<br>२. प्रा. सौ. एन. ए. पाटील |

### विद्यार्थी प्रतिनिधी

| | | |
|---|---|---|
| ५) क्रिकेट– | श्री. डी. बी. गुजर | एम. ए. ( इतिहास ) |
| ६) इंडियन गेम्स– | श्री. ए. डी. सातव | टी. वाय. बी कॉम |
| ७) अॅथेलेटिक्स– | श्री. एस. के. टकले | टी. वाय. बी. ए. |
| ८) आय. सी. एस. आर.– मुले | श्री. झगडे एस. पी | एम. वाय. बीं. ए. |
| ९) आय. सीं. एस. आर.– मुलीं | कु. एस. पीं. फरसोले | टी. वाय. बी. ए. |

### इतर पदे (विद्यार्थी-विद्यार्थिनी

| | | |
|---|---|---|
| १) विद्यार्थिनीं प्रतिनिधी | कु. धुमाळ सुनिता दशरथ | टी. वाय. बी. कॉम |
| २) वादविवाद प्रतिनिधी | कु. मरकळे ज्योती शंकर | एम ए, (मराठी) |
| ३) नियतकालिक प्रतिनिधी | कु गोसावी आशा रंगनाथ | एम. कॉम. ६२ |
| ४) ग्रंथालय प्रतिनिधी | श्री. कोकरे लक्ष्मण माधवराव | एस. वाय. बी. ए. |
| ५) सहल प्रतिनिधी | श्री. झगडे राजेंद्र रामचंद्र | एस. वाय बी ए. |
| ६) सांस्कृतिक कार्यक्रम प्रतिनिधी | श्री आंबेकर चंद्रशेखर नारायणराव | एम. वाय. बी. ए. |

# संपादकीय–

मित्रहो,

'अनेकान्त' चा २५ वा अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. महाविद्यालयाच्या विकासोन्मुख जीवनातील एक महत्वाचा टप्पा आपण आता गाठला आहे. जडण घडणीचा काळ आता संपतोय व संस्थेच्या नव्या कर्तृत्वाचा, तरुणाईचा कालखंड सुरु होतोय.

आजवरच्या संस्थेच्या उभारणीत मनात जी स्वतःची विशिष्ट दृष्टी व ध्येयधोरणे जोपासलीत. त्यांना साकार व सप्रत्यय करण्याचा कालखंड आता समोर येतोय.

तसं पाहिलं तर, एका उजाड माळावरील जुन्या वास्तूत प्रारंभ झालेल्या या महाविद्यालयाचं आजचं रूप मोठं देखणं व कुणाच्याही नजरेत भरण्यासारखं आहे. एकामागून एक इमारती उभ्या राहिल्या. नवनव्या योजना हिरिरीने राबविल्या, अद्ययावत् साधनसामुग्रींनी सुसज्जता आणली आणि साऱ्या परिसराचे रंगरूपच पालटून गेले.

याकामी संस्थेच्या उभारणीचे कौशल्य अवगत असणाऱ्या व निर्माणशील व्यक्तिमत्व असलेल्या कुशल प्राचार्यांच्या सुदीर्घ काळातील नेतृत्वाचे स्मरण होणे जितके स्वाभाविक,तितकेच उदारदृष्टीच्या व शैक्षणिक मूल्यांविषयी कळकळ असणाऱ्या संस्थाचालकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणं आमचं आम्ही कर्तव्य मानतो. यावर्षी आपले युवक पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या नव्या शैक्षणिक धोरणाचा सूत्रपात केला व हे वर्ष आपल्या महाविद्यालयाच २५ वं वर्ष आहे, हा एक शुभयोगच आहे असं वाटतं.

एकविसाव्या शतकातला समृध्द व विज्ञानाभिमुख भारत निर्माण करण्याच्या क्रांतदर्शित्वातून हे नवे धोरण आखलं आहे हे लक्षात घेतलं तर आपल्याही भावी धोरणाची दिशा निश्चित नाही का होत ?

एकविसाव्या शतकाचे तुम्हीच खरे प्रतिनिधी आहात. त्यादृष्टीने आपल्या महाविद्यालयात कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स सारखे अद्ययावत शिक्षण मुद्दाम सुरु करण्यात आले आहेत. तसेच नव्या राष्ट्रीय, सामाजिक व नैतिक मूल्यांचा संस्कार व्हावा म्हणून प्रौढशिक्षण, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, राष्ट्रीय सेवा योजना इ. राष्ट्रीय स्तरातील कार्यक्रम उत्कृष्टपणे

कार्यान्वित करीत आहोत. हे सारं तुमच्याचसाठी. फक्त ज्ञानप्राप्ती हे शिक्षणाचे साध्य नव्हे. नव्या ज्ञानाच्या प्रेरणेतून नवा 'माणूस' घडला पाहिजे आणि हेही तुमच्याच हातात आहे. उद्याच्या जगात विज्ञानाचा स्फोट झाल्यावर 'मन'हीन मनुष्यांचा म्हणजेच यंत्रमानवांचा हा स्फोट होईल हे सुचविणारे मुखपृष्ठ मुद्दाम या अंकावर दिले आहे. सध्या शिक्षणक्षेत्रात कमालीची सार्वत्रिक गढूळता आली आहे. शिक्षणाला आत्यंतिक व्यावहारिक व व्यावसायिक स्वरुप आले आहे. अशावेळी आपले 'सत्व' व 'स्वत्व' न सोडता खऱ्या अर्थाने नव्या युगाचा प्रतिनिधी तुम्हाला व्हायचे आहे. याकामीं आपले महाविद्यालय तुमच्याबरोबर सदैव राहींल अशी ग्वाही २५ व्या वर्षानिमित्त आम्ही देवू इच्छितो

खरं तर,नव्या शैक्षणिक धोरणानुसार आपलं महाविद्यालय एक'स्वायत्त महाविद्यालय' बनण्याच्या योग्यतेचं आहे. पण सध्याची विद्यार्थी वर्गाची आत्यंतिक व्यावहारिक दृष्टी व कोणत्याही स्तरावरील नैतिकतेशी तडजोड करण्याची वृत्ती पाहता, हे स्वायत्त महाविद्यालयाचे आव्हान स्वीकारताना मन साशंक होत आहे. तुमच्या कृतीवरच आमची शक्ती अवलंबून आहे. म्हणून विद्यार्थ्यांना याप्रसंगी 'खरेखुरे विद्यार्थी व्हा' असे आवाहन आहे. यावर्षीच मा. प्राचार्य डॉ गोधा कॉमनवेल्थ मधील ब्रिटन, झिंबाब्वे, नायजेरिया, टांझानिया, केनिया, झांबिया आदि देशांचा व युरोपातील अन्य देशांचा यशस्वी दौरा करुन आले. तेथील विद्यापीठांची कार्यप्रणाली, तेथील शैक्षणिक समस्या व नवनवीन पद्धती यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांच्या या दौऱ्यातील ज्ञानाचा, अनुवाचा आपल्यालाही खूपच फायदा होणार आहे.

विशेष म्हणजे, 'कम्युनिटी कॉलेज' हा एक नवा प्रयोग या देशातून आढळून येतो. तो प्रयोग आपल्या महाविद्यालयाच्या दृष्टाने कसा राबविता येईल याचा सध्या विचार चालू आहे.

आता या अंकातील साहित्यविषयी थोडसं. आपल्या महाविद्यालयात लेखक, कथाकार,कवी यांची उणीव का भासते

कळत नाही. लेखन ही कला आहे. त्यासाठी साधना करावी लागते.ती करण्याची तयारी कुणाचीच दिसत नाही. या अंकातील साहित्याचा सर्वसाधारण दर्जा पाहता हे कोणालाही पटल्याशिवाय रहाणार नाही. त्या दृष्टीने नियतकालिक प्रतिनिधी कु. आशा गोसावी हिच्या मनोगताशी आम्ही सहमत आहोत.अनुकरणापेक्षा अनुभवांना शब्दात पकडण्याचा अभ्यास हवा. नव्या जाणीवा अभिव्यक्त करू इच्छिणाऱ्या लेखक-कवी मित्रांच्या सहकार्याशिवाय हा अंक कसा सिद्ध होऊ शकला असता ? खूप साहित्य आलं, पण सर्वांनाच या अंकात स्थान देता येणं शक्य नव्हतं. ज्यांचं साहित्य यात आलं नाही त्यांनी नाउमेद न होता सतत लिहीत रहावं.

या अंकाच्या तयारीत अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. विशेषतः प्राचार्य डॉ. जं. के. गोधा, अनेकान्त संस्थेचे पदाधिकारी, संपादक मंडळातील अन्य सदस्य व अनेकान्त मुद्रणालयातील सेवकवर्ग यांचा उल्लेख करणे उचित होईल या अंकातील ब्लॉक्स व मुखपृष्ट तयारकरुन उत्कृष्टपणे छपाई करण्याचे काम व्ही. जोशी आणि कं. ने केले त्यामुळे अंकाच्या सौदर्यात भर पडली आहे. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

प्रा. धनंजय शहा
प्रमुख संपादक

# माझे मनोगत

प्रिय, विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो,

नियतकालिक प्रतिनिधी या नात्याने सर्व नवागत लेखक, साहित्यकांचे प्रथम मी स्वागत करते.

यावर्षी हो फार मोठी जबाबदारी आपण सर्वांनी माझ्यावर सोपविली आणि ती शेवटपर्यंत मला पेलवेल किंवा नाही अशी शंका वाटली. परंतू आपल्या सर्वांच्या सहकार्याने मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकले. तसेच नियतकालिक संपादक प्रा. डी. एस. शहा यानी वेळोवेळी मार्गदर्शन करुन मला या क्षेत्रातील वाटणारा नवखेपणा अजिबात नाहीसा करून टाकला.

विद्यार्थ्यांनी दिलेले साहित्य केवळ डोळचा- खालून घालणे मला पटत नव्हते. तर त्याचा अभ्यसही आवश्यक होता. तसा प्रयत्न केला गेला आणि मला पहिली गोष्ट ही जाणवली की, कॉलेजच्या कॉरिडॉरमध्ये वावरणारे युवक किंवा युवती हे ज्या दैनंदिन वातावरणामध्ये वावरत असतात,रोजच्या ज्या अनुभवाला सामोरे जात असतात, आणि त्यांच्या अवतीभोवती ज्या दर्जाच्या व्यक्ती वावरत असतात या सर्वातूनच त्यांचे साहित्य निर्माण होत असते. मग अशा युवक युवतींकडून दर्जेदार साहित्याची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे? त्यांच्या साहित्यामध्ये उतरलेला अनुभव हा कितीही कमी दर्जाचा असला तरी तो कोणत्या पद्धतीनें उतरला आहे हे पहाणे जास्त महत्वाचे आहे असे मला वाटते.

दुसरी गोष्ट म्हणजे मार्गदर्शनाचा अभाव. जेविद्यार्थी लिहितात ते लिहीत जातात. परंतु त्यांना कसे लिहावे, कोणते लिहावे आणि काय लिहावे याचे मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्ती अभावानेच आडळतात किंवा आढळतही नाहीत. त्याचाही परिणाम लिखाणावर झालेला दिसतो. त्याचबरोबर आजच्या युवकांमध्ये वाचनाचा अभाव दिसतो.किती पुस्तके वाचली याहीपेक्षा कोणती पुस्तकें आजचा युवक वाचतो हे महत्वाचे आहे आणि याच गोष्टीची जाणीव साहित्यात दिसली नाही.

साहित्याची निवड करताना कोणत्या गोष्टीला आधी प्राधान्य दयावे हे बऱ्याचशा विद्यार्थ्यांच्या लक्षात आले नाही वास्तविक पाहता श्री. म. माटे व कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्यामुळे त्यांच्यावर बरेच लेख यावेत अशी अपेक्षा होती. पण प्रत्यक्षात ज्या प्रमाणात लेख यायला पाहिजे होते त्या प्रमाणात ते आले नाहीत.

परंतु तरीसुध्दा काही विद्यार्थी लिहिताना दिसतात. हे कितीतरी आशादायक आहे. सर्व बाजूनी सर्व तऱ्हेची कुचंबणा होत असून देखील काही विद्यार्थी उत्साहाने लेखन करीत असलेले दिसतात काही जणांना आपण लिहलेले साहित्य छापून यावे असे प्रामाणिकपणे वाटते. यात गैर काहीच नाही. मानवी स्वभावाला ते धरुनच आहे. मोठे लेखकसुध्दा यातून सुटलेले नाहीत. (पान तींन वर पहा......)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती



# अनुचिन्तन

'अनेकान्त–दृष्टी' दैनंदिन व्यवहारात का व कशी आवश्यक आहे हे आपण गेल्यावर्षीच्या अंकात पाहिले.

या अनेकान्त–दृष्टीचे जितके सामाजिक व्यवहारात महत्व आहे तितकेच, किंबहुना त्यापेक्षा अधिक व्यक्ती-विकासासाठी तिचे महत्व आहे.

'अनेकान्त' ही जीवनाकडे पाहण्याची एक निखळ व वास्तव दृष्टी आहे. जीवनव्यवहारात आपण नेहमीच 'स्वतः'ला केन्द्रस्थानी मानूनच इतर सर्व गोष्टींचा विचार करीत असतो. त्यामुळे आपणाला 'स्वार्थी' सुद्धा म्हटले जाते. पण खऱ्या अर्थाने आपण'स्वार्थी' असतो काय? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

लाचलुचपत, भ्रष्टाचार, गुन्हेगारी इ. मार्गांनी आपण खूप कमावलं तरी त्यात 'खरं' काय कमावलं? केवळ काही जड अचेतन वस्तूंचाच आपण संग्रह केला. या वस्तू, ही सामुग्री, हा संग्रह कधी आपल्याजवळून नाहीशी होईल सांगता येत नाही.

या उलट अशा व्यवहारात आपण आपले 'स्व'त्वच गमावून बसतो. या जड देहातील 'मी' चे, 'स्व' चे खरे स्वरुप तरी कसे आहे? माणूस म्हणून आपल्याला लाभलेले ज्ञान, विवेकशीलता व त्यानुसार सदाचार प्रवृत्ती यांचाच आपण अशा व्यवहारात जाणीवपूर्वक त्याग करीत नाही काय? मग आपला 'स्वार्थ' साधला असे कसे म्हणता येईल?

आपलं गुणांचं मूल्य म्हणजेच 'स्व'चं मूल्य गमावून, ज्यांना आपणच 'खोटं मूल्य' प्रदान केलं आहे, अशा 'वस्तू'तच जीवनाचे मूल्य शोधणं कितपत योग्य आहे?

आपणाला येणारा हा सुद्धा अनुभव खराच आहे की जो आपल्या अंगचे सद्गुण पणाला लावतो तो टिकाऊ यश वा सुख मिळवितो. त्याला 'लौकिक' दृष्टीने सत्ता संपत्ती नाही मिळाली, तरी त्याच्या मनाला, आत्म्याला 'स्व'ला मिळालेल्या सुखासमाधानाचे मोल काही वेगळेच आहे.

'स्व'चा खरा शोध आपणाला केव्हा लागतो? जेव्हा 'पर' काय आहे,त्याचे खरे स्वरुप काय आहे हे समजावून घेतो तेव्हाच.

हा 'परा' च्या संदर्भात 'स्व'चा व 'स्व'च्या संदर्भात 'परा' चा विचार व विवेक, यालाच एका अर्थाने 'अने–कान्त दृष्टी' म्हणता येईल.

आपल्या व्यक्तिविकासाचे मूल्यमापन करताना जे 'आपले'नाही,'स्व'चे नाही–त्याला कितो महत्व द्यायचे?

आपल्या 'स्व'च्या गुणांचा विकास म्हणजेच खऱ्या अर्थानें व्यक्तीचा विकास म्हणता येंईल.

लौकिक अर्थाने 'स्वार्थ' म्हणजे आपल्या परावलंबित्वा-चीच अनेक उदाहरणे होत. खरा स्वार्थ साधायचा असेल तर स्व व पर याला सत्य स्वरुपात समजून घेणे आव–श्यक आहे.

जीवनव्यवहांरातील साऱ्या समस्यांचे मूळ यामुळेच नाहीसे होणार आहे, हे निश्चित

(पान दोन वरून ...)

जे विद्यार्थी लिहितात त्यांनी सातत्याने लिखाण चालू ठेवले तर त्यांच्या लिखाणामध्ये निश्चितच आमूलाग्र बदल घडून येण्याची शक्यता आहे. समर्थ रामदास स्वामींच्या मतानुसार, " दिसामाजी काहीतरी ते लिहावे, " हा मूलमंत्र लक्षात ठेवला तर एक सुंदर कलाकृती आपल्या हातून सहज घडून येईल असा आत्मविश्वास युवक युवतीनी ठेवायला काहीच हरकत नाही.

आपल्या लिखाणाला कोणीतरी नावे ठेवील, ते छापायला दयावे किंवा नाही असा न्यूनगंड न बाळगता बिन-धास्तपणे लिहीत रहा. हाच शुभसदेश नियतकालिक प्रतिनिधी या नात्याने सर्व युवक युवतींना देऊन आपल्या भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी सदिच्छा व्यक्त करून मी हा लेखनरूपी संवाद थांबविते. धन्यवाद !

**नियतकालिक प्रतिनिधी**
**कु. आशा रंगनाथ गोसावी एम. कॉम.**

# स्व. श्रीमती कुसुमबाई मोतीचंद शहा यांना भावपूर्ण श्रद्धांजली



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सन्माननीय सदस्या श्रीमती कुसुमबाई मोतीचंद शहा, मुंबई यांचे दुःखद निधन झाले हे कळविताना आम्हाला अत्यंत दुःख होत आहे.

आधुनिक भारताच्या औद्योगिक क्षेत्राचा भक्कम पाया घालणाऱ्या स्व. श्री. वालचंद हिराचंद या महान् उद्योगपतींच्या कर्तृत्वसंपन्न कन्या म्हणून स्व. कुसुमबाई या सर्वपरिचित होत्या.

आधुनिक भारताच्या उभारणीत, सक्रीय सहभागी होऊ शकतील अशा नव पिढीच्या निर्मितीत सतत प्रयोगशील अशा शैक्षणिक व सामाजिक संस्थाच्या उभारणीसाठी स्व. श्रीमती कुसुमबाईनी उदार अंतकरणांनी अमूप धनराशी दान केली आहे.

कंकुबाई श्राविकाश्रम, कारंजा, बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व बाहुबली विद्यापीठ, बाहुबली, ऐ. पन्नालाल दि जैन पाठशाळा सोलापूर, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, पुणे, कुसुमबाई मोतीचंद प्लॅनेटोरियम पुणे इ शैक्षणिक संस्था व कंकुबाई नेत्र चिकित्सालय, सोलापूर आदि सामाजिक संस्था त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील दूरदृष्टीची व आधुनिकतेची आजही कार्यक्षमरीत्या साक्ष देत आहेत.

धर्म, इतिहास, संस्कृती व साहित्य या सर्वच बाबतीतील त्यांची मूलगामी जिज्ञासावृत्ती व उच्च अभिरुची याचे प्रत्यंतर त्यांच्या संपर्कातील कोणाही व्यक्तीला आल्याशिवाय रहात नसे. त्यामुळे निरनिराळ्या संस्थांच्या कार्यपध्दतीवर त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाप पडलेली दिसून येते.

सदभिरुचीसंपन्न रसिकता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आकर्षक व संस्मरणीय असा पैलू होता. निसर्गाची त्यांना मनस्वी ओढ व आवड होती. त्यांनी त्याच सौंदर्यासक्त वृत्तीने साऱ्या जगभर प्रवास केला. शास्त्रीय संगीताच्याही भोक्त्या होत्या. त्यांची धर्मश्रध्दा डोळस होती. तर दैनंदिन व्यवहारात बौद्धिकता व काटेकोर शिस्त त्यांना विशेष प्रिय होती.

आपल्या संस्थेप्रमाणच अनेक संस्थाना त्यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्वाची फार मोठी उणीव आता भासणार आहे. केवळ पैशाच्या दानापेक्षाही त्यांनी निरनिराळ्या संस्थांना जी वेळोवेळी नवी दृष्टी दिली व मार्गदर्शन केले ते नितांत स्मरणीय आहे.

आम्ही तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे सर्व संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात समवेदना प्रकट करीत आहोत.

स्व. श्रीमती कुसुमबाई मोतीचंद शहा यांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली !



# कॉमनवेल्थ देशातील शैक्षणिक पद्धती

प्राचार्य डॉ. जे. के गोधा



प्राचार्य डॉ. जे. कें. गोधा यांना असोशिएशन ऑफ कॉमनवेल्थ युनिव्हर्सिटीज, लंडन यांचेकडून "सिनियर ट्रॅव्हलिंग फेलोशिप" मिळाली होती. त्या निमित्ताने त्यांनी २९ जून १९८६ ते ३१ ऑगस्ट १९८६ या कालावधीत आफ्रिकेंतील पाच व इंग्लंडमधील दहा अशा एकूण पंधरा विद्यापीठांना भेटी देऊन तेथील शिक्षण प्रक्रियेचीं सर्वांगीण पाहणी केली.

परदेशातील शिक्षण पद्धती, कार्यपद्धती समजून घेण्याच्या दृष्टीने व ही माहिती सर्वांना व्हावी याहेतूने प्राचार्य डॉ. जे के. गोधा यांची मुलाखत कु. ज्योती मरकळे, एम. ए. (मराठी) यांनी घेतली.

ही माहिती सर्वांना उद्बोधक वाटेल अशी खात्री आहे.

**संपादक –**

परदेश दौऱ्यात आपण कोणकोणत्या विद्यापीठांना भेटी दिल्या?

आफ्रिका खंडातील चार राष्ट्रातील पाच विद्यापीठांना. केनिया मधील नैरोबी विद्यापीठ व केनियाटा विद्यापीठ, झांबिया मधील लुसाका येथील झांबिया विद्यापीठ, टांझानिया मधील दारेसलाम येथील दारेसलाम विद्यापीठ, झिम्बाब्वे मधील हरारे येथील झिम्बाब्वे विद्यापीठ, यांना भेटी दिल्या. त्याचप्रमाणे इंग्लंडमधील लडन, केंब्रिज, ईस्ट अँग्लिया, सरे, लीड्स्–नॉटिंगहॅम लॅंकेस्टर, एडिनबर्ग आणि मिल्टनकिंग्ज येथील मुक्त विद्यापीठ अशा दहा विद्यापीठांना भेटी दिल्या. असा एकून पंधरा विद्यापीठांच्या भेटीचा कार्यक्रम होता.

आफ्रिकेतील देश व तेथील विद्यापीठे याबद्दल आपली काय प्रतिक्रिया आहे?

आपली अशी समजूत झालेली आहे की, आफ्रिका खंड व त्यातील सारी राष्ट्रे मागासलेली आहेत. पण वस्तुस्थिती तशी नाही. प्रत्यक्ष तेथं गेल्यावर तेथील विद्यापीठांना भेटी दिल्यावर तेथील शहरातून फेरफटका मारल्यावर आपल्या साऱ्या कल्पना खोट्या ठरतात. ही विद्यापीठें आपल्याकडच्या विद्यापीठांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी प्रतीची नाहीत.

आफ्रिकेतील विद्यापीठे आणि इंग्लडमधील विद्यापीठे यांची कार्यपद्धती कशी आहे?

आपल्याकडील विद्यापीठांसारखीच तेथील विद्यापीठांची कार्यपद्धती आहे. आपल्याकडच्या विद्यापीठात आहेत त्याचप्रमाणे तिकडच्या विद्यापीठांमधील कुलपती, कुलगुरु, कुलसचिव, वित्ताधिकारी, ग्रंथपाल हीं पदे आहेत व कार्यकारी मंडळ, विद्वतसभा, विधीसभा, अभ्यासमंडळ, विविध विद्याशाखा आदि मंडळे तेथे आहेत.

आपली विद्यापीठें व तिकडील विद्यापीठे यात तुम्हाला जाणवलेला मुलभूत फरक कोणता?

आपल्याकडील विद्यापीठे व तिकडील विद्यापीठे यांच्यात आपल्याला जाणवणारा मुलभूत फरक हा की, तेथील विद्यापीठांना आपल्याकडे असतात तशी संलग्न महाविद्यालये नाहीत. ही विद्यापीठे आपापल्या आवारातच विविध विषयांच्या अभ्यासक्रमांचे अध्यापन करतात. तेथे पदवीपर्यंत, पदव्युत्तर व संशोधनात्मक असे सर्व प्रकारचे शिक्षण विद्यापीठातच दिले जाते.

विद्यापिठातच सर्व शिक्षण दिले जाते तेव्हा आप-

ल्याकडील विद्यार्थी संख्या व तेथील विद्यार्थी संख्या याबाबत तुम्हाला काय फरक जाणवला ?

आपल्याकडे विद्यापिठांशी संलग्न अशी अनेक महाविद्यालये असतात व तेथे विद्यार्थी संख्याही भरपूर असते. आपल्याकडील एकेका महाविद्यालयात चार पाच हजार विद्यार्थी असू शकतात. तेथील विद्यापिठातच एकूण चार पाच हजार विद्यार्थी असू शकतात. हा मोठा जाणवणारा फरक आहे.

विद्यार्थी संख्या व प्राध्यापक यांचे प्रमाण तेथील विद्यापिठात कसे आहे ?

आपल्याकडे सर्वसाधारणपणे वाणिज्य शाखेत १ : ४० ते ५० असे प्रमाण आहे. सर्वसासान्यपणे १ : २० ते २५ अशी परिस्थिती आपल्याकडे आहे. तिकडील विद्यापिठातून मात्र विद्यार्थी संख्या मर्यादित असल्याने व विविध विषयांच्या अध्यापनाची सोय असल्याने विद्यार्थी व प्राध्यापक याचे प्रमाण १:५ ते १० असे आढळते.

तेथील विद्यापिठातील अभ्यासक्रमाबद्दल आपणास काय वाटते ?

तिकडच्या विद्यापीठातून कालमान परिस्थितीनुसार समाजाच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रम तयार केले जातात व शिकविले जातात. काही अभ्यासक्रमातून नवे तंत्रज्ञान व कॉम्प्युटरचा समावेश केलेला आहे. अभ्यासक्रमाची पाहाणी करुन आवश्यक ते बदल सुचविणारी यंत्रणा तिकडच्या विद्यापीठातून आहे.

इंग्लंड व आफ्रिका या विद्यापीठातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनीचे संबंध कसे आहेत?

दोनही देशातील विद्यापीठातून विद्यार्थीविद्यार्थिनी मुक्तपणे वावरू शकतात आपल्याकडची संस्कृती, परंपरा, समाज यामुळे आपण तरुण मुलामुलींना मुक्तपणे वावरण्यास संधी नाकारतो. पण तिकडे तशी परिस्थिती नाही. विद्यार्थी–विद्यार्थिनी मुक्तपणे वावरू शकतात.

इंग्लंडमधील विद्यापीठातून परदेशातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधी काय परिस्थिती आहे?

पूर्वी इंग्लंडमधील विद्यापीठातून परदेशातील विद्यार्थ्यांना सुलभ प्रवेश मिळत असे. १९८० पासून इंग्लड सरकारने धोरण बदलले. स्थानिक विद्यार्थ्यापेक्षा परदेशातील विद्यार्थ्यांना दुप्पट फी आकारली जाऊ लागली. ही फी व इतर खर्च परवडणारा नसल्याने संख्या कमी झाली. मलेशिया सिंगापुर, हाँगकाँग आदि श्रीमंत राष्ट्रातील विद्यार्थी तेथे प्रवेश घेतात. हा प्रवेश गुणवत्तेवर दिला जातो. परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधीचे शासनाचे हे धोरण तेथील विद्यापीठांना मान्य नाही.

अलिकडे तर आपल्या विद्यापीठातून अनेक परदेशी विद्यार्थी प्रवेश घेतात. याचे आपल्यामते काय कारण असावे?

जगातील सर्वात स्वस्त शिक्षण देणारा देश म्हणून आपल्या देशाचा उल्लेख करावा लागेल असे मला वाटते. इंग्लंड, आफ्रिका आदि परदेशातून जे शिक्षण दिले जाते ते प्रामुख्याने शासनाच्या द्वारा दिले जाते व त्यावर दरडोई खर्च फार मोठ्या प्रमाणात केला जातो. आपल्याकडे तशी परिस्थिती नसल्याने एकूणच शिक्षणासाठी परदेशाच्या मानाने कमी खर्च लागतो हा खर्च परदेशातील विद्यार्थ्यांना परवडणारा असतो व म्हणून परदेशी विद्यार्थी आपल्याकडे शिक्षणासाठी येतात.

इंग्लंड आणि आफ्रिका येथील विद्यापीठात ग्रंथालयांच्या सोईसंबंधी काय परिस्थिती आहे ?

**ग्रंथालये–**

दोन्ही ठिकाणी विद्यापीठांची ग्रंथालये समृध्द आहेत ग्रंथालयासाठी प्रचंड व देखण्या इमारती सर्व सुख सोईनी युक्त अशा आहेत. काही विद्यापीठातील ग्रथालये कॉम्प्युटरने इतर देशातील ग्रंथालयांशी जोडली आहेत ग्रंथालयात कॉम्प्युडरचा उपयोग सर्व कामासाठी केला जातो. मायक्रो फिल्मचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो बाईंडिगचे युनिटही या ग्रंथालयातून आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा कितीतरी मोठ्या संख्येने ग्रंथसंपदा तेथील विद्यापीठीत आहे.

प्रयोगशाळा, क्रीडांगणे व वसतिगृहे यांची परिस्थिती कशी आहे?

**प्रयोगशाळा–**

अद्यावतता व अधुनिकता ही गोष्ट तिकडे सर्व बाबतीत दिसते. विविध विषयांच्या अद्ययावत् सर्व साहित्य साधनांनी उपयुक्त अशा प्रयोगशाळा तेथील विद्यापीठात प्रशस्त आणि सुंदर अशा इमारतीतून आहेत.



**क्रीडांगणे–**

मोठी भव्य अशी क्रीडांगणे तेथील विद्यापीठातून आहेत. सर्व प्रकारच्या खेळांची साधने व साहित्य तेथे आहे कोणत्याही प्रकारच्या साहित्य साधनांची कमतरता तेथे नाही.

**वसतिगृहे–**

इंग्लंड व आफ्रिकेतील शिक्षणाची सर्व जबाबदारी शासनाची आहे त्यामुळे शासनाच्या वतीने सर्व प्रकारच्या उत्तम सोई विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत विद्यार्थ्यांसाठी सर्व सोईनी युक्त अशा वसतिगृहांच्या सुंदर इमारती तेथे आहेत. विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला की, त्याने फक्त उपस्थित राहारयाचे इतर कोणतेही साहित्य बरोबर नेण्याची त्यांना गरज नसते.

विद्यार्थ्यांना तेथील विद्यापीठातून कोणत्या सोई सवलती मिळतात ?

सर्व शिक्षण शासनाच्या खर्चाने होत असते स्थानिक विद्यार्थ्यांना कोणताच खर्च करावा लागत नाही. उत्तम प्रकारची वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे तेथे आहेत. ट्युशन फी शासन देते. काही विद्यापीठातून विद्यार्थ्यांना पाकेट अलौन्सही दिला जातो.

विद्यार्थी सघटनांना ( युनियन ) विद्यापीठाकडून अनुदान दिले जाते. या अनुदानातून विद्यार्थी संघटना विद्यार्थ्यांसाठी ग्राहक भांडारे, कॅन्टिन चालवितात. इन्डोअर गेम्सची सोय उपलब्ध करून देतात. सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात. यासाठी स्वतंत्र इमारती उपलब्ध करून दिल्या आहेत.

तिकडील विद्यापीठातून अभ्यासेतर योजना राबविल्या जातात का ?

आपल्याकडे एन्. एस्. एस , एन्. सी. सी. प्रौढ शिक्षण, निरंतर शिक्षण, लोकसंख्या शिक्षण आदि योजना राबविल्या जातात त्यासाठी विद्यार्थी. प्राध्यापक यांचे खूप श्रम खर्ची पडतात. तिकडच्या विद्यापीठात प्राध्यापक फक्त अध्यापन व संशोधन यावर आपले लक्ष केंद्रित करतो. विद्यार्थी आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर सांस्कृतिक कार्यक्रम करतात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविकासाची स्वतंत्र केंद्रे तेथे काम करतात.

कमवा व शिका यासारख्या योजना तिकडे आहेत का?

तिकडच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी शासनाची असल्याने विद्यार्थ्यांना अशा योजनांची गरजच वाटत नाही.

तिकडे मुक्त विद्यापीठाची कल्पना रुजली आहे काय?

इंग्लंडमध्ये ही कल्पना रूजली आहे. अद्यायावत पद्धतीने या मुक्त विद्यापीठाचे काम चालू आहे.

आपल्याकडें मुक्त विद्यापीठाची कल्पना रुजू शकेल काय?

मुक्त विद्यापीठाची मूळ कल्पना चांगली आहे. आपली लोकसंख्या, साधने, दर्जा व त्यासाठी लागणारा खर्च हा आपल्या देशाला परवडणारा आहे असे वाटत नाही. आर्थिक दृष्टचा हा प्रयोग आपल्याला परवडणारा नाही असे वाटते. तरी सुद्धा आंध्र प्रदेशात एक, दिल्लीत इंदिरा गांधी विद्यापीठ व महाराष्ट्रात एक अशी मुक्त विद्यापीठे आकाराला येत आहेत.

तिकडच्या परीक्षा पद्धती विषयी काही विशेष?

आपल्याकडे विद्यापीठाची परीक्षा घेणारी स्वतंत्र यंत्रणा आहे. एकाच वेळी ही यंत्रणा अनेक विषयांची परीक्षा घेते. त्यामळे अनेक समस्या, गुंतागुंत निर्माण होते. तिकडच्या विद्यापीठांकडून प्रत्येक विषयाचा विभाग आपल्या परीक्षांचे सपूर्ण नियोजन करतो. मर्यादित विद्यार्थी संख्येमुळे शिक्षणाचा दर्जा, परीक्षांचा दर्जा उत्तम राखला जातो परीक्षांचा दर्जा उत्तम राखला जातो. परीक्षांचे विकेन्द्रीकरण केल्यामुळे कोणत्याही प्रकारचा ताण विद्यापीठांवर पडत नाही

विद्यार्थी संघटना तिकडे आहेत काय?

विद्यार्थी संघटना तिकडे आहेत. परंतु आपल्याकडे आहेत त्याप्रमाणे त्यांचे स्वरूप नाही. तेथील विद्यार्थ्यांच्या संघटनांना विद्यापीठाच्या नियमानुसार विशिष्ट कक्षेतच आपले कार्य करावे लागते. या संघटना राजकीय प्रवाहापासून मुक्त असतात. सामान्यपणे प्रत्येक विद्यापीठात एक विद्यार्थी संघटना असते व ती विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करते.

तेथील विद्यार्थ्यांच्या शिस्तीबद्दल आपणास काय वाटते?

सर्वसामान्यपणे विद्यार्थी शिस्तप्रिय आहे. मनुष्य स्वभावानुसार काही वेळा विद्यार्थ्यांकडून वर्गात, खेळाच्या मैदानावर, वसतिगृहातून काही प्रमाणात बेशिस्त जाणवते. एकूण जबाबदारीची जाणीव असलेला व शिस्तीचा भोक्ता असा हा विद्यार्थी आहे.

मुक्तपणे वावरण्याची तरूण मुलामुलींना संधी मिळते त्यामुळे काही समस्या निर्माण होतात का?
अलिकडच्या काळात विद्यार्थी विद्यार्थीनींच्या मुक्तपणे वावरण्याच्या संधीमुळे वसतिगृहातून राहणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थीनींच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात व अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

आपल्याकडे सुशिक्षित बेकारांची फार मोठी समस्या आहे, या संदर्भात तिकडील परिस्थिती कशी आहे?
उच्च शिक्षणाचे दरवाजे सर्वांना मुक्त ठेवल्याने आपल्याकडे सुशिक्षित वेकारांची ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे. पदवीं घेऊन वाहेर पडणाऱ्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्द नाहीत तिकडील विद्यापीठातून मर्यादित स्वरूपात विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यामुळे पदवीधर विद्यार्थी सहज उद्योग व्यवसाय मिळवू शकतो.

तिकडील प्राध्यापकांचा दर्जा व त्यांची एकूण परिस्थिती कशी आहे ?

सर्वच विद्यापीठातून प्राध्यापकांचा दर्जा उत्तम आहे. संशोधन कार्यावर प्राध्यापकांचे मूल्यमापन केले जाते. आपल्याकडे आहे तशीच विनिष्ट गुणवत्तेची अट त्यांना आहे. आफ्रिकेतील विद्यापीठातून परदेशातून नामवंत प्राध्यापकांना बोलविले जाते. तिकडील विद्यापीठातून नेमून दिलेला सर्व वेळ प्राध्यापक संशोधन कार्यासाठी देतो.

तिकडील प्राध्यापकांना आपल्याकडील प्राध्यापकांपेक्षा काही विशेष सवलती दिल्या जातात का ?

तिकडे घरबांधणी, वाहन खरेदी आदिसाठी प्राध्यापकांना सुलभ व्याजदरावर कर्ज दिले जाते.
प्राध्यापकांच्या संघटना तिकडे आहेत काय ?

प्राध्यापकांच्या संघटना तिकडे आहेत. परंतू त्या राजकीय प्रवाहापासून मुक्त आहेत. वेतन व इतर सुखसोई या संदर्भात ते नेहमी इतर घटकांशी तुलना करतात व वेतन वाढ, सेवानियम व इतर मुख्य



सोईची सतत मागणी करीत राहतात. एक मात्र स्पष्ट जाणवते कीं, आपल्यापेक्षा तिकडच्या प्राध्यापकांना मिळणारे वेतन, सुखसोई कितीतरी पटीनें वधिक मिळतात. तरीं त्यांच्या मागण्या सुरूच असतात.

आपल्याकडे पुणे विद्यापीठातून " सायन्स पार्क " चीं कल्पना कार्यान्वित होत आहे या संदर्भात तिकडे काय परिस्थिती आहे ?

इंग्लंडमध्ये औधोगिक क्षेत्र व विद्यापिठे हे " सायन्स पार्क " च्यामुळे एकमेकांशी जोडली गेली आहेत इंग्लंडमध्यें बहुतेक विद्यापीठातून सायन्स पार्कची कल्पना कार्यान्वित केली आहे. लॅंकेस्टर व मॅंचेस्टर या विद्यापीठातून सायन्स पार्क प्रत्यक्ष माहण्याची संधी मला मिळाली. विद्यापीटातील विविध विषयांच्या प्राध्यामकांच्या ज्ञानाचा फायदा औधोगिक क्षेत्राला होतो.

लॅंग्वेज लॅंबचा उपयोग तेथील कोणकोणत्या विद्यापीठ तून केला जातो ?

लॅंग्वेज लॅंब प्रत्यक्ष पाहण्याची संधी इंग्लंडमधील लीड्स् विद्यापीठात मिळाली. जगातील अनेक भाषाचा अभ्यास या प्रयोगशाळेतून केला जातो.

दृक् श्राव्य शिक्षण योजनेसंबंधी तेथे काय पाहायला मिळाले ?

इंग्लंडमधील सर्व विद्यापींठातून दृक् श्राव्य शिक्षण योजनाचीं सोय आहे. आफ्रिकेतींल केनियटा, झिम्बावे झांबिया आदि विद्यापीठातून दृक् श्राव्य शिक्षण योजना कार्यान्वित केल्या आहेत.

या अभ्यक्ष दौऱ्यात आपणास कोणाकोणाशी प्रत्यक्ष चर्चा करण्याचीं संधीं मिळाली ?

आफ्रिकेतींल केनियाटा, नैरोबीं, झांबिया या विद्यापींठांचे कुलगुरू, प्र-कुलगुरू, सचिव, वित्त अधिकारीं अधिकारीं व प्रशासकींय अधिकारीं–ग्रंथपाल,डीन ऑफ स्टुडन्टस्, रेक्टर्स अदिशीं तेथींल आर्थिक व्यवहार, कार्यालयींन पध्दतीं, अकौंटिंग, बजेटिंग, विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचीं पध्दतीं, विद्यार्थ्यांच्या कल्याणकारीं योजना कौन्सिलिंग, गायडन्स स्टुडन्टस्, या विषयीं चर्चा करण्याची संधीं मिळालीं. काहीं विद्यापींठातींल प्रौढ शिक्षण अधिकारीं, निरंतर शिक्षण अधिकारीं यांच्याशींही चर्चा केलीं. रिझर्व्ह बॅंकेचे भूतपूर्व गव्हर्नर व सध्याचे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर



श्रीं. आय् जीं. पटेल यांच्या भेंटींचीं व त्यांच्याशीं चर्चा करण्याचीं संधीं मिळालीं.

तुमच्या या दौऱ्यात तिकडील भारतींय रहिवाशाशी गाठीभेटी झाल्यात काय?
होय. या दौऱ्यात आफ्रिका व इंग्लंडमध्ये भारतीय रहिवाशांची भेट हा मोठा आनंदाचा क्षण होता. नैरोबी, लुसाका, दारेसलाम येथील भारतीय रहिवाशांच्या समवेत राहाण्याची व चर्चा करण्याची संधी मिळाली. तेथे गुजरातमधील लोक जास्त आहेत. तेथील स्थानिक रहिवाशांशी सुध्दा भेटीगाठी झाल्या चर्चा झाली. इंग्लंडमधील दौऱ्यात लंडन येथील आमचा निवास एका भारतीय कुटुंबात होता आफ्रिका व इंग्लंड या दोनही देशातील विद्यापीठातून काही भारतीय लोक प्राध्यापक म्हणून काम करतात. त्यांच्या भेटीचा योग आला. विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी तिकडील विद्यापीठांना सुटी असल्याने विद्यार्थ्यांशी चर्चा करता आली नाही.

समाज व उद्योग धंदा व्यवसाय यादृष्टीने इंग्लंडमधील विद्यापीठाचे संबध कसे आहेत?
आपल्याकडील विद्यापींठ व महाविद्यालये यांचा समाजाशी कोणताच संबंध राहात नाही.तिकडे मात्र समाज उद्योग–धंदे व व्यवसाय यांचा व विद्यापीठ यांचा जवळचा संबंध आहे.

समाज उद्योगधंदे व व्यवसाय यांच्याशी इंग्लंडमधींल विद्यापींठांचे संबंध कसे आहेत?
तिकडे विद्यापींठांचा–समाज–उद्योगधंदे व व्यवसाय यांचा जवळचा संबंध प्रस्तापित झालेला आहे. आपल्याकडे मात्र विद्यापींठे किंवा महाविद्यालये यांचा समाज उद्योगधंदे व व्यवसाय यांचा खास संबंध प्रस्थापित झालेला नाहीं.

या परदेश दौऱ्यानंतर आपल्या देशातींल शिक्षण व तिकडचे शिक्षण यांच्या संदर्भात कोणता लक्षणींय फरक जाणवला?
प्रथम महत्वाचीं जाणींव होते कीं तिकडच्या शिक्षणावर दरडोई खर्च मोठ्या प्रमाणात केला जातो. आपल्याकडे तो खर्च खूपच कमीं आहे.
शिक्षणाचीं सर्व जबाबदारीं शासनाने स्वींकारलेलीं आहे उच्च दर्जाच्या सुखसोई विद्यार्थी–प्राध्यापक यांना उपलब्ध करुन दिल्या आहेत. शिक्षण देण्याचीं सर्व जबाबदारीं शासनाचीं असल्याने खाजगीं संस्था देणगींदाराने दिलेल्या देणगींतून चालणारीं महाविद्यालये तिकडे नाहींत.
आपल्याडे विद्यापींठे आहेत व त्यांच्याशीं संलग्न अशीं महाविद्यालये आहेत असा प्रकार तिकडे नाहीं.
स्वायत्त–स्वतंत्र अशीं विद्यापींठे–मर्यादित विद्यार्थी संख्या अभ्यासक्रम यामुळे आपल्याकडे आहै तशीं गर्दी तिकडच्या विद्यापींठातून दिसत नाहीं.
संख्येने कमीं असलेला हा विद्यार्थी समाजाच्या गर्दींपासून दूर राहून आपले शिक्षण पूर्ण करतो.
आपल्याकडं वाढती लोकसंख्या हा सर्वच पातळोवर त्रासदायक झालेला प्रश्न आहे. त्यामुळे वाढती विद्यार्थी संख्या व त्याप्रमाणात विद्यापीटे व महाविद्यालये यांची संख्या वाढलीं. पण त्यासाठी उपलब्ध करुन द्यावीं लागणारी उच्च प्रकारची साधने, साहित्य यांची पूर्तता आर्थिक दृष्टीनें आपण पूर्ण करू शकत नाही. त्याचे नियोजन नाही. त्यामुळे आपण शैक्षणिक दृष्टया खूपच मागे आहोत असे वाटते.

तिकडील विद्यापीठातून आढळणारी शिस्त, शांतता, स्वच्छ व प्रशस्त वातावरण त्यामुळे लाभणारे स्वास्थ्य या गोष्टी खास उल्लेखनीय आहेत.
या पार्श्वभूमीवर आपल्याकडील शिक्षण व्यवस्थेची सर्वच पातळीवर पुन:मांडणी करणे अगत्याचे वाटते.

## दिवंगतांना श्रध्दांजली

या वर्षी आपल्या महाविद्यालयाच्या गव्हर्निंग कौन्सिल व लोकल कमिटीचे सन्माननींय सदस्य श्री. मोतीचंद फुलचंद शहा, मुंबईकर यांचे ज्येष्ठ बंधु श्री. माणिकचंद फुलचंद शहा, मोहोळ यांचे दु:खद देहावसान झाले तसेच आपले प्राध्यापक बन्धु डॉ. आचार्य. व्ही. व्ही यांच्या मातोश्रींचे व श्री. पी. जो. मेहरे यांच्या पिताजींचे दु:खद निधन झाले.

आम्ही महाविद्यालयाने प्राचार्य, प्राध्यापक व सेवकवर्ग त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत.

# प्राचार्य डॉ. आर. टी. अक्कोळे यांचा हृद्य सत्कार समारंभ

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या जयसिंगपूर महाविद्यालय, जयसिंगपूर च्या प्राचार्यपदावरून डॉ. आर. टी अक्कोळे हे दि. ३१ मार्च १९८७ रोजी सेवानिवृत्त झाले संस्थेच्या प्रारंभापासून प्राध्यापक व प्राचार्य म्हणून त्यांनी संस्थेच्या जडण-घडणीत अत्यंत महत्वाची जबाबदारी पार पाडली आहे. संस्थेतील त्यांची सेवा बारामतीं येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात प्रारंभ झाली. इ. स १९७२ पर्यन्त या महाविद्यालयाच्या इतिहासात एक यशस्वी प्राचार्य म्हणून त्यांची नोंद घ्यावी लागेल.

अध्ययन-अध्यापन, विद्वत्ता-व्यासंग व सामाजिक उत्तरदायित्व विषयी अखंड जागरूकता, या गुणांमुळे त्यांनी बारामती व जयसिंगपूर येथील महाविद्यालयातून जे शैक्षणिक वातावरण निर्माण केले. त्याच्या आता फक्त स्मृतीच उरतील! त्यांच्या ॠजुस्वभावामुळे त्यांनी अगणित मित्रपरिवार गोळा केला शिस्तबध्द प्रशासनाबरोबरच लेखन व संशोधन यात रमणारा डॉ. अक्कोळे यांच्यासारखा प्राध्यापक विरळाच !

प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांच्या गुरुकुल शिक्षण-प्रणालीचे आपल्यावरील ऋण ते मोठ्या अभिमानाने आपल्या शिरावर वागवितात. त्या विशिष्ट संस्कारांचा प्रत्यय त्यांच्या सहवासातील कोणालाही आल्याशिवाय राहत नाही.

आपल्या स्वीकृत कार्यात प्रामाणिकपणे व निष्ठापूर्व सवायोग देऊन त्यांनी दोन्ही महाविद्यालयात आपले स्थान चिरस्मरणीय करून ठेवले आहे. अशा या आत्मीय प्राध्यापक-प्राचार्याचा संस्था, प्राध्यापक, सेवक व बारामती येथील दिगंबर जैन समाज यांच्या वतीने अत्यंत हृद्य असा सत्कार समारंभ दि. १२ एप्रिल १९८७ रोजी श्री महावीर भवन येथे याच संस्थेचे भूतपूर्व सेक्रेटरी प्राचार्य जी. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला.

संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक सेवक, व गावातील प्रतिष्ठित श्रेष्ठीगण यांनी आपल्या भावना भारवल्या शब्दात व्यक्त केल्या.

या प्रसंगी आम्हीं डॉ. अक्कोळे यांना भावी आयुष्यात दीर्घायुरारोग्य लाभो अशी प्रार्थना करतो.



# कर्मवीरांची जीवन गाथा

दिलीप शिंदे
टी. वाय्. बी. कॉम्.

भारतमातेने अनेक मानव-रत्नांना जन्म दिला आहे. त्यामध्ये कै. भाऊराव पायगौडा पाटलाची प्रामुख्याने गणना होते. आपल्या भगीरथ प्रयत्नांनी बहुजन समाजाला त्यांनी ज्ञान गंगा उपलब्ध करून दिली आहे. अनेक विद्वानानी त्यांना - शिक्षण 'भगीरथ' म्हणून संबोधिले आहे. पुणे विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टरेट' ची पदवी देऊन गौरविले आहे. भारत सरकारने 'पद्मभूषण.' चा किताब देऊन त्यांना भूषविले आहे. महाराष्ट्रीय जनतेने तर त्यांना 'कर्मवीर' या सार्थ नावाने संबोधून आपला आदर व्यक्त केला आहे.

अशा या महान् महाराष्ट्राच्या थोर शिल्पकाराचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी १ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. रयतेला ज्ञानामृताचा कुंभ पाजणारे म्हणून ते कुंभोज गावी जन्मले असावेत. श्रीमंतांच्या सदनांतुन वावरणारी शिक्षणाची गंगा गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत आणून पोहचविणारे म्हणून ते गंगामाई या महान मातेच्या पोटी अवतरले असावेत.

देवगौंडा पाटील यांचा मोठा मुलगा पायगौंडा शेतात ऊसाला पाणी देत होता. त्याने मराठी चौथीतून नुकतीच शाळा सोडली होती. देवगौंडने आपल्या मुलास शेतातुन बोलावून घेतले व ताकीद दिली "पायगौंडा उद्यापासून तू शाळेत गेलाच पाहिजेस पुढे शिकून माझा समाजात मान राहील असा तू झाला पाहिजेस." याच पायगौंडा पाटलांचे भाऊराव हे चिरंजीव होत. आणि भावी काळात बहुजन समाजाचा कैवारी 'भाऊ' होणार म्हणूनच खेड्यापाड्यातील भोळ्या भाबड्या बायकांनी त्यांचे नाव 'भाऊराव' असे ठेवले असावे.

भाऊराव लहानपणी अत्यंत खोडकर आणि खेळकर स्वभावाचे होते. त्यांच्या वडिलांचा स्वभाव अत्यंत करारी आणि कर्मठ होता. भाऊरावांनी खूप शिकावे आणि पदवीधर व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. भाऊरावांच्या मातेचा स्वभाव मानी व ममताळू होता. पित्यापेक्षा मातेचाच अधिक सहवास त्यांना लाभला. बाल भाऊरावावर या मानी मातेने त्यागाचे आणि साधुत्वाचे सुंदर संस्कार केले. आईस नमस्कार केल्याशिवाय ते कोणत्याही कार्यास प्रारंभ करीत नसत. हा उपक्रम त्यांनी आमरण अमलात आणला. मातेविषयीच्या आदराचे असे उदाहरण अलीकडच्या काळात शोधूनही सापडणे कठीण! आईच्या आशीर्वादानें सामान्य माणूस असामान्य बनल्याचे भाऊराव पाटील हे एक आधुनिक जगातील आदर्श उदाहरण होय. कुंभोज या निसर्गरम्य गावात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या जीवन शिक्षणाचा श्रीगणेशा येथच सुरू झाला. तेथील सर्व जाती जमातीच्या दणकट पोरांचा पुढारी म्हणजे भाऊराव पाटील! भावी काळात सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय अन्याया विरुद्ध दिलेल्या प्रदीर्घ झगड्यात भाऊरावांमध्ये ही बेडर आणि बंडखोर वृत्ती पदोपदी दिसून आली. भाऊरावाचे वडील नोकरीत असल्यामुळे त्यांची वरचेवर बदली होत असे. त्यामुळे बाल भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण वेगवेगळ्या ठिकाणी झाले. इंग्रजी शिक्षणासाठी मात्र त्याना कोल्हापूरला राजाराम हायस्कूलमध्ये पाठविण्यात आले. राहण्याची व जेवणाची सोय जैन वसतिगृहात केली. या वसतिगृहाच्या कर्मठ शिस्तीच्या बडग्याखाली त्यांना सदैव रहावे लागत असे.

सन १९०७ मध्ये मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज यांची मुलगी मिस क्लार्क हिच्या स्मरणार्थ कोल्हापूर येथे 'मिस क्लार्क होस्टेल' नावाचे वसतीगृह मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यासाठी उघडले. या वसतीगृहाच्या उद्घाटनप्रसंगी भाऊरावांनी विद्यार्थीदशेत असताना प्रामुख्याने भाग घेतला. ही गोष्ट अशा वसतिगृहाच्या

प्रमुखांना आवडली नाही. ‘ भाऊरावांनी आंघोळ केल्याशिवाय वसतिगृहात जेवण घेऊ नये ! ’ असा त्यांनी हुकूम काढला. परंतू तो हुकूम भाऊरावांनी मानला नाही. ते म्हणाले ‘ अस्पृश्य हा सुध्दा मानवच आहे. त्याच्या स्पर्शाने विटाळ होत नाही, मी आंघोळ न करता जेवण घेणार ! ’ शेवटीं रात्र झाल्यावर भाऊरावांनी खिडकीतून भोजनगृहात प्रवेश करुन जेवण घेतले. वसतिगृहाचे नियम मोडल्याबद्दल वसतिगृहाचे प्रमुख आण्णासाहेब लठ्ठे यांनी भाऊरावांना वसतिगृहातून काढून टाकले. पण जे घडले ते भल्यसाठीच ! छत्रपती शाहूमहाराजांचा भाऊरावांना आश्रम मिळाला.

छत्रपती शाहू महाराज कुस्तीचे परमभोक्ते होते. भाऊरावांच्या आटीव घोटीव शरीरावर महाराज प्रसन्न असत. महाराजांचा खास पहिलवान म्हणून कोल्हापुरात भरदार छातीच्या भाऊरावांचा मोठा गौरव होत असे. तरुणपणी कमावलेल्या पोलादी शरीरामुळेच भावी काळात ज्ञानदानाचे पवित्र कार्य ते अविश्रांतपणे करु शकले. भाऊरावांच्या अंतःकरणात समाजसेवेचे शुध्द बीज अकुंरित झाले. शिक्षण हाच सर्व सुधारणांचा पाया आहे. अशी त्यांची संपूर्ण खात्री झाली. तरुण वयातच जनसेवेच्या या सुप्त विचाराने त्यांच्या अंतःकरणात घर केले. भाऊरावांना इंग्रजी सहावी पर्यंतच विद्यालयीन शिक्षणाचा लाभ मिळाला. परंतु त्यांची वृती स्वतंत्र बाण्याची, बंडखोरपणाची आणि मर्दांनी पेशाची असल्यामुळे त्यांचे मन पुस्तकी जगात रमू शकले नाही. त्यांच्या रगेल आणि रंगेल तारुण्याला बाह्य जगाचा मनसोक्त वारा प्यावयाचा होता. कुस्त्याच्या प्रचंड फडात अजिक्य पहिलवान म्हणून त्यांची कीर्ती खेडूतांच्या जिभेवर नाचू लागली. नियमीत व्यायामाने कमावलेले पिळदार शरीर आणि बंडखोरवृत्ती यांचा संगम झाला आणि त्यांचा दक्षिण महाराष्ट्रात कीर्तीसुगंध दरवळू लागला.

शिक्षणक्षेत्रात आपली व्यक्तिशः पिछेहाट झाल्याची जाणीव भाऊरावांना होती. तथापि ही उणीव भरुन काढण्याचा सर्वव्यापी मार्ग त्यांनी शोधून काढला खेड्यातील मुलांना अभ्यासासाठी स्वतंत्र अशी सोय नसते. आई-वडिल अशिक्षित असल्यामुळे त्यांना अभ्यासात पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे बुध्दी असून ही प्रगती करता येत नाही असे भाऊरावांना दिसून आले १९०९ साली काही मित्रांच्या सहकार्याने वाळवे तालुक्यातील दुधगाव येथे ‘ दुधगाव विद्यार्थी आश्रम ’ ही छोटीशी संस्था काढली आणि भाऊरावांनी शैक्षणिक कार्याचा श्रीगणेशा केला. भाऊराव एकदा इस्लामपूर येथे आपल्या वडिलांना भेटण्यास आले असता त्यांना मोटारस्टॅंड जवळच मराठी शाळेपुढे एक चुणचुणीत मुलगा पावसात पाटीदप्तर घेऊन बसलेला दिसला. भाऊराव तडक त्याच्याकडे गेले व चौकशी केली. मुलाने सांगितले की, मी महार असल्याने मला वर्गात बसता येत नाही. बाहेर बसून शिक्षण घ्यावे लागते. या महार बालकावर होत असलेला सामाजिक रुढीचा अन्याय पाहून ते वर्ग-शिक्षकाकडे गेले. त्यांनी विचारले की, ‘हा मुलगा बाहेर का? तेव्हा गुरुजी म्हणाले, ‘ अस्पृश्य मुलांना वर्गात बसून शिक्षण घेता येणार नाही.” हे एकून भाऊराव संतप्त झाले व त्यांनी सदर शिक्षकाची चांगलीच कानउघडणी केली. आणि या मुलाला कोल्हापूरला वस्तीगृहात दाखल केले. हा मुलगा म्हणजे श्री ज्ञानदेव घोलप हे होत. ते पुढे मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे मेंबर झाले व त्यांनी दलितांच्या कैवारासाठी ‘मूकनायक’या नावाचे वर्तमानपत्र चालविले

भाऊरावांनी स्थापन केलेल्य आश्रमात मराठा महार, मुसलमान, मांग वैगेरे सर्व जातीच्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व अभ्यासाची सोय केली भाऊराव आपल्या अल्प मिळकतीतून विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी लागणाऱ्या रात्रीच्या दिव्याकरिता रॉकेल पुरवित असत. तसेच जातीभेदाचे निर्मूलन करण्यासाठी स्पृश्य व अस्पृश्य विद्यार्थी एका ठिकाणी रहावेत अशी त्यांची भावना होती. त्या वेळेच्या मुंबई प्रांतात हा पहिलाच आश्रम होता व त्याचे प्रवर्तक भाऊराव हे होते नेर्ले येथे भाऊरावांनी आश्रमाच्या खर्चासाठी काटकसरीची अभिनव कल्पना उपयोगात आणली. या योजनेप्रमाणे गावातील प्रत्येक घरात गृहिणीने दळण दळण्यापूर्वी दळणातील एक मूठ धान्य जात्यावर टांगलेल्या पिशवीत घालावयाचे व अशा पिशव्यातील जमलेले धान्य दर आठवड्यास गोळा करुन वसतिगृहासाठी द्यावयाचे. या योजनेचे वैशिष्टय असे की शेतकरीवर्गाला दान करण्याची इच्छा असूनही ते देताना त्यास जड वाटू नये. याशिवाय प्रत्येक गृहातील गृहिणी जात्यावर टांगलेल्या पिशव्यातील धान्य गोळा करीत असल्याने या योजनेचा प्रसार व प्रचार सर्व थरातील घराघर तून झाला.

कऱ्हाडजवळील काले येथे १९१९ साली सत्यशोधक परिषद भरली होती. उभ्या महाराष्ट्रातील हजारो प्रतिनिधी उपस्थित होते. ग्रामीण जनतेच्या शिक्षणासाठी शिक्षणसंस्था सुरु करावी, अशी सर्वानुमते मंजुरी मिळाली. गोरगरीब रयतेचा उद्धार व्हावा म्हणून मराठ्यांच्या इतिहास प्रसिध्द राजधानीत सातारा शहरात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या वटवृक्षाचे रोप साताऱ्यात लावून भाऊरावांनी त्याच्या शाखा अखिल महाराष्ट्रात पसरविल्या.

कर्मवीर भाऊराव पाटलांचे आतापर्यंतचे शैक्षणिक क्षेत्रातील प्रचंड कार्य पाहिल्यावर एखादया विशाल वटवृक्षाची आठवण येते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हेच त्यांनी स्थापलेल्या रयत शिक्षण संस्थेचे बोध चिन्ह आहे. आज त्याचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रात अनेक शाखोपशाखांनी झाला आहे रयत शिक्षण संस्थेची वसतीगृहे, माध्यमिक विद्यालये, कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालये व इंजिनियरिंग विद्यालय यांचे जाळेच आता साऱ्या महाराष्ट्रात पसरले आहे. त्यांची तळमळ इतकी होती की त्यांना पैसा कधी कमी पडला नाही. उत्साही कार्यकर्त्यांचीही त्यांना उणीव भासली नाही.

पूर्वेस उगवलेला रक्तवर्ण बालसूर्य अगदी निस्तेज होऊन अस्तास जातो; त्याप्रमाणे प्राणज्योत नियतीच्या निर्दय फटकाऱ्याने १९५९ साली मे च्या ९ तारखेस विझली. महाराष्ट्राच्या जीवनाकाशात उदय पावलेला हा तेजस्वी ज्ञानसूर्य शिवजयंतीच्या शिवदिनी शिवस्वरुप झाला. महाराष्ट्र दारुण दुःख सागरात बुडाला.

अगदी बालपणापासून आण्णांनी वाढविलेल्या हजारो पोरक्या पोरांनी हंबरडा फोडला. ‘संपले! आमचे आण्णा आम्हास सोडून गेले’! दऱ्याखोऱ्यातील जनतेच्या मुखातून असेच दुःखोद्गार बाहेर पडले भाऊराव गेले म्हणजे आपल्याच कुटुंबाचा एक आधार गेला. असाच प्रत्येकजण भाव व्यक्त करीत होता.

काळ हाच आपला खरा वैरी आहे आणि त्याच्या मुसक्या बांधल्या खेरीज आपले कार्य तडीस जाणार नाही हे भाऊरावांनी पुरेपूर हेरले होते. शेवटी या दीर्घ झटापटीत काळाने जरी त्यांच्यावर झडप घातली, तरी अथक परिश्रमाने जनताजनार्दन रुपी ईश्वराची सेवा करून ते अमर झाले आहेत. त्यांच्या श्रेष्ठ कार्यांच्या संस्मरणीय स्मृतीमुळे कोटयवधी जनमने अजूनही त्यांच्या भोवती रेंगांळत आहेत. घुटमळत आहेत. त्यातून हजारो कर्मवीर निर्माण होऊन भारताचे पांग फेडतील, हीच खरी भाऊराव पाटलांची जीवन गाथा होय!

*

---

“ पहटे २–२।। तास मी चिंतन करतो. त्यावेळो मला उत्तमोत्तम विचार सुचतात व मग मी ते सुविचार अंमलात आणण्याचा प्रयत्न करतो. मला ते वेडच लागते. मला दुसरे काही सुचतच नाही मग तुम्हा पुस्तकी पंडिताना शब्दार्थ कळतो मला खोल अर्थाचे भान येते. मला कळते व वळतेही. जर तथाकथित पंडितांना कळणे व वळणे या दोन्ही क्रिया कळल्या तर भूतलावर नंदनवन अवतरेल”

—कर्मवीर भाऊराव पाटील

“शेतकऱ्याचया मुलाला शरीरश्रम करण्याचा कंटाळा नसावा. हे आमच्यातले ऐतखाऊ लेकाचे. त्यांनीच सगळी घाण केली आहे. इस्त्रीची घडी न मोडू देता काम करणार. कसले काम करणार तो? घामाने डबडबलेले शरीर हाच सर्वोच्च अलंकार मानवाचा. स्वावलंबानाचे फार महत्व वाहे. ज्यावेळी आईबाप म्हातारे होतात व मुलाकडून सेवेची अपेक्षा करतात त्याचवेळी मुलगा नेमका बुशशर्ट का फिशशर्ट घालून घरी जातो. आईवडिलांनीच तांब्याभर पाणी द्यावे लागते त्याला. हा शिक्षणाचा पराभव आहे. हे शिक्षण नसून विष आहे विष! ...... ....... हे विष बाहेर फेकून दिले पाहिजे. निरोगी मनाचे, निरोगी शरीराचे तरूण कॉलेजमधून निर्माण झाले पाहिजेत,”

—कर्मवीर भाऊराव पाटील

# राष्ट्रीय एकात्मता

मचाले पी. एल.
टी. वाय. बी. एस्सी.

आज राष्ट्रीय एकात्मता कशी निर्माण करता येईल याकडे सर्व देशाचे लक्ष केंद्रित झाले आहे. भारतीय स्वातंत्र्याचे स्थैर्य, भारताची सर्वांगीण प्रगती, सामर्थ्याची वाढ यासाठी आज राष्ट्रीय एकात्मता स्थापन होणे आवश्यक आहे. निव्वळ वैचारिक पातळीवर एकात्मतेची कल्पना पटून भागणार नाही. विचाराला किंवा बुद्धीला भावनेचे अधिष्ठान असणें आवश्यक आहे. एकीची व आपुलकीची भावना निर्माण झाल्याशिवाय खरी एकात्मता साध्य होणार नाही राष्ट्रीय एकात्मता आपणाला निर्माण करावयाची आहे. याचा अर्थ भारतीय नागरिकांचा धर्म, भाषा एकच असावेत, त्यांच्यात विविधता नसावी. अशी भूमिका घेणे इष्ट नाही. भारतातील प्रत्येक नागरिकाला त्याचा धर्म, भाषा व पंथ यावर बंधन नसावे, त्यांना सर्व बाबतीत स्वतंत्र्य दिलेच पाहिजे. असे स्वतंत्र्य दिल्याने, त्यांची भावना राष्ट्रीय एकात्मतेकडे ओढ घेऊ लागेल.

गांधीजीनी भारताला स्नातंत्र्य मिळवून दिले ते एकीच्या बळावर. आता ही स्वातंत्र्याची इमारत टिकवून त्यावर कळस चढविणे हे नागरिकांच्याच हातात आहे.सध्या भारतामध्ये स्वातंत्र्याच्या इमारतीचा पायाच खणला जात आहे. हा धोका सर्वांना दिसत आहे. १८५७ मध्ये जो उठाव झाला त्यावेळी भारतामध्ये सर्व ठिकाणी क्रांती यशस्वी झाली नाही याचे कारण एकी नव्हती. एका संस्कृत कवीने म्हटले आहे की, "अल्पानामपि वस्तूनांकार्यसाधिका। तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदान्ति संहृति: न:। याचा अर्थ असा कि लहान वस्तूंची एकी सुध्दा कार्य साधणारी असते. एकत्र आलेल्या जंगलातील गवताच्या योगाने माजलेले हत्ती सुध्दा बांधले जातात. तद्वत् राष्ट्रीय एकात्मतेचे आहे. गांधीजी जर म्हणाले असते की मी एकटाच राष्ट्रासाठी मरतो तर इंग्रजांनी त्यांना जुमानले नसते, परंतु त्यांच्यामागें हजारो लोकांची एकी होती. म्हणूनच इंग्रजांना स्वातंत्र्य देणे भाग पडले. भारतात राष्ट्रीय एकत्मता जर निर्माण होईल तर भारताचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचे सामर्थ्य कोणतेही राष्ट्र दाखवू शकणार नाही. किंबहुना प्रवेशद्वारी येऊन उभे रहाण्याचे सुद्धा धाडस परक्या राष्ट्राचे होणार नाही.

सध्यां भारतात काय चालू आहे हे जनता उघड्या डोळ्यांनीं पाहते आहे. भारतात अनेक पक्ष निर्माण झालेले आहेत. व ते सत्ताधारी बनू पहात आहेत. या सर्वांना ज्वारीतील खड्याप्रमाने उचलून बाहेर टाकले पाहिजे. हे व छोटे मोठे पक्ष एकीला बाधक ठरतात. ते जगात राष्ट्रीय एकत्मतेचीं ग्वाही फिरवतात व रात्री पक्ष निर्माण करतात. "लोकां सांगे ब्रह्मज्ञान स्वत: कोरडे पाषाण" याप्रमाणे हे लोक वागतात. या देशात कुठेही पाहिले तर दोन तट सर्वत्र दिसतात. भाऊबंदकीचीं भांडणे ही जणू पाचवीलाच पूजलेली असतात. असे हे भारतीय भांडणाचा तमाशा सर्व जगाला, राष्ट्रांना दाखवीत आहेत. हे किती लांछनास्पद आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजेच पंजाबचा प्रश्न.

पंतप्रधान श्री राजीव गांधीनी घोषणा केल्याप्रमाणे भारत देश, एकविसाव्या शतकाची वाट पहात आहे भारत हे खऱ्या अर्थाने सुधारलेले व लोकशाही राष्ट्र बनविण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने झटले पाहिजे सध्या कॉम्प्युटरचे (संघणक) युग येत आहे. काळा बरोबर मानवाला पुढे गेलेच पाहिजे. "मानव जात तेवढी एक" "वसुधैव कुटुंबकम् "या दोन तत्वावर विश्वास ठेवला पाहिजे. जी आचारसंहिता प्रचारात आणावयाची ती या दोन तत्वावर अवलंबून आहे. राजकारण व धर्मकारण यांची गल्लत होता कामा नये.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षणाचे फार मोठे महत्त्व आहे. परंतु आज भारतात योग्य पद्धतीने शिक्षण दिले जात नाही,ही खेदाची गोष्ट आहे. निधर्मी लोकशाही राजवटीत राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे शिक्षण हेच एक प्रभावी साधन आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेची पुनर्रचना ही एक प्राथमिक महत्त्वाची गोष्ट आहे. भावनात्मक ऐक्य भारताच्या प्रगतीला आवश्यक आहे.

राष्ट्रीय ऐक्याचा श्रीगणेशा माणसाच्या मनातून होतो. ही क्रिया सावकाश होईल. परंतु ऐक्याची जमीन सुपीक होईल. माणसाच्या मनाची मशागत योग्य पद्धतीने झाल्याशिवाय भावनात्मक ऐक्याचे भरघोस पीक येऊच शकणार नाही. लोकांचे जीवन आधुनिक लौकिक व भौतिक शिक्षण यांनी समृद्ध केले पाहिजे. जातीयवाद हा सामाजिक दृष्टचा फारसा गंभीर स्वरूपाचा दोष उरला नाही. पण राजकारणात व शासनात मात्र जातीयवाद गंभीर स्वरूपाचा दोष ठरला आहे. लोक पवित्र कार्यांनी प्रेरित झाल्याखेरीज राष्ट्रीय ऐक्याची आशा निर्माण होणे शक्य नाही. देशातील राजकीय जीवनातील गैर प्रवृत्ती नाहीशा करण्यासाठी आपण कटिबद्ध झाले पाहिजे. आर्थिक क्षेत्रातील गाऱ्हाणी दूर करण्यासाटी योग्य ते इलाज झाले पाहिजेत. लोकांमध्ये असमाधान व अस्वस्थता राहू दिली तर आर्थिक प्रगतीत अडथळे येतील व त्यामुळे राजकीय विभाजन होणे अशक्य नाही.

भूमी वितरणाची बाब ही राष्ट्रीय नियोजनाचा एक प्रमुख भाग आहे. त्याकरिता सर्वसामान्य तत्त्व निर्माण करून व त्याचे वातावरण देशात निर्माण करून अन्नोत्पादनाचा प्रश्न सोडविला पाहिजे. व भूमिहीनांना संतोषित केले पाहिजे. हे सर्व पक्षस्वार्थापासून अलिप्त ठेवले पाहिजे. राष्ट्रीय ऐक्याच्या व एकात्मतेच्या दृष्टीने राष्ट्रनिष्ठ नियोजनाचे सबल तत्त्व प्रस्थापित करणे अत्यावश्यक आहे. नाहीतर असंतोषाच्या वातावरणामुळे देशाची शेकडो शकले पडतील हे निश्चित.

अेक राष्ट्रीयत्वाची भावना व स्थिती निर्माण करावयाला प्रत्येक माणसाला व प्रत्येक भागाला योग्य संधीं प्राप्त करून देणे हे राष्ट्रीय नियोजनाचे ध्येय असले पाहिज. प्रत्यक्ष नियोजनाची वाटचाल पहाता मागास विभागांचे समाधान होत असलेले दिसून येत नाही. या मागास भागात रोजगारीचा प्रश्न बिकट आहे. म्हणूनच तेथे असंतोषाचा धूर उडतो व त्याचे रूपांतर द्विराष्ट्रवादी भावनांना खतपाणी घालण्यात होते.

राष्ट्रध्वज, राष्ट्रभाषा, राष्ट्रगीत हे पूजनीय व आदरणीय आहेत यांची होळी केली जाते. भाषावर प्रांत रचनेतून सीमावाद निर्माण होतो. आपले राष्ट्र हे एकसंध असून त्यात कटुबीजे निंर्माण झालेली आहेत. माणूस हा पोखरला जात आहे. भाषिक वाद हा एकात्मतेला बाधक ठरला आहे.

भाषिकवाद, जातीयवाद, पंथवाद, धर्मवाद इ. वादांच्या जंजाळातून सर्वांनी मिळून एकजुटीने मार्ग काढल्या शिवाय महान् त्यागाने परिश्रमाने प्राप्त केलेल्या स्वातंत्र्याचा खरा उपभोग कोणालाच घेता येणार नाही.

✲

# कर्मवीर आणि शासकीय अनुदान

जे कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने अस्पृश्यता निवारण्याचे कार्य करतात त्यांना दरमहा रू. ३०० मानधन देण्याची एक योजना शासनाने तयार केली होती. यानुसार आण्णांना शासनाने हे मानधन देऊ केले व तशी त्यांना विनंती केली. परंतु असे मानधन स्वीकारण्यास त्यांनी साफ नकार दिला. त्यांनी शासनास उत्तर दिले– 'हिंदुस्थानात सर्व जनतेने एकोप्याने रहावे व मानवता प्रस्थापित व्हावी यासाठी माझा प्रयत्न सुरूवातीपासून आहे. नव्हे, हे कार्य म्हणजे माझा आत्मा आहे. या साठीच मी माझे जीवन समर्पित केले आहे. या कामाबद्दल मला स्वत ला पैसा मिळावा अशी मी कधीही अपेक्षा केली नाही व करणार नाही. मला आपले मानधन स्वीकारता येत नाही याबद्दल खेद होत आहे"

# ॥ कर्मण्येवाधिकारस्ते..... ॥

**विवेक ध. पांडकर**
एस्. वाय्. बी. कॉम्.

माझ्या ओळखीचे एक गृहस्थ आहेत. आहेत अगदी साधारणच! बेताचीच नोकरी, आणि त्यावर पोसणारं पाच जणांचं कुटुंब. मुंबईच्या उपनगरातील एका झोपडपट्टीतील एक खोली या पाचजणांना निवारा देण्याचे काम आज वर्षानुवर्षे करीत आली आहे. एवढया वर्णनावरून तुम्ही त्यांची गरीब माणूस म्हणून गणना केली असेल. आणि खरंय् ते. बाबुराव नाव त्यांचं! पंधरावीस दिवसातून त्यांच्याकडे चक्कर टाकल्याशिवाय मला जमतच नाही. काहीतरी हरवलेलं दुर्मिळ असं शोधण्यासाठी मी बाबुरावांकडे जात असतो. बाबुरावांकडे तुम्ही केव्हाही जा. प्रसन्नपणे हसून ते तुमचं स्वागत करतील. ते हसणं त्यांना कधी आणावं लागत नाही. कारण एकच, ते बाबुरावांचं हसणं आहे म्हणून! अर्थात शिरा, उपीट, कांदेपोहे कदाचित् पुढे येणार नाही. पण अर्धा कप चहा घेतल्याशिवाय ते तुम्हांला सोडणार नाहीत.

बाबुराव म्हणजे माझ्या दृष्टीने एक कोडे आहे. हा गृहस्थ दारिद्र्याने पिचलेला, परिस्थितीने गांजलेला. पण त्याच्या चेहऱ्यावरील टवटवीतपणा सतत चिरकाल असल्यासारखा टिकून अ.हे. कुठल्याही प्रकारचे सुखच काय पण दुरून चाललेल्या सुखाच्या वाऱ्याचा ओझरता देखील स्पर्श नसताना आणि प्रत्येक येणारी प्रभात ही दुःखाचा डोंगर होऊन येणारी असताना या माणसाच्या चेहऱ्यावर कधीही न मावळणारं सुख विलसावं हे अजबच नाही का? आणि खरं सांगू का, मी अनेक वेळा बाबुरावांकडे जातो. ते त्यांच्या चेहऱ्यावर विलसणाऱ्या शाश्वत सुखाचे दर्शन घेण्यासाठीच. आपल्याला कदाचित् विचित्र वाटेल. भंपकगिरी वाटेल.पण माझा शब्द न् शब्द खरा आहे, यात कुठल्याही प्रकारची अतिशयोक्ती नाही

बाबुरावाचं शिक्षण आठवी पर्यन्त. गेली अनेक वर्षे ते निरनिराळया ठिकाणी खाजगी नोकरी करीत आले आहेत. घरात राधा वहिनी,व थोरली मुलगी शारदा, दोन वर्षापूर्वीच तिचं लग्न झालं. सातारला ती चांगल्या घरी पडली. नंतरचा मुलगा सुधीर, लहानपणापासूनच डोळे अधू व पोलिओमुळे एक पाय कायमचा लुळा. नंतरची सविता मंदबुध्दीची. बाबुरावांकडें पाहिल्यावर कधी-कधी संताप उफाळून येतो. आणि वाटतं, नियती परमेश्वर वगैरे सगळं खोटं आहे. बाबुरावांसारख्या सज्जन माणसाने असा कोणता गुन्हा केला म्हणून नियती त्याच्याशी क्रूर चेष्टा खेळतेय. एकुलता एक मुलगा सुधीर, पण त्याच्याशीही क्रूर खेळ खेळताना तिने जराही दयामाया दाखविली नाही. सुधीर आज अठरा एकोणीस वर्षांचा आहे. पण जन्मतःच नियतीने त्याच्याशी उभा दावा मांडला आहे. डॉक्टर म्हणाले गर्भावस्थेतील कुपोषणामुळे डोळे अधू झाले आहेत. पण एवढ्यावरच तिचे धगधगते क्रौर्य शमले नाही. नंतरच्या पोलिओत तिने त्याचा सरळ उभा राहण्याचा हक्कच हिराऊन घेतला. अ णि भावावर झालेल्या दुःखाचा भार सहन करण्याचे सोडून थोडा जास्त भार पडला म्हणून दुसऱ्या पायाने वाकडेपणा धरला तो कायमचाच. शेवटी दुसऱ्या पायाच्या हट्टीपणाला कंटाळून बिचाऱ्या निर्जीव कुबडीने मदतीचा हात पुढे केला. तो आजतागायत तिने मागे घेतला नाही. डोळे अधू असल्याने वाचताना पुस्तकाची व नाकाची घसट हा त्याच्या वाचनातील अपरिहार्य भाग आहे. तरीपण नेटाने अभ्यास करून त्याने नववीपर्यंत मजल मारली हती दुसरी मुलगीं सविता ही तर मंदबुध्दीचीच निपजली होती. ती देखील आज पंधरा वर्षांची आहे. पण तिचे शिक्षण मात्र तिसरीपर्यन्तच झाले. मानसशास्त्रज्ञांच्यानुसार तिचा बुद्धिगुणांक ४० पेक्षा कमी आहे. आणि म्हणून ती तिसरीपेक्षा जास्त शिकू शकणार नाही. आणि तिचे बौद्धिक वय ५ ते ८ वर्षांच्या मुलांइतकेच राहणार.

चक्रावलात ना तुम्ही? मी देखील चक्रावलो होतो. आज अनेक वर्षं आमचा स्नेह आहे. पण मला देखील अजून त्यांच्या चेहऱ्यावरील विराजमान असलेल्या शाश्वत सुखाचे रहस्य समजले नाही कदाचित तुम्ही म्हणाल या गृहस्थाने आपली समस्त दुःखे अंतःकरणाच्या एका कप्प्यात दडवून सुखाचा मुखवटा धारण केलाय. क्षणभर मी तुमच्याशी सहमत होतो. पण शेवटी भाव मर्यादेचा प्रश्न येतो. समस्त मानसशास्त्रज्ञ या विधानास जोरदार आक्षेप घेतील. कारण मानसशास्त्राच्या सिध्दान्तानुसार कुठल्याही भावनांचे दमन करून त्याच्या विरुध्द भावना व्यक्त करण्याच्या मानसिक शक्तीला मर्यादा आहेत. शेवटी कंटाळून तुम्ही म्हणाल तुमचे ते बाबुराव कुणीतरी असामान्य व्यक्ती आहेत! आणि माझंही तेच मत आहे.

अगदी साध्या गोष्टीत बाबुराव आपले निराळेपण सिध्द करतील. उदाहरणच द्यायचे झाले तर, तुम्ही घरात एखादी नवी वस्तू आणलीत, कलर टी. व्ही फ्रीज वगैरे. सहाजिकच तुम्ही ती तुमच्या शेजाऱ्यांना व मित्रांना दाखवता. सगळेजण तुमच्या वस्तुचे कौतुक करतील. पण तुम्ही कधी त्याचे बारकाईने निरीक्षण केलेत का? तुमचे फेसरीडिंग चांगले असेल तर तुमच्या लक्षात येईल की बऱ्याच जणांच्या कौतुकाच्या भावनेत इतर भावनाही मिसळलेल्या आहेत. त्या कौतुकाला मत्सराचा किंवा हेव्याचा ओझरता का होईना स्पर्श असतो. उदाहरणार्थ, तुमच्या कलर टि. व्ही. चे कौतुक करुन शेजारी म्हणेल. "का हो केवढ्याला पडला पीस?" तुम्ही म्हणाल "चौदा हजाराला!"
"थोडासा महागच पडला! परवा आमच्या अरुणने असाच पीस आणला. पण त्याला तो साडेबारालाच पडला."
क्षणभर तुमचा चेहरा पडतो. पण लगेच तुम्ही काहीतरी सफाई पेश करता. "पण पीस एकदम गॅरंटेड आहे."
पण तुमच्या सफाईची तुमच्या शेजाऱ्याला गरज नसते. तुमच्या क्षणभरच का होईना पडलेल्या चेहऱ्यानें त्याच्यातील मत्सराची भावना शांत होते. अर्थात ही मुलभूत मानवी भावना आहे. पण बाबुराव याला अपवाद आहेत. माझा स्टिरीओ पाहून खुश झालेल्या बाबुरावांच्या चेहऱ्यावर असं कधी जाणवलं नाही, की त्यांच्याकडे साधा रेडिओ सुध्दा नाही अशी खंत त्यांना चाटून गेलीय. त्यांनी खरोखरच मुक्त कौतुक केलंय. हे केवळ वस्तूच्याच बाबतीत नव्हते. माझ्या मुलांना परीक्षेत चांगले यश मिळाल्याचे पाहून माझ्याइतकाच किंबहुना माझ्यापेक्षा जास्त आनंद बाबुरावांना होत असे आणि माझे पेढे येण्याअगोदर बाबुराव पेढे घेऊन हजर असत. एक मात्र खरं की बाबुरावांकडून पेढे घेताना मनात कुठेतरी अपराधीपणाची भावना डोकावयाची. सुधीरची मूर्ती हटकून डोळ्यांसमोर उभी रहायची आणि उगीचच अपराधी वाटायचं. एकुलता एक मुलगा पण देवानं केवढा क्रूर घाव घातला होता. केवळ पांगळा असता तरी चाललं असतं. निदान शिकून सवरून तो स्वतःच्या पायावर उभा राहिला असता. पण डोळे एकदम अधू असल्याने हीही शक्यता नव्हती. आणि अशाही परिस्थितीत या गृहस्थाला काहीच कसं दुःख होत नाही?

पण परवा मात्र अघटित घडलं. आज अनेक वर्षांच्या सहवासात जे पहायला मिळाले नाही. ते पहायला मिळाले. परवा ऑफिसमधून घरी आलो. पहातो, तर बाबुराव सचिंत मुद्रेने सोफ्यावर बसले होते. मला पाहताच हसून म्हणाले "या, तुमचीच वाट पहात होतो." पण ते हसणं कसलं होतं, हसण्याचा प्रयत्न होता. नेहमीचा प्रसन्नपणा त्यात नव्हता. मनात असंख्य शंका कुशंकांनी काहूर माजवलं. आज कधी नव्हे ते दुःखाचं सावट बाबुरावांच्या चेहऱ्यावर पडलं होतं.
"सुधीर एकदम सिरीयस आहे." बाबुरावांनी रूद्ध कंठाने सांगितले.
"केव्हापासून?"
"दहा दिवसापासून! आज डॉक्टरांनी सांगितले. त्याच्या दोन्ही किडनीज् फेल गेल्यात." बाबुरावांच्या गरम अश्रूंचा माझ्या हाताला स्पर्श झाला.
"दहा दिवसापासून सिरीयस आहे.,,? अन् तुम्ही मला आत्ता सांगताय? आणि तेही केस या स्टेजला आल्यानंतर!" मी ओढतच बाबुरावांना बाहेर काढले.

मी डॉक्टरसमोर खुर्चीत बसलो होतो. डॉक्टर मान हलवत बोलत होते. पण तिची हलण्याची दिशा बाबुरावांच्या काळजाला घरे पाडीत होती. "डॉक्टर!" मी विचारले, "डायलीसिसचा उपयोग नाही का होणार?" "होईल! पण किती दिवस तुम्ही डायलीसिस करणार.?" "पण डॉक्टर, एक नवी किडनी बसवून नाही का चालणार?" "चालेल! पण अवघड आहे. सगळी सिस्टीम खराब झालीय."

नवीन किडनी प्लँट करणे कितपत शक्य होईल, हे सांगता येणार नाही." माझा धीर खचत चालला. पण कसा बसा मी डॉक्टरांना म्हणालो,"डायलीसिस करा! चार दिवस आणखी औषधे देऊन सिस्टीम सुधारली तर बघा." "ठीक आहे! But I con't say anything, at this moment!" "ठीक आहे!"

तीन दिवस मी हॉस्पिटलमध्येच होतो. राधा वहिनींना रडे आवरत नव्हते, तर बाबुरावांच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. कुठल्या सत्वपरीक्षेतून त्यांना जावे लागत होते, हे केवळ राजा हरिश्चंद्रालाच माहीत! आणि चवथ्या दिवशी संध्याकाळी सत्वपरीक्षेंने कडक स्वरूप धारण केले. बाबुरावांचा शेजारी धावत धावत एक बातमी घेऊन आला. "सविता ट्रक ॲक्सिडेंटमध्यें सापडली आणि जागीच ठार झाली." धाडकन् आवाज झाला. राधा वहिनी उभ्या उभ्याच कोसळल्या. बाबुरावांचा निश्चल पुतळा झाला. त्या रात्री खूप उशिरा तिचा मृतदेह शवागारातून घरी आणला. सकाळी तिचे क्रियाकर्म उरकून आम्ही पुन्हा हॉस्पिटलमध्ये हजर झालो. राधावहिनींच्या डोळ्यांची धार थांबत नव्हती. बाबुराव दुःखाचा कढ एकदम बाहेर पडेल म्हणून बोलण्याचे टाळत होते. दुसऱ्या दिवशी सकाळीं डॉक्टरांनी मला केबिनमध्ये बोलवून घेतले. किडनी प्लँटेशनचे विचार डोक्यात होते. मी तसाच केबिनमध्ये घुसलो. डॉक्टरांची मुद्रा निश्चल होती. एक प्रकारची नकारात्मक छटा त्यावर होती. शक्य तेवढ्या मृदु आवाजात त्यांनी सांगितले,"It's of no use! I am so sorry"

अधिक काही न बोलता बाहेर आलो. आणखी दोन दिवस गेले. सुधीरची तब्येत आणखी बिघडली. रक्तशुध्दीकरण थांबल्याने विषारी द्रव्याची तीव्रता वाढत चालली. बाबूराव, राधावहिनी असाहय्यपणे मुलाचा बदलता रंग पहात होते. त्याच्या अश्रू डोळ्यांतील ज्योत अंधुक होताना पहात होते. मलाही गलबलून आले. डोळ्यांत साचणारे अश्रू बाहेर पडू न देण्याचे आटोकाट प्रयत्न करीत होतो. पण शेवटी परमेश्वरी इच्छा श्रेष्ठ ठरली. संध्याकाळी सुधीरच्या डोळ्यांतील ज्योत मालवली. राधावहिनींनी हंबरडा फोडला. पण रडे कोसळण्यासाठी अश्रूंचा साठा केव्हाच संपला होता. बाबुराव मला मिठी मारून हुमसून हुमसून रडत होते. माझ्याही काळजाचे पाणी पाणी झाले. दु:खी अंत:करणाने मी शेवटी सुधीरला निरोप दिला. त्याच्या धगधगत्या चितेकडे आम्ही विषण्णपणे पहात होतो. या जगात परमेश्वराचे अस्तित्वच नाही असे मन आक्रंदून सांगत होते.

दोन महिन्यानंतरची घटना! नेहमीप्रमाणें ऑफिसमधून घरी आलो. बाबूराव सोफ्यावर बसले होते. क्षणभर माझा माझ्यावर विश्वासच बसेना! बाबूरावांच्या चेहऱ्यावर तेच ते प्रसन्न हास्य होते मनात विचार आला, एवढ्या अल्पावधीत या गृहस्थाने दुःखाचे सात समुद्र कसे पार केले? तोच बाबूराव म्हणाले, "तुमच्याकडे निधी मागायला आलोय. सध्या मी वनवासी विकास संस्थेचे कार्य करतो आणि त्यासाठी मला तुमच्याकडून देणगी पाहिजे." मी तर पुरताच चक्रावलो. एकदम एक विचार मनात आला. कदाचित बाबुरावांना सुटलो एकदाचे असे तर वाटत नसावे? सुधीर आणि त्याहीपेक्षा सविता आयुष्यभर त्यांना दुःखाशिवाय काही देऊ शकले नसते. बाबुरावांशी स्पष्ट बोलावे म्हणून मी सरळ विचारले, "बाबूराव! सुधीर आणि सविता गेल्याने तुम्हाला अगदी सुटका झाल्यासारखे ········" पटकन बाबुरावांनी माझ्या तोंडावर हात ठेवला. त्यांच्या डोळ्यांत एकदम अश्रू उभे राहिले. "तसं नाही रे बाबा! तुला काय वाटतं? मी सुधीर आणि सविताला कंटाळलो होतो? पण तसं नाही! ते होते म्हणून तर मी सुखी होतो." मला विस्मयाचा आणखी एक धक्का!

"खरं सांगू का? त्या दोघांचं सर्व काही करताना मला आनंद होत होता. त्यांच्याकडे लक्ष देणे हे माझें कर्तव्य होते. ते कर्तव्य मी सर्वस्व पणाला लावून पूर्ण करीत होतो त्याचं सुख काय वर्णावं? ····"बाबूराव आणखी सांगतच राहिले. माझ्या मनात परवा शास्त्रीबुवांनी केलेले भगवद्गीतेवरील प्रवचन ऐकू येत होते. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'

बाबूरावांनी मारलेल्या हाकेनें मी भानावर आलो. "मग किती निधी देताय् बोला?" मी निमूटपणे पाकिटातून सर्व नोटा काढून दिल्या व पावती फाडली. अजिजीच्या स्वरात बाबूराव म्हणाले, "बरं निघतो मी! मला संस्थेच्या मिटींगला जायचंय" आणि एवढं बोलून ते गेले देखील मी अजून भानावर आलो नव्हतो. "कर्मण्येवाधिकारस्ते ··········"! गीतेचा श्लोक कानतां घुमत होता.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती





**एस्.पी. चव्हाण**
(विद्यापीठ प्रतिनिधी)



**कु. शुभांगी फरसोळे**
आय्.सी.एस्.आर. व विभागीय खेळाडू
बॅडमिन्टन



**एस्.पी. झगडे**
आय्.सी.एस्.आर. व
विभागीय खेळाडू, कुस्ती,
मल्लखांब व मैदानी स्पर्धा



**ए.डी. सातव**
कबड्डी (पुणे विद्यापीठ संघात निवड)
व प्रतिनिधी, इंडियन गेम्स्



**कु. आशा गोसावी**
नियतकालिक प्रतिनिधी



**बी.एम्. होनराव**
कुस्ती (पुणे विद्यापीठ संघात निवड)

## वर्ग-प्रतिनिधी



ए.डी. बनकर
एफ्.वाय्.बी.ए.



के.एम्. झांबरे
एफ्.वाय्.बी.एस्सी.



डी.एम्. मदने
एफ्.वाय्.बी.कॉम्.



ए.व्ही. नेवसे
एस्.वाय्.बी.एस्सी.



बी.व्ही. धवडे
एस्.वाय्.बी.कॉम.



जे.के. बडवे
टी.वाय्.बी.एस्सी.



आर्.एस्. बागवान
टी.वाय्.बी.कॉम.



एस्.के. गावडे
एम्.ए.



एस्.एच्. पोंदकुले
एम्.कॉम्.

## विद्यार्थी-प्रतिनिधी



एल्.एम्. कोकरे
ग्रंथालय



आर.आर. झगडे
सहल



सी.एन्. आंबेकर
सांस्कृतिक कार्यक्रम



कु. सुनीता धुमाळ
विद्यार्थिनी प्रतिनिधी व
विभागीय खेळाडू , मैदानी स्पर्धा



डी.बी. गुजर
क्रिकेट व विभागीय
खेळाडू , क्रिकेट



एस्.के. टकले
कुस्ती व विभागीय
खेळाडू , कुस्ती



कु. ज्योती मरकाळे
वादविवाद



आंतरमहाविद्यालयीन : क्रिकेट संघ : उपविजयी

## आंतर विभागीय क्रीडा स्पर्धक


एम्.एन्. शितोळे
खोखो


एस्.ए. साळवे
खो खो


एस्.आर. राठोड
खो खो


एच्.सी. माने
खो खो व मैदानी स्पर्धा


डी.के. निंबाळकर
मलखांब


ए.एस्. सांगळे
मलखांब.


के.एम्. पोटे
खो खो व शरीर सौष्ठव


एन्.आर. चव्हाण
खो खो


ए.डी. म्हस्के
बास्केट बॉल


व्ही.एम्. खाडे
बास्केट बॉल


पी.पी. चौगुले
बॅडमिंटन

## आंतर विभागीय क्रीडा स्पर्धक


एम्.एम्. झाडबुके
क्रिकेट


एन्.आर. सुखडे
क्रिकेट


ए. एस्. जाधव
क्रिकेट


डी.आर. चितळे
क्रिकेट


आर्.आर्. काळकुटे
कबड्डी


एम्.व्ही. सय्यद
कबड्डी


एस्.एल्. कांबळे
बास्केटबॉल व हँडबॉल


एस्.डी. कुलकर्णी
बॅडमिंटन


एम्.जी. शहा
बॅडमिंटन


एच्.एस्. सोमाणी
बुद्धिबळ


आर.सी. बाफना
बुद्धिबळ व बास्केटबॉल

## आंतर विभागीय क्रीडा स्पर्धक



कु. वर्षा शहा
व्हॉलीबॉल



कु. अनिता दोशी
व्हॉलीबॉल



कु. स्मिता पोळ
व्हॉलीबॉल



कु. शुभांगिनी पाटसकर
व्हॉलीबॉल व कबड्डी



कु. मंदा जाधव
व्हॉलीबॉल,



कु. सौदामिनी गोरे
व्हॉलीबॉल



कु. प्रीती काळे
बॅडमिंटन



कु. स्वाती गरगटे
बॅडमिंटन



कु. आशा सातव
मैदानी स्पर्धा

## आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा विजयी संघ





कुस्ती



खो खो

## आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा : विजयी संघ

मलखांब





बॅडमिंटन

बुद्धिबळ



आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा : विजयी संघ

बॅडमिंटन





व्हॉलीबॉल

बास्केटबॉल, (उपविजयी)



## राष्ट्रीय छात्रसेना



**पी.एस्. आहुजा**
ज्यूनियर अंडर ऑफिसर,
२६ जानेवारी १९८७ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या
दिल्ली येथील संचालनात सहभाग



**ए.आर. वाघ**
सीनियर अंडर ऑफिसर



**सी.एस्. शहा**
ज्यूनियर अंडर ऑफिसर



**एम्.पी. सावंत**
कंपनी क्वार्टर मास्टर



**मा. प्राचार्यांसमवेत रँक होल्डर्स**

## उज्ज्वल यशाचे मानकरी



**डॉ. एल्.एस्. कदम**
माजी विद्यार्थी, पुणे विद्यापीठात
एम्.डी. परीक्षेत प्रथम श्रेणीत प्रथम



**ए.एच्. गुंजाळ**
एम्.ए. (इतिहास)



**कु. लता नालंदे**
एम्.कॉम्.

**महाविद्यालयात प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांक**



**कु. संगीता मेहता**
बी.ए. (राज्यशास्त्र)



**एस्.व्ही. गाडेकर**
बी.एस्सी. (प्राणीशास्त्र)



**कु. संगीता बेलपत्रे**
बी.कॉम्. (अकौन्टन्सी)

## पाहुण्यांचा सत्कार



मा. बी.एस्. मोहिते,
पोलीस अधीक्षक (पुणे ग्रामीण)



मा. भाऊसाहेब वानखेडे,
उपविभागीय अधिकारी, बारामती
हस्ते : जंबुकुमार शहा

## विद्यापीठ खेळाडूंचा सत्कार



बी.एस्. होनराव



ए.डी. सातव

हस्ते : मा. बी.एस्. मोहिते



ज्यू. अंडर ऑफिसर, पी.एस्. आहुजा
यांचा मा. बी.एस्. मोहिते यांचे हस्ते सत्कार



विद्यापीठ प्रतिनिधी एस्.पी. चव्हाण,
मा. भाऊसाहेब वानखेडे यांचेकडे दुष्काळनिधी सुपुर्द करताना





अर्जुन ॲवॉर्ड विजेती कु. सुरेखा कुलकर्णी,
यांचा मा. जंबुकुमार शहा यांचे हस्ते सत्कार



कु. सीमा वेलपत्रे गुणवत्ता पारितोषिक स्वीकारताना
हस्ते : मा. भाऊसाहेब वानखेडे



कु. संगीता मेहता



कु. निर्मला भुसे

गुणवत्ता पारितोषिक स्वीकारताना हस्ते : मा. भाऊसाहेब वानखेडे

## कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व-स्पर्धा



वादस्पर्धा ढाल स्वीकारताना कु. मेघना देशपांडे
व किशोर ढमाले मॉडर्न महाविद्यालय, पुणे.



वक्तृत्व स्पर्धा ढाल स्वीकारताना कु. मेघना देशपांडे,
मॉडर्न महाविद्यालय, पुणे.

## प्रासंगिक कार्यक्रम



वृक्षारोपण : श्री. मा.तु. शहा, कोषाध्यक्ष



छात्रसेना पथकाचे निरीक्षण मा. जंबुकुमार शहा, अध्यक्ष, स्थानिक समिती



वृक्षारोपण



ध्वजारोहण

हस्ते : मा. जंबुकुमार शहा






राष्ट्रीय छात्रसेना  रक्तदान  राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक स्नेह-संम्मेलन



बातमीपत्र वाचन



कलाप्रदर्शन उद्घाटन - कु. धुमाळ



एकांकिका : चोर आलेच पाहिजेत



समूह नृत्य





बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स कोर्सचे उद्घाटन :
हस्ते प्राचार्य धर्माधिकारी, इन्स्टि. ऑफ टेक्नॉलॉजी, माळेगांव (बारामती)



मा. प्राचार्यासमवेत प्रोग्रॅम ऑफिसर व गटप्रमुख




बऱ्हाणपुर येथे श्रमदानाने बांधलेले स्टेज



बऱ्हाणपुर येथील शिबिराचे उद्घाटन
हस्ते : श्री. व्ही.डी. जगताप





बऱ्हाणपुर येथील शिबिरात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व उपस्थित वैद्यकीय पथक,

# साक्षरता – एक जन आंदोलन

प्रमोद एल्. धुमाळ
टी. वाय. बी. कॉम्

स्वातंत्र्यपूर्व काळात म. गांधींनी साक्षरतेचे महत्त्व ओळखले होते. देशाला स्वातंत्र्य मिळवायचे तर त्यासाठी भारतीय जनता साक्षर हवी. ही जाणीव ठेवूनच गांधीजींनी कार्यकर्त्यांना साक्षरतेचे वर्ग घ्यायला प्रवृत्त केले होते. त्यानुसार देशातील राष्ट्रीय चळवळीशी संबंधित संस्था संघटना आणि कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने साक्षरतेचे काम मोठ्या प्रम णावर करीत होते.

स्वातंत्र्यानंतर खरे तर आपल्या साऱ्या शिक्षणपध्दतीत फार मोठा बदल आवश्यक होता. देशातील निरक्षर आणि अज्ञानी जनतेला बरोबर घेऊन विकासाची वाटचाल करावयाची तर निरक्षरता निर्मूलनाचा कार्यक्रम युध्दपातळीवर घेण्याची अतिशय आवश्यकता होती. कारण आपण स्वतंत्र झालो .तेव्हा आपल्या देशात साक्षरतेचे प्रमाण केवळ १४ टक्के होते. परंतु दुर्दैवाने शिक्षणाबाबत मुलभूत स्वरुपाचा विचार करून मर्तमान शिक्षण पद्धतीत आवश्यक त्या नियोजनाचा अवलंब न करता विकासाच्या योजना जनतेसमोर मांडण्यात आल्या. शिक्षणप्रसाराकडे थोडे दुर्लक्ष झाल्याने त्याचा परिणाम भारतात निरक्षरता मोठ्या प्रमाणात वाढण्यात झाला.

२६ जाने १९५० मध्ये भारताच्या सार्वभौम प्रजाकसत्ताकाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. घटनेने भारतीय जनतेला प्रौढ मतदानाचा फार मोठा हक्क बहाल केला. भारतीय जनतेने आपला हा मतदानाचा हक्क बजावून लोकशाही पध्दतीने या देशाचे नेतृत्व करावे अशीच आमच्या घटनाकारांची अपेक्षा होती. प्रौढांना मतदानाचा हक्क दिला, परंतु त्या प्रौढांना त्या हक्काचे मोल कळावे म्हणून आवश्यक त्या शिक्षणाचा मात्र विचार झाला नाही. त्यामुळें दुर्दैवाने आमच्या ह्या सार्वभौम जनतेला अजही मतदानाच्या वेळी चित्रावर शिक्का मारून मतदान करावे लागते.

प्रथम एप्रिल १९७७ मध्ये प्रौढ शिक्षणासंबंधी एक धोरण विषयक निवेदन सादर केले. बहुसंख्य समाजाला सहभागी होता येत नसल्यामुळे देशातील विकासाची प्रक्रिया गतिहीन झालेली आहे, हे निवेदनात स्पष्ट केले गेले. एकूण लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण केवळ ३० टक्के असताना द्रुतगतीने आर्थिक विकास साधण्याची आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची आशा फोल ठरणार आहे. शिक्षण हीं वरच्या वर्गाची मिरास झालेली आहे समाजातील उपेक्षित लोकांपर्यंत शिक्षण पोहचू शकलेले नाही. या उपेक्षित लोकांपर्यन्त शिक्षण पोहचले तरच त्यांना आपल्या निकृष्ट आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत काही सुधारणा घडवून आणता येतील. समाज ज्या प्रमाणात साक्षर होईल त्या प्रमाणात राष्ट्रीय विकास साधता येईल ही जाणीव ठेवूनच हा प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम तयार करण्यात आला.

देशातील गरीब आणि दुर्बल घटकांना आपल्या परिस्थितीची योग्य जाणीव व्हावी आणि त्यांना योग्य शिक्षण देऊन ही परिस्थिती बदलण्याचीं क्षमता त्यांच्यात निर्माण व्हावी हा या प्रौढ शिक्षणाच्या नवीन संकल्पनेमागील मुख्य दृष्टीकोन आहे. या जाणिवेतून प्रौढांना कुटुंबाचा घटक म्हणून, देशाचा नागरिक म्हणून आपल्या कार्यात योग्य सुधारणा करता यावी आणि नागरी जीवनातील आपले अधिकार आणि कर्तव्ये पार पाडता यावीत अशी अपेक्षा ठेवून या नवीन कार्यक्रमाची कार्यवाही सुरू करण्यात आली.

राष्ट्रीय विकासाला योग्य चालना देण्यासाठी नवीन समाजरचना निर्माण करण्यासाठी जनता शिक्षित आणि संघटित होणे अतिशय जरूरीचे आहे त्यासाठी प्रौढ

शिक्षणाचा कार्यक्रम हेच अतिशय प्रभावी साधन आहे. नवी समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कार्यात गरीब आणि दबलेंल्या जनतेचा पुढाकार अतिशय महत्वाचा आहे. प्रौढ शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता व अंकज्ञान नव्हे, तर त्याबरोबरच जाणीवजागृती आणि कार्यात्मकता या दोन नव्या उद्दिष्टांचा समावेश करण्यात आला आहे.

पंतप्रधान राजीव गांधींनी साक्षरतेचे महत्व जाणून शिक्षण आराखड्यात या कार्यक्रमाकडे देशाचे लक्ष वेधले आहे. गेल्या १५ ऑगष्टपासून 'कार्यात्मक साक्षरतेसाठी जनआंदोलन' या नावानें देशभर एक मोठा कार्यक्रम विद्यापीठांच्या पातळीवर प्रथमच सुरू झाला आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी २ ते ५ निरक्षर प्रौढ निवडून त्यांना साक्षर करण्याचा हा कार्यक्रम आहे. ह्या कार्यक्रमाकडे आपण जे मूठभर सुशिक्षित आहोत त्यांनी अंतर्मुख होऊन पहायला हवे. आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण ६०टक्के आहे. जगातील ५० टक्के निरक्षरता आपल्या देशात आहे. या परिस्थितीत बदल झाला नाही तर इ.स. २००० मध्ये जगातील १५ ते१९ वयोगटातींल ५४ टक्के निरक्षर एकट्या भारतात आढळतील. हे अज्ञानाचे ओझे पाठीवर असताना देश प्रगतीपथावर कसा राहणार?

भारत हा मुळातच खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतात सुमारे ५ लाख ७६ हजार १२६ खेडी व सुमारे २ हजार ६९० शहरे आहेत. तसा विचार केला तर खेडयात ८२ ते ८५ टक्के लोक राहतात. दारिद्र्यात राहणाऱ्या या खेड्यांतील जनतेचे दारिद्र्य काही प्रमाणात कमी करावयाचे असेल तर साक्षरतेचे हे आंदोलन जनतेचे आंदोलन झाले पाहिजे. ते खेड्यांतून प्रथम झाले पाहिजे.

आर्थिक परिस्थिती बाबतची आकडेवारी पाहिली तर भारताला कमी आर्थिक विकास झालेल्या देशांच्या पंक्तीला बसावे लागेल. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात शिक्षण संस्था उघडण्यात आल्या. परंतु शाळेच्या वयाची सुमारे ६० टक्के मुले आर्थिक परिस्थितीमुळे शाळेत जाऊ शकत नाहीत. या मुलांचे पालक निरक्षर असल्यामुळे शिक्षणाने आपली परिस्थिती बदलू शकते, हे त्यांना समजत नाही.

उत्पन्न वाढवण्यासाठी सध्याच्या जगात वेगवेगळी माहिती तसेच कौशल्ये आवश्यक असतात. तसेच दारिद्र्यामुळे झालेली मनाची मरगळ घालवणे आवश्यक असते. संकटाची भीती, हताशपणाची वृत्ती, दैवावर भरवसा, अंधश्रद्धा आणि धर्माच्या आवरणाखाली दडलेल्या रूढींचा जबरदस्त पगडा यातून या गरीब माणसाच्या सुटकेसाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे, माध्यम आहे. शेतीविषयक अत्याधुनिक ज्ञान तसेच आरोग्य विषयक महत्वही शिक्षणाशिवाय समजू शकत नाही.

जगातील मान्यवर अर्थ तज्ञांनी केलेल्या अभ्यासावरून असे आढळते की जेथे शेतकरी कामकरी वर्गाला भाषा अंकज्ञान, व्यावसायिक तसेच सामाजिक कौशल्य अवगत आहेत आणि नागरिकत्वाच्या हक्काची आणि कर्तव्याची बऱ्यापैकी जाण आहे, तेथे आर्थिक विकास झपाट्याने झाला आहे. आशिया खंडातील काही उदाहरणे बोलकी आहेत. चीनमध्यें गेल्या ३७ वर्षात साक्षरतेचे प्रमाण २० टक्या वरुन ८० टक्कयावर गेंले आहे. फिलिपिन्स, क्यूबासारखे देश साक्षरतेच्या दृष्टींने आघाडीवर आहेत.

साक्षरतेच्या या जनआंदोलनामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. 'कार्यात्मक साक्षरतेसाठी जनआंदोलन' या नावाने नुकताच एक मोठा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. भारतातील युवाशक्तीस ह्या कार्यक्रमामध्ये सहभागी करुन घेतले आहे. त्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या शक्तीचा फायदा या कामी घेंण्याची योजना आखण्यात आली आहे. त्यामध्ये १९८६-८७ या शैक्षणिक वर्षात संपूर्ण भारतातील राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांपैकी दोन लाख व त्याशिवाय १ लाख विद्यार्थी या योजनेत सहभागी करुन घेतले आहेत. त्यांनी प्रत्येकी ५ प्रौढांना साक्षर करावे ही अपेक्षा या योजनेत ठेवलेली आहे. या राष्ट्रीय कार्यक्रमात युवाशक्तीचा सहभाग यशस्वीरित्या पूर्ण करता आला तर फार मोठे राष्ट्रीय कार्य पार पाडता येईल यात शंका नाही. त्यासाठी त्यांना प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे.

आमच्या विद्यार्थी बांधवांनी आपल्याला महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत पोहचता आले म्हणून स्वतःला भाग्यवान समजायला हरकत नाही. परंतु त्याच बरोबर त्यांनी आपल्या दुर्भागी अशा निरक्षर बांधवांना हाताला धरुन उचलले तरच ह्या देशात समता, सामाजिक न्याय, बंधुता, व्यक्तिप्रतिष्ठा, स्वतंत्रता आणि लोकशाही ही जीवनमूल्ये सर्वांना अनुभवता येतील. मूठभर लोकांनी शिक्षण घेऊन सांभाळण्यासारखी आर्थिक आणि सामाजिक स्थिती आता उरलेली नाही. देशविकासाचा गाडा सर्व जनतेने मिळूनच पुढे नेला पाहिजे ही सत्य परिस्थिती आहे.

साक्षरतेचा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशिक्षित युवकांनी सीमेवर लढणाऱ्या सैनिकाप्रमाणे युध्दपातळीवर ह्या कायक्रमात सहभागी झाले पाहिजे. आता तशी संधी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाच्या माध्यमातून युवकांस दिली गेली आहे. स्वामी विवेकानंदांनीही युवाशक्ती देशाचे भवितव्य घडवू शकेल असा विश्वास व्यक्त केला आहे. ते म्हणतात, 'सबळ, कार्यप्रवण, विश्वासू व पाठीच्या कण्यासारख्या ताठ, प्रामाणिक युवाशक्तीची गरज आहे. असे शंभरच तरुण जगामध्ये क्रान्ती करण्यास पुरेसे आहेत. असे युवक व यवती भारतीयांचे जीवन उंचावण्यासाठी हृदय व मन ओतून काम करतील " स्वामी विवेकानंदांचा विश्वास आता युवकांनी सफल करावयाचा आहे.

प्रौढ शिक्षणाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात सर्वसामान्य जनता आणि विद्यार्थी यांचा सहभाग अति महत्त्वाचा आहे. प्रौढ शिक्षणाच्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना संपूर्ण समाजच जागृत करण्याची संधी मिळाली आहे. या कामी विद्यार्थ्यांनी समाजाला प्रौढ शिक्षणाचे महत्व समजावून द्यायला हवे. यासाठी प्रथमतः या कामावर विद्यार्थ्यांची निष्ठा, विश्वास हवा. काम यशस्वी करण्याचा दृढनिश्चय हवा, चिकाटी हवी.तरच कार्यक्रम यशस्वी होईल. प्रौढ शिक्षणाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात विद्यार्थ्यांवर फार मोठा विश्वास टाकलेला आहे. सक्तीने जेवढे काम होते त्यापेक्षा शंभर पटीने चांगले काम विश्वासाने होत असते. यासाठी या विश्वासास पात्र होण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे. अशा प्रकारचा विश्वास पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी ९ मे १९८६ रोजी दिलेल्या संदेशात व्यक्त केला आहे. शिक्षण लोकांना भरीव व आंतरिक ताकद देते व त्याच बरोबर त्यांच्या जवळील कौशल्यात वाढ करण्यास मदत करते.

साक्षरता आंदोलन हे केवळ विद्यार्थी मित्रांनीच केले पाहिजे असे नाही; तर विशेषतः १५ ते ३५ ह्या वयोगटातील लोकांची निरक्षरता दूर करण्यासांठी संपूर्ण राष्ट्राने प्रतिज्ञा केली पाहिजे. केंद्रसरकार,राज्यसरकार, राजकीय पक्ष, आणि त्यांच्या पाठोपाठ मोठमोठ्या संघटना, जनसंपर्क माध्यमे आणि शैक्षणिक संस्था यांनी मोठ्या प्रमाणावर साक्षरता प्रसाराचे विविध कार्यक्रम हाती घ्यायला कटिबध्द झाले पाहिजे. या कार्यक्रमांत शिक्षक, विद्यार्थी, तरुण, सेवाभावी संस्था इत्यादींना विविध संशोधन संस्थांच्या साह्याने मोठ्या प्रमाणावर सहभागी करुन घेतले पाहिजे.

भारतातील वाढती बेकारी, तसेच शहरी भाग व ग्रामीण भाग यामध्ये साक्षरतेची जी दरी आहे ती कमी केली पाहिजे. ग्रामीण भागातील निरक्षरता कमी करुन भारतातील खेड्यातील सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगती व्हायची असेल तर त्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी साक्षरता जनआंदोलनाला गती येणे अत्यंत जरुरीचे आहे.

आपल्या भारत सरकारने निरक्षरता निर्मूलनासाठी व प्रौढ शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी योग्य ती पावले उचलली आहेत. देशातील साक्षरतेचे प्रमाण जलद गतीने वाढता यावे ह्यासाठी अनेक कार्यक्रम तयार करण्यात येत आहेत. कारण तज्ज्ञांच्या मतानुसार आहे. याच गतीने आपण गेलो तर ह्या शतकाअखेर जगातील निम्मे निरक्षर भारतात असतील. ही गोष्ट देशाच्या व व्यक्तीशः आपल्या हिताच्या दृष्टीने अत्यंत धोक्याची भीती ओळखून केंद्र सरकारने १९९० पर्यन्त ही भारतातील सर्व नागरिकांना साक्षर आहे. करण्याचे धोरण आखले आहे. मात्र हे काम एकट्या सरकारचे अगर विदयार्थी तरुणांचे नाही. यात समाजातील सर्व घटकांचा सहभाग अत्यावश्यक मानला आहे. त्या दृष्टीने स्वतःचे काम समजून सर्वांनीच ही योजना यशस्वी करण्यासाठीं हातभार लावण्याची गरज आहे. हया कार्यक्रमाच्या योग्य अम्मल बजावणीसाठी तुम्हा आम्हा सारख्या सुशिक्षित बांधवांचे सहकार्य अपेक्षित आहे ह्यासाठी आमच्या विद्यार्थी बांधवांनी ह्या कार्यात आघाडीवर राहुन आपला देश शिस्तबध्द. सामर्थ्यवान, साक्षर बनविण्यासाठी प्रतिज्ञा करुन साक्षरतेच्या जनआंदोलनात सक्रीय सहभागी होऊन साक्षरता आंदोलन गतीमान बनविले पाहिजे. ★

# कैफियत एका प्रियकराची

दस्तगीर मुल्ला
टी. वाय. बी. एस्सी.

Oh my sweet dream
Lot of things change
One thing changes
The memory of those days
When we were together

Man can avoid the temptation of money but not of love. when he overcomes that he is successful.

असं कुणीतरी म्हंटलंय, पण मुळात प्रेम हे लक्षात ठेऊन होत नाही, आणि विसरावे म्हणून विसरत नाही. आपल्याला हवं असलेलं जिवाभावाचं माणूस भेटलं की, ते जी किमया करतं ती खरचं लाजवाब असते. 'प्रेम' दोनच अक्षरे पण त्यातच इतकी अद्‌भुत शक्ती असते की एका क्षणात जीवनाचा तो आनंद, जो कितीही पैसे देऊन विकत मिळत नाही, तो अनुभवायला मिळतो. आपलं आवडतं माणूस भेटलं की स्वप्ननगरीत वावरल्याचा भास होतो. तुझ्या सहवासातील ते मधूर क्षण, अविस्मरणीय घटना, एकमेकांना पाहण्याची आतुरता, नजरोंसे नजर मिलानेका तरीका, सारं लाजवाब.

भा. रा. तांबे म्हणतात,
लोकी मोहविती शशी, रवि तसे रत्ने असे सांगती ।
ओवाळीन तुझ्यावरुन सकला, नाही तयांची क्षिती।।
त्वत् प्रेमे कमलास ये कमलता, इंदूस इंदूत्व ये ।
रत्ना रत्नपणा तुझ्याविण, असे निःशब्द सारे प्रिये ।।

प्रेमाचं माणूस नसलं की सारं जग व्यर्थ असल्या सारखं वाटतं. खरंच हे अविस्मरणीय प्रेम मी तुझ्यावर केलं. तू आणि मी प्रेमाचे धागे एकत्र विणून, त्यांची सुरेख भावनेची चित्रे ह्रदयावर रेखाटली. खरच माझ्या प्रेमामध्ये वादळाची धडपड नव्हती, पण शांतपणे हलणाऱ्या भावनारुपी पानांचो सळसळ होतो. बिजलींची प्रखरता नव्हती पण शांतपणे तेवणाऱ्या नंदादीपाचा प्रकाश होता. समुद्राचा खळखळाट नव्हता, तर शांतपणे हलणाऱ्या लाटांचे नर्तन होते. पण माझे प्रेम तू कधीच समजावून घेतले नाहीस.हा समाज, जळणारे लोक या सर्वांना क्षणभर विसरुन आपण ह्रदयाच्या रुमालावर भावनांची सुरेख चित्रे विणून निर्माण केली.तू मला विसरलीस पण मी तुला कसा विसरु? पण आता याचा काय उपयोग? कारण त्याचवेळी हे क्षणभंगूर आहे हे कळले असते तर! खरं तर मीच महाचूक केली, कारण तुझ्या ह्रदयाचा पूर्ण अंदाज न घेता तुझ्यावर विश्वास टाकला. तेव्हाच शहाणा झालो असतो तर! तू आडून सुचविले असते तर! पण मीच वेडा! कारण त्या क्षणभंगूर प्रेमात मी भविष्यकाळाचा विचार करण्याच्या मूडमध्येच नव्हतो ना? 'सितारोंकी मैफिलने करके इशारा कहा, अब तो सारा जहाँ है तुम्हारा' अशी माझी अवस्था होती. "तुम्हें पाके हमने जहाँ पा लिया है।" असा विश्वास होता 'म्हणूनच "तुम अगर साथ देनेका वादा करो, मैं यूँ ही मस्त नग्में सुनाता रहूँ" असे मी वचन दिले. प्रेमाच्या आवरणामुळे जे स्पष्ट होते ते अस्पष्ट झाले, जे व्यक्त होते ते अव्यक्त झाले. तसेच तुझ्या प्रेमामुळे मी सत्य विसरलो. प्रेमामध्ये पैसा प्रतिष्ठा आड येतात, समाज विरोध करतो, स्त्री अप्रामाणिक असते हे सत्य मी विसरलो. पण एखादा सूर्यकिरण जसा धुके बाजूला सारतो, अव्यक्ताला व्यक्त करतो, तसंच तुझ्या विसरुन जा'एका वाक्याने मला जीवनाचा मार्ग दाखवला. एखादया सुंदर चित्रावर शाई ओतणे हे इतकं सोपं आहे का?

तुला असे वाटते का की मी खरेच विसरेन. 'प्रेम' ही गोष्ट विसरण्यासारखी नाहीच मूळत, आणि मी केलेले प्रेम इतके आदर्श होते की ते असल्या संकटाना डगमगणार नाही. तुला दीपगृह माहीत आहे ना? स्वतः खूप वादळ, लाटांचे तडाखे सहन करते, पण स्वतः अविचल असते. नावांना प्रकाश देते. तसेच माझे प्रेम इतरांना जरुर मार्गदर्शन करील.हीर-रांझा,लैला-मजनू अशा किती तरी एक ना अनेक आदर्श प्रेमकथा तू वाचल्या असशील. पण तू मला कधीच समजावून घेतलं नाहीस. दूर आंब्याच्या पानात बसलेला कोकीळ दिसत नाही, जाणवतात त्याचे 'सूर'! तसे माझे प्रेम तू समजावून घ्यायला हवे होतेस. अगं, ध्रुवताऱ्यासारखं माझं प्रेम अविचल आहे. तुझं आयुष्य सुखाचं जावो हीच माझी इच्छा! अग, आपल्या आवडत्या माणसासाठी त्याग करण्यात, त्या व्यक्तीला आवडते ते देण्यात, तो आनंद पाहण्यात किती सुख असतं माहित आहे का ? 'कोई शर्त नहीं होती प्यारमें' मी तुझ्यावर असंच अकृत्रिम प्रेम केलं. 'खुष रहे तू सदा ये दुवा है मेरी'. पण एक सांगतो, मी तुला कधीच विसरणार नाही. तू जरी मला विसरलीस तरीसुध्दा.

' उम्रभर ये मेरे दिलको तडपाया ।
दर्द दिल अब मेरे साथ ही जायेगा ।
मौतही बस आखरी दवा हैं मेरी ।'

वाईट एवढंच वाटलं की प्रेमाचा रुमाल आपण दोघांनी भावनेच्या नाजूक धाग्यांनी विणला; पण तुझे धागे तू काढून घेतलेस. पण ते काढताना माझे हृदय उध्वस्त होईल, त्याला शेवटपर्यंत निराशेची जखम होईल याचा तू विचारही केला नाहीस. नव्या पावलांनी जुन्या पाऊलवाटेवरील खुणा पुसायच्या नसतात. गडकरी वाचलास ना ? बाण जिथून सुटतो तिथे काहीच खूण नसते, पण जिथे जाऊन घुसतो तिथे जखम होते आणि जखम बुजली तरी व्रण कायम राहतोच. तसेच अंतापर्यन्त मी तुझ्यावर प्रेम करेन. कारण मी तुझ्या सौंदर्यावर प्रेम केलं नाही. तुझ्या अंतःकरणावर, मनावर प्रेम केलं. "पर तुमने आँखसे आँसू समझके मुझे, क्यों गिरा दिया मुझको". मी गरीब आहे म्हणूनच? अग, ह्या गोष्टी प्रेमापुढे गौण असतात. "It is better to be loved and lost, than never to have been loved at all

तेव्हा थोडा काळ का होईना पण तू माझ्यावर प्रेम केलंस. सुखद सहवासात मी स्वप्नपरींच्य राजांसारखा वावरलो स्वप्ने पाहिली.ही सर्व सुखं तू दिलीस. त्याबद्दल मी खरंच आभारी आहे. पुढील आयुष्यात तुला कधीही गरज लागली तर मला हाक मार. ' जान हथेलीपर ले आयेंगे.'अग,जीवन हे असंच असतं जे मिळत नाही त्यासाठी माणूस झुरतो. 'पण We pine for what is not! म्हणून जीवनापासून पळायचे नाही. तो पळपुटेपणा होईल. रडायचे तर नाहीच कारण अश्रू म्हणजे दुर्बलता. आजपर्यंत Life was like a dream to me, It was like a delicate flower, But now Life is a challenge and I will face it.

हरलो तरी चालेल, पण मन कणखर करणार नाही, मिळवण्यासाठी काहीतरी गमवावं लागतं. तुझे पुढचे आयुष्य सुखाचे जावो.तुझ्या जीवनप्रवासात फुलेच असावीत. दुःखांनी कधीच प्रवेश करु नये. असे जीवन ईश्वराने तुला द्यावे, हीच त्याच्या चरणी प्रार्थना !

' समझना के था एक सपना सुहाना ।
जो गुजरा जमाना, मुझे भूल जाना ।
जुदा मेरी मंझिल, जुदा तेरी राहें।
मिलेगी ना अब तेरी मेरी निगाहें ।

When you laugh, the world laughs with you, When you weep, you weep alone हे वाक्य मात्र अनुभवास आले. तेव्हा 'जहाँ जिस हालमें ही, हूँ रहुँगा मैं तुम्हारा, नदी सागरसे मिलती है, नहीं मिलते किनारे तेव्हा

ले जा जानेवाले दुवाएँ मेरे दिलकी
है किसीसे क्या मिला ना तेरीही खपा है ।
ना मेरीही खपा है ।

" जो होना था, वो हुआ । देखो रोये मेरा प्यार।
कहे दिल ये पुकार जरा याद रखो ।

**"विद्यामंदिरे आणि शिक्षण संस्था ही पोट भरण्याची साधने राहून उपयोगी नाहीत, तर ती विचारांची आणि विकासाची उगमस्थाने झाली पाहिजेत. ज्या समाजात अथवा लोकात जन्मलो, लहनाचा मोठा झालो त्या लोकांची अथवा समाजाची सेवा करणे हे माझे शैक्षणिक पवित्र कर्तव्य आहे."**
**कर्मवीर भाऊराव पाटील**

# आजचा तरुण म्हातारा आहे!

जगताप विजयकुमार व्यंकटराव
एफ्- वाय्. बी. कॉम.

आजचा तरुण म्हातारा आहे अशी टीका हल्ली ऐकू येते. हे म्हातारपण त्याच्या कृतीत आहे असे सांगितले जाते. पण खरोखरच आजचा तरुण म्हातारा आहे का? तसे वाटण्यासारखी परिस्थिती मात्र आज निश्चितच आहे. परवा मी माझ्या मित्राला फिरावयास जाण्यासाठी बोलाविले असता तो म्हणाला, " आज मला कंटाळा आला आहे." मनात म्हटलं खरंच, काय केलं हो या गृहस्थाने दिवसभरात? सकाळी उठून कॉलेज, दुपारी झ.प! संध्याकाळी मात्र याला फिरण्याचा कंटाळा आलाय! २० वर्षाचा तरुण मुलगा हा! याला फिरायचा कंटाळा येतो! म्हणजे खरंच विचार करण्याजोगी परिस्थिती आहे.

डॉक्टरांच्याकडे पेशंटची गर्दी तरुण मुलांचीच असते. आजचा तरुण हा शारीरिकदृष्टचा कमजोर तर आहेच, पण मानसिक दृष्टचाही कमजोर आहे. त्याला कशातही उत्साह वाटत नाही. एखादया निर्जीव खेळण्याप्रमाणे त्याची अवस्था झाली आहे. कुठलीही गोष्ट तो मन लावून करतच नाही. त्याला खेळात उत्साह नाही, अभ्यासात तर " दुष्काळात तेरावा महिना !" त्याची अवस्था एखाद्या भरकटलेल्या पतंगाप्रमाणे झाली आहे. त्याला कशातच रस वाटत नाही. खरच, आजचा तरुण म्हातारा आहे, असे म्हटले जाते ते काही अगदिच अयोग्य नाही.

आजचे विद्यार्थी शाळा कॉलेजात जातत, अभ्यास करतात. पण त्यापैकी किती जण मनापासून शिकतात? पालक पाठवतात म्हणून हे शाळेत वा कॉलेजला येतात. परीक्षेला बसतात, पासही होतात. पण हे असे क्षेत्र आहे, की त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या जीवनाचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सर्व प्रकारे विकास होतो. पण आजचा विद्यार्थी कॉलेजात येऊन कॅन्टिनला जावून सिगारेटस् ओढणे, तंबाखू खाणे व कसातरी वेळ काढणेच पसंत करतो. घरच्या धाकामुळे कॉलेजला यावेच लागते पण त्यात शिक्षणाविषयी आस्था, प्रेम वगैरे काही नाही. खेळ, नाटच, वक्तृत्व अशात केवळ बोटावर मोजण्याएवढे विद्यार्थी-विद्यार्थिनी भाग घेतात. त्यांची टिंगल करायची एवढेच काम बाकीचे विद्यार्थी करतात. काही तरुण तर शतीवाडी, (घरची) व्यापार (मुलांच्याच शब्दात सांगावयाचे तर- 'बिझिनेस.') असल्यामुळेच फक्त चैन करायची म्हणून कॉलेजला येतात. त्यांच्या शब्दात सांगायचे तर असे, " खाओ, पिओ, मजा करो. कल किसीने देखा है?" हल्ली व्यसनाचे प्रमाणही तरुणांमध्ये खूपच वाढले आहे. काही तरुण तर नुसते बसून असतात. त्यांच्या बाबतीत एक म्हण आहे. " आला आला प्राणी जन्मासी आला, गेला, गेला बापुडा व्यर्थ गेला."

एकदा शिक्षणसंपले की मग रोज ॲप्लिकेशन्स करायचे. एखाद्याला नशिबाने नोकरी लागते. पण बाकीचे नुसते हिंडतात. चार ठिकाणी जावे, ओळखी वाढवाव्यात वगैरे काही नाही. नुसते घरी बसायचे. 'अरे, ज्या वयात तुम्ही आई-वडीलांना स्वकष्टाची मीठ-भाकरी खायला घालायची, त्या वयात नुसते हिंडता?" स्वतः कुठेच पुढाकार घेणार नाहीत, पण इतरांवर टीका मात्र करणार. हाच ह्यांचा उद्योग! एखाद्याने नवीन कार्य सुरु केले तर त्यावर म्हणायचे " हं तो काय करतोय? येईल दोन दिवसांनी आपोआप आपल्यात. पंख छाटले जातील तेव्हा कळेल? फार भराऱ्या मारतोय काय?" दुसरा काहीं करत असेल तर त्याला खालीं कसे खेचायचे हे बघायचे. त्याला मदत तर दूरच.

फॅशन्सच्या नकला करण्यात तरुण-तरुणी धन्यता मानतात. स्त्रियांच्या कपड्यांच्या फॅशन्स विषयीं न बोललेले बरे. देवआनंद वा राजेशखन्ना सारख्या केशभूषा त्यांना आवडतात. पण त्यांचा अभिनय काहीं यांना जमत नाही. त्यासाठीं त्यांनीं किती कष्ट घेतले आहेत हे कोण पहातो? त्यांचे कष्ट कोणाला दिसतात? हे तरुण बॅ. नाथ पै सारख्यांचे अनुकरण करणार नाहीत. बॅरिस्टर नाथ पै यांचे शेक्सपीअरच्या नाटकातले उतारे तोंडपाठ होते. पण आजच्या तरुणांना सिनेमाच्या गाण्यांव्यतिरिक्त संगीत कशाशी खायचे हेही माहित नाही. मग क्लासिकल संगीत दूरच. आजच्या तरुणांना सगळं काही सोपं सुटसुटीत हवं आहे. अल्लाउद्दीनच्या जादूच्या दिव्याप्रमाणे काहीतरी चमत्कार घडावा व सर्व काही आपल्याला मिळावे असे त्यांना वाटते. पेपर कोरा दिला व कुणी पासिंगचे मार्क देतो म्हणाले तर त्यांना बरेच वाटेल. त्यांना 'Short cut to success' हवाहवासा वाटतो. ते कधी आत्मपरीक्षण करीत नाहीत. काहीजण तर म्हणतात, ' विचार करण्याचा अविचार मी कधीच करणार नाही.' ही आजची पिढी! निष्क्रिय, निरुत्साही अकाली वृद्धत्व आलेली.

ह्या सर्व गोष्टी दिसतात त्या अशा का ? याचाही विचार झाला पाहिजे. " नाण्याला नेहमी दोन बाजू असतात. आजचा तरुण निष्क्रिय का बनला आहे, याची कारणमीमांसा केली पाहिजे. खरोखर समाज तरुणांसाठी काय करतो ? फक्त छी: थू करायची हेच जुन्या पिढीचे ध्येय आहे असे नाही का वाटत ? जुनी माणसे म्हणतात, "या तरुणांना कांही कळत नाही. त्यांच्यापेक्षा आम्ही दहा पावसाळे जास्त खाल्लेत." दहा पावसाळे जास्त खाल्याने त्यांची बुद्धिमत्ता वाढलीच असेल असे नाही. जुनी पिढी नव्या पिढीचे म्हणणे समजावून घेत नाही यामुळे तरुणाची कुचंबणा होते.

आजच्या तरुणाला समजावून घेतले तर त्याचा उपयोग निश्चित होईल. त्याला संधी न देता तो अकार्यक्षम आहे असे मानणे चूक ठरेल. खरं पाहता आजचा तरुण मुळीच निरुत्साही नाही. त्याच्या उत्साहाचे आपल्याला खूप वेळा दर्शन होते. गणेशोत्सवात विद्यार्थी हौसेने भाग घेतात. टेबल–टेनिस वगैरे खेळात किंवा वक्तृत्व स्पर्धेत, त्याच बरोबर शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी चमकत आहेत. 'राष्ट्रीय सेवा योजना' सारख्या उपक्रमात विद्यार्थी–विद्यार्थिनी उत्साहाने भाग घेतात. फॅशन्सच्या बाबतीत बोलायचे तर कालाप्रमाणे माणसाने बदलले पाहिजे इतके असून सुद्धा सामान्यतः तो निरुत्साही दिसतो. कारण त्याच्यापुढे ध्येय नाही. इतके शिकून करायचे काय? तर बेकार होऊन हिंडायचे. त्याचे हे नैराश्य समाजयंत्रणेमुळे आले आहे.

त्याच्यापुढे निश्चित काही ध्येये नाहीत याची त्याला खंत वाटते. त्याच्या कार्यक्षमतेला उत्तेजन नाही. या तरूण रक्ताला वाव दिला पाहिजे. त्याला योग्य मार्गदर्शन हवे आहे. हे जर मिळाले तर मग पहा आजचा तरुण कसा कामाला लागतो ते. तो म्हातारा मुळीच नाही.

तुळज राम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

---

**किसान कामगारांचे कैवारी कर्मवीर**

**"कारखान्यातील कामगारांच्या पोटाच्या खळगीबरोबर डोक्यातील मेंदूचीही वाढ झाली पाहिजे, आणि ज्ञानाबरोबर त्यांच्या भावनेचीही जोपासना झाली पाहिजे. असा पोटाने समाधानी, डोक्याने शाबूत आणि भावनेने हेलावलेला मजूरच कारखान्याचे काय, या जगाचे नंदनवन बनविल. भरमसाट नफेबाजी करुन गगनचुंबी इमारतीत राहणारा कारखानदार एका बाजूला, तर कष्टाने काळवंडलेला, शरीराने खंगलेला, मनाने खचलेला आणि भावनेने करपलेला कामगार दुसऱ्या बाजुला, असे भेसूर चित्र भारताच्या नकाशावर उमटणार नाही, अशी काळजी घतली पाहिजे. कामगाराचे शरीर बळकट राहील, त्याचे मनगट खंबीर राहील, त्याच्या भावना प्रस्फुरित होतील, अशा सुखसोयी त्याला उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. यासाठी कारखानदाराच्या नफ्यात मजुरांचाही वाटा पाहिजे."**

कर्मवीर भाऊराव पाटील

# नामधारी सत्य

स्व. शिरीषराज तुकाराम लोंढे
एम्. ए. (राज्यशास्त्र) भाग दुसरा

' सत्य मेव जयते ' हे बोधवाक्य नेहमीच मेंदूमध्ये थैमान घालते. खरोखरच सत्याचा विजय होतो का? सद्यः परिस्थितीत 'सत्य' या शब्दाला किंमत आहे का? न्यायालयात देखील ' सत्य मेव जयते ' हे बोधवाक्य न्यायाधीशांच्या अगदी डोक्यावर असते, मग न्यायदानात कितपत सत्यता असते?

अशा अनेक प्रश्नांचे थैमान डोक्यात काहूर माजवते. सत्य आणि समाजातील व्यवहार यात जमीन–आस्मानाचा फरक दिसून येतो. सत्याला आधुनिक जगात व्यावहारिक दृष्टचा शून्य किंमत आहे. वास्तविक सत्य आणि व्यवहार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सर्व सत्य हे व्यवहाराच्या चौकटीत असते, पण सर्व व्यवहार हे सत्यात बसणारे नसतात. कारण व्यवहारात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, नैतिक इत्यादी प्रकारची बंधने असतात, पण सत्याला कसलीच बंधने नसतात. जगात सत्य जरी श्रेष्ठ असले तरी ते व्यवहारिक दृष्टचा सत्य असणे आवश्यक आहे.

बालपणापासूनच सत्याचे संस्कार केले जातात. ' नित्य सत्य बोलावे ' असे सांगितले जाते. परंतु याचा परिणाम मुलांच्यावर कितपत होतो हे त्याच्या घरातील संस्कारावरच अवलंबून असते. कारण घरातील संस्कारच चमत्कारिक असतात. मुलांना सत्य बोलायला सांगून आपल्याकडे मात्र कोणी आले व कामाविषयी विचारले तर 'घरात नाही असे सांग. उगीच डोक्याला कटकट कशाला?" असे असत्य बोलायला देखील घरची थोर मंडळीच शिकवित असतात. त्यामुळे लहानपणा पासूनच आपल्यावर असे संस्कार घडत असतात.

सत्य आणि व्यवहार यांचा संबंध किंवा प्रत्यय दैनिक जीवनात आपणाला येतो. एखादया व्यक्तीने कोणताही व्यवहार केला, तरी ती व्यक्ती पूर्णपणे सत्याच्या बाजुला झुकत नाही. आपण आपल्या दैनंदिन जीवनात सत्याचे व प्रतिष्ठित पणाचे वस्त्र परिधान करीत असतो. परंतु ते आपले बाह्यरूप असते. म्हणून तर कोण्या विचारवंताने पुढाऱ्याची व्याख्या ही 'सत्ता व आश्वासने या मध्ये लोंबकळणारा लंबक आहे' अशी केली आहे. सत्य आणि व्यवहार यांच्यातील दरी काळाच्या दृष्टीने व परिस्थितीच्या दृष्टीने रूंदावलेली आहे. मानवी मूल्ये ही बदलत चाललेली आहेत. आज महासत्ता निशस्त्रीकरण अणुचाचण्या या विषयी परिषदा घेतात, त्यावर बंदी घातली पाहिजे. अशा मसुदयावर सह्या करतात हे जरीं सत्य असले तरी व्यवहारात परिषद संपली की अणुस्फोट घडून येतात. निशस्त्रीकरण हे ' स्टार वॉर ' पर्यंत जावून पोहचते तसेच अलिप्त राष्ट्रांच्या बाबतीत देखील हेच दिसून येते. ' अलिप्तता ' याचा अर्थ कुठल्याही सत्ता गटात सामील न होता जगात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हा आहे. परंतु अलिप्ततेच्या व्यासपीठावरुन खाली उतरले की हीच अलिप्त राष्ट्रे दोन्ही पैकी एका सत्तागटाकडे झुकलेली दिसतात. उदा. भारत हा रशियाकडे झुकलेला आहे आणि भारताकडे काही काळ अलिप्त राष्ट्रांचे नेतृत्व होते. तसेच शांतता व सुव्यवस्थेबद्दल सांगायचे झाले तर भारताने १९६२ १९६५, १९७२ असे तीन वेळा आपदधर्म म्हणन युद्धात भाग घेतलेला दिसून येतो, हा व्यवहार आहे.

सत्य हे व्यवहारी पाहिजे. व्यवहारी सत्य हे जगात श्रेष्ठ असते. कोणताही व्यवहार हा सत्यावर आधारित असला पाहिजे, कारण सत्य हे नागवे असते. सत्याची सांगड ही व्यवहाराशी घातलीच पाहिजे. एखादा व्यापारी व्यापार करीत असतो. खरे तर हा व्यापार सत्यावर आधारलेला असावा. पण व्यवहार काय सांगतो, तर व्यापार नफ्यावर आधारलेला आहे. सत्य व व्यवहार यातील संबंध दर्शविणारी एक कल्पित कथा अशी – पूज्य म. गांधी सारखी सत्य व अहिंसा या तत्वाची पुरस्कर्ती विभूती कोणतीही नाही. परंतु त्यांनाही सत्य या तत्वापासून अलिप्त व्हावे लागले. एके दिवशी गांधीजी एका ठिकाणी उभे होते. त्यांच्या समोरून एक गाय पळत गेली. ती गाय कोठे गेली हे देखील गांधीजींनी पाहिले. थोडयाच वेळात त्याच रस्त्यावर एक कसाई (खाटीक) गाईचा तपास करीत आला. त्याने गांधीजींना विचारले, "गाय कोठे गेली?" तेव्हा मात्र गांधीजीपुढे मोठा प्रश्न उभा राहिला, जर आपण ' सत्य ' बोलावे तर गाईचे प्राण जातील. बराच विचार केल्यानंतर गांधीजींनी असा निर्णय घेतला की गाईचे प्राण वाचवण्यासाठी माझ्या सत्य या तत्वाची होळी झाली तरी चालेल, परंतू गाईची हत्या न होता निदान ' अहिंसा ' या तत्वाचे तरी पालन होईल. म्हणून गांधीजींनी त्या कसायाला दुसरीच दिशा दाखविली.

कोणताही व्यवहार हा प्रेमावर अधारित असावा. तरच तो टिकतो. शिवाजी महाराजांनी भेटीसाठी प्रताप गडाच्या पायथ्याशी अफजलखानाला बोलविले होते पण शिवछत्रपती व्यवहारी असल्याने ते जवळ वाघनखे व बिचवा घेवून गेले. त्यामुळे त्यांची भेट सत्य जरी असली तरी भेटीतील व्यवहारी पणामुळे छत्रपतींचे प्राण वाचले व अफजलखानाचा वध झाला. अशाच प्रकारे डॉ. आंबेडकर यांना माहित होते कि भारतात अस्पृश्यांचा किंवा दलितांचा वेगळा मतदार संघ असल्या शिवाय अस्पृश्यांचा किंवा दलितांचा विकास होणार नाही. हे जरी सत्य असले तरी त्यांना गांधीजींचे उपोषण बंद करण्यासाठी किंवा गांधीजीचे प्राण वाचवण्यासाठी आपल्या मागण्या सोडून देवून ' पुणे करार ' करावा लागला, हा व्यवहार आहे.

आपण सत्य शब्दाबाबत वर्षातून एकदा 'सत्यनारायण' करतो व उरलेले दिवस असत्याचा जप करीत राहतो. राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात कितपत सत्यता निदर्शनास येते? शैक्षणिक क्षेत्र हे किती पवित्र आहे; पण या पवित्र क्षेत्रातही असत्याने पावित्र्य भंग केलेले दिसून येते.

वास्तविक पाहता असत्यतेची बीजे इतकी रुजलेली आहेत की त्या बीजापासून येणाऱ्या वृक्षाला कोणती फळे येणार? आजचा समाज हा 'सत्याचा' मुखवटा धारण करुन त्या मुखवटयाआड 'असत्य' लपवित असतो. असत्य कथन ही प्रत्येकाची व्यवहारिक चतुरता आहे. आजच्या जगात सत्य व असत्य यांची स्पर्धा चाललेली आहे. जो सत्य स्वीकारतो तो रसातळाला जातो, व जो असत्य स्वीकारतो, तो कळसाला जातो.

'सत्य हे 'शिव' आहे 'शिव' हे 'सुंदर' आहे हाच संदेश भारतीय संस्कृतीने सर्व जगाला दिला. तसेच कित्येक वर्षापूर्वी भारतात बुद्धाने शांतीचा संदेश सर्व जगाला दिला. तेच जग आज 'बुद्ध कि युद्ध' याकडे शंकेने पहात आहे आणी दुसऱ्या बाजूला त्याच जगातील मानव 'अणूयुद्धाच्या' उंबरठयावर उभा आहे. या सर्वांचे मूळ सत्यात आणि त्याचा व्यवहारात झालेला उपयोग यात आहे.

## भावपूर्ण स्मरणांजली.



प्रस्तुत लेखाचे लेखक श्री. शिरीष तुकाराम लोंढे यांचे, हा लेख प्रकाशित होण्यापूर्वीच, शनिवार दिनांक २०-१२-८६ रोजी बारामतीजवळ झालेल्या मोटार अपघातात दुःखद निधन झाले. हे नमूद करताना आम्हाला अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती व शांती लाभो हीच प्रभुचरणी प्रार्थना!

सतत काही नवनवे लिहीत राहण्याचा त्यांना छंद होता. असाच त्यांचा एक प्रयत्न कोणतेही लेखन संस्कार न करता आम्ही प्रकाशित करीत आहोत. त्यांना महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण स्मरणांजली अर्पण करीत आहोत.

# पूर्ती

शेंडगे व्ही. एस्.
टी. वाय्. बी. कॉम्.

आज आठ दिवसापासून वृषालीताईची गडबड चालू होती. लग्नाची आमंत्रणे देणे,याद्या तयार करणे यासाखी अनेक लहान मोठीकामे त्यांना पारपाडावी लागत होती. त्यांनां साहय करणारी अनेक नातेवाईक मंडळी होती. तरीपण त्या जातीने लक्ष घालून कामे पूर्ण करुन घेत होत्या.कारण त्यांची एकुलती एक लाडकी कन्या कल्पना हिचा विवाह ठरला होता.कल्पना तशी साधारण नाकी डोळी छानशी, रंगाने सावळी परंतु आकर्षक, शेल्टी अंगकाठी,बदामा सारखे तोंड, कमळाच्या पाकळचाइतके नाजूक लालचुटुक ओठ, कोणीही पाहताक्षणी पसंत करावी अशी असल्यामुळे पहिल्यांदा पाहावयास आलेल्या मुलाने तिला पसंत केले. तिचा आता थोडया दिवसांनी विवाह होता. आता आपली मुलगी आपल्यापासून दुरावगार यामुळे वृषालीताईच्या डोळयात अश्रू आले, परंतु त्यांना रडून चालणार नव्हते. अजून भरपूर कामे करावयाची होती, म्हणून त्या लगबगीने डोळे पुसुन कामास लागल्या.अगदी संध्याकाळी त्यांचा मुलगा पराग त्यांना खोलीत विश्रांतीसाठी घेवून गेला. खोलीत गादीवर अंग टाकताच जरा बरे वाटले व त्या आढयाकडे पाहत आपल्याच विचारात मग्न झाल्या.

दामोदर पंत व आम्ही शेजारी एकाच चाळीत रहात होतो. पंत व माझे वडील आणणा एकमेकांचे मित्र होते. पंताचा मुलगा अमित हुषार, व खिलाडूवृत्तीचा होता. लहानपणापासून आम्ही एकमेकांचे मित्र होतो. कधी त्याने मला मारावे कधी मीं त्याला मारावे, त्याने रुसावे मी त्याचा रुसवा काढावा. एवढे जरी असले तरी आम्ही एकमेकांना कधीच अंतर दिले नाही. तो व मी एकाच वर्गात शिकत होतो. आम्ही शर्ट व हापपँटी आणि स्कर्ट ब्लाऊज सोडून शर्ट पँट आणि साडो परकर घालावयास लागलो. तो व मी एकाच कॉलेजमध्ये शिकत होतो. ज्यावेळेस कॉलेजात आम्ही प्रवेश घेतला त्यावेळेस दोस्तीचे आमचे प्रेमात कसे रुपांतर झाले हे आम्हा दोघांना कळलेच नाही व आम्ही दोघे एकमेकावर निस्सीम प्रेम करु लागलो. आम्हाला एकमेकांचा विरह असह्य होत असे, ही गोष्ट पंतांच्या लक्षात आली व त्यांनी माझ्या वडिलांकडे माझी अमीतसाठीं मागणी केली. अण्णांनी तत्काल मान्य केली. लगेच धावपळ सुरु झाली. ब्राम्हणाकडून शुभमुहर्त काढून साखरपुडा धरण्यात आला. साखरपुडयाच्या दिवशी मी इतकी आनंदात होते की बस्स! बाहेर सनईचे मंजुळ स्वर वाजत होते. घरात गडबड चालू होती, लहान मुले नवे कपडे घालून उगीचच मिरवत होती व मध्येच, लुडबुड करीत होती झाले,माझा साखरपुडा धुमधडाक्यात झाला व माझ्या मनात माझ्या भावी जीवनाची एकच शृंखला तयार झाली व मी त्याच्या मनोराज्यात रमून जावू लागले. रोज माझ्या मनात नवीन नवीन मनोराज्ये येवू लागली. जणू काही लगेच माझा विवाह होवून राहीला असे मला वाटू लागले.

माझी मी मनातल्या मनात कल्पना करु लागले की लग्नाच्या आदल्या दिवशी दारात मांडव उभा राहील, लहानथोर मंडळीची धावपळ सुरु होईल. आपले सर्व नातेवाईक गोळा होतील. आपण एका खोलीत गुडघ्यात खाली मान घालून बसलेले असू.आपल्या मैत्रिणी येतील, आपल्याला हवीशी वाटणारी थट्टा करतील.परंतू वरकरणी आपण त्यांच्यावर रागवू, आपण रागवताच मैत्रिणी खळखळन हसतील व आणखीन आपली थट्टा करतील. लग्नाच्या आदल्या दिवशी आपल्या अंगाला हळद लावली जाईल .हळदीच्या वेळेस बाहेर सनई वाजेल. "मी जाईल माझ्या गावाऽऽ माझ्या अंगाला हळद लावा."

दुसऱ्या दिवशी सकाळपासून पाहुणे मंडळींची घाईगडबड उडालेली असेल. त्यावेळेस सकाळी आपल्याला सुवासिक सुगंधी साबणाने आंघोळ घातली जाईल. सुवासिक तेल लावून वेणी घातली जाईल त्यावर सुगंधी जाईचा गजरा माळला जाईल कपाळावर निरनिराळ्या रंगाची सोनेरी चमकी लावली जाईल. आपणास सुशोभित केले जाईल. मैत्रिणी आपली चेष्टा करण्यात रंगलेल्या असतील दाराबाहेर वरात आलेली असेल. सनई बँडबाजा लाऊडस्पीकर वाजत असेल.नवरदेव मांडवात येताच ब्राम्हणाची घाईगडबड उडेल,'नवरी मुलीलाआणा'नवरदेवाचे मामा नवरीचे मामा यांची नावे घेतली जातील. आपणाला अमीतसमोर उभे केले जाईल व ब्राम्हण "कुर्यात सदा मंगलम् ओं शुभं भवतु" म्हणून मंगल आष्टके म्हणत असेल व लग्नास जमलेली मंडळी आक्षदतांचा वर्षाव करत असतील. लग्नानंतर जेवणाची पंचपक्वान्नांच्या पगती उठतील.ज्यावेळेस नवरदेवाचे नवरीचे घास भरविण्याचा कार्यक्रम असतो त्यावेळेस आपण मुद्दाम मोठा घास अमीतला देवू. अमीतला तो खाता येणार नाही म्हणून गालातल्या गालात हसू.

लग्नानंतर आपण अमीतच्या घरी जाऊन तेथे आपण लाजत लाजत बावरु. नणंदा दीर आपली थट्टा करतील. आणि ज्यावेळेस रात्री आपण सजवलेल्या पलंगावर खाली मान घालून वसलेले असू, त्यावेळेस अमित हळूच दार उघडून आत येईल व आपल्याबरोबर गप्पा मारेल. परंतू गप्पा सोडून चंद्र केव्हाच ढगाच्या दुलईत शिरलेला असेल, आणि ! आणि·········!

आणि, हायरे माझ्या दुर्दैवा, मी माझ्या मनोरथात रमलेली असतानाच माझ्या हातात भयानक तार पडली.
" Amit serious come immediately "

अमित आजारी आहे ऑफिसमध्ये जात असताना त्याचा अपघात झाला हॉस्पीटलमध्ये दाखल केले आहे. ताबडतोब निघून या अशी तार वाचून माझ्या पोटात खड्डा पडला व मी चक्कर येवून बेशुद्ध पडले. शुद्धीवर आल्यवर मी अमीतला भेटण्यास गेले.अमितचा डावा पाय कापावा लागला होता. त्याचा पाय पाहताच मला रडू कोसळले. मी रडतच घरी येऊन रात्रभर रडले.

काहीं दिवसातच अमित पूर्ण बरा झाला. परंतु आणणांनीं आमचा साखपुडा रद्द करन्याचा बेत केला होता. त्यांनीं मला तसे सांगताच मीं त्यांना ठामपणें नकार दिला. किती भांडले होते मी त्यावेळेस! आणणानी किती समजावून सांगितले होते.

" अग वृषाली विचार कर, तुला पूर्ण आयुष्य या लंगडयाबरोबर काढावे लागणार आहे. "

" आणणा कितीही कष्ट पडले तरी मी अमितशीच लग्न करीन " आणणांनी खूप विरोध केला. पण आपण ऐकले नाही. घर सोडून अमितशी रजिस्टर विवाह केला.आपण केलेली मनोराज्ये सर्व धुळीला मिळाली होती. चंद्राच्या पुढे एक मोठा काळा ढग आल्यामारखे झाले होते. तरी आपण जिद्दीने जगलो. काम केले दोन मुले झाली. एक मुलगा पराग व एक मुलगी कल्पना. त्यांचे शिक्षण योग्य प्रकारे केले. कल्पना शिक्षिका झाली तर पराग डॉक्टर झाला. व त्याने डॉक्टरकी व्यवसायात बराच मान मिळविला होता. आपण आज त्याच लाडक्या लेकीचे लग्न करणार होतो.

आपल्या लग्नात अपूर्ण राहिलेले आपल्या लेकीच्या लग्नात त्या पूर्ण करुन घेणार होत्या.सगळी हौस त्या आपल्या लेकीच्या लग्नात भागवून घेणार होत्या.या विचारात त्यांना कधी झोप लागली कळलीच नाही. जाग आली तेव्हा पराग त्यांना हाका मारीत होता. "आई, आई, अग तु झोपलीस काय, उठ. किती वेळ झाला बघ नवरदेव तिकडे आला आहे.उद्या लग्न आहे ना. नवरदेवाकडे एक हंडाभर पाणी पाठवून दे."

वृषालीताई उटल्या व कामाला लागल्या त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वहात होता. तो त्यांच्या लग्नात राहिलेल्या त्यांच्या अपूर्ण गोष्टी पूर्ण होणार होत्या. त्या लगबगीनें कामाला लागल्या.

❋

---

❋ **हुजऱ्याचे काम करणारा राणोजी शिंदे, मेंढ्या हाकणारा मल्हारराव होळकर व भिक्षुकी करणारे श्रीवर्धनकर भट हे जर जातीच्या जन्मजात चौकटीत बसले असते तर हिंदवी स्वराज्याची महनीय कामगिरी झाली नसती.**

❋ **अन्याय करणारी व्यक्ती मग तो स्वकीय असो वा परकीय असो, तिच्या मागे धार्मिक, सामाजिक परंपरेचा किंवा राजकीय पाशजो शक्तीचा पाठिंबा असो, तिच्याशी दोन हात करुन स्वतःचा तेजोदीप तेवत ठेवणे, हेच खरे जिवंतपणाचे लक्षण!**

**कर्मवीर भाऊराव पाटील**

# प्रिये पहा

कु. ज्योती मरकळे
एम्. ए. मराठी प्रथम वर्ष

'प्रिये पहा! रात्रीचा समय सरूनी येत उषःकाल हा!' मध्यरात्री सौभद्र हे नाटक पाहून आल्यानंतर वरील ओळ गुणगुणतच मी अंगावरील उबदार स्वप्नांची दुलई दूर सारते आणि खिडकीच्या तावदानावाटे अवखळपणे धावत येणाऱ्या गुलाबी, पिवळसर सूर्यकिरणांकडे अनिमिषपणे पाहू लागते. सकाळचा तो पहिलावहिला स्पर्श अंगावर घेण्यास मी अगदी अधीर झालेली असते आणि अशातऱ्हेने जीवनातील, दिवसभरातील अनेक क्षण जगण्यासाठी, उपभोगण्यासाठी उन्मन झालेल्या मनाला मांगल्याचा, पवित्रतेचा तो पहिला स्पर्श असतो.

एकूण जीवनाकडे. माणसाच्या दैनंदिन जगण्याकडे आणखी डोळसपणे पाहिलं असता मला असं दिसून येतं की माणूस हा निव्वळ समाजशील प्राणी नाही तर तो स्पर्शाचाही भोक्ता आहे. मग यातील काही, स्पर्श शरीराला झालेले असतात. तर काही मनाला झालेले असतात काही स्पर्शांचा प्रत्यय आपणास कितीतरी दूरवरुन येत असतो. उदा. दीपावली किंवा मकरसक्रांत या निमित्त प्रियजनांनी पाठवलेल्या स्नेहल काव्यमय ओळी हा दूरवरुन मनाला जाणवणारा गुलाबपाण्याचा थंडावाच नव्हे का?

लहान मूल जन्माला येते आणि जगाच्या जाणीवेचा पहिला स्पर्श होताच ते रडू लागते. आपल्या अस्तित्वाची जाणीव करुन देते. थोडें मोठे झाल्यावर न पाहता देखील केवळ स्पर्शाने ते आई कोणती हे सहजपणे ओळखते. आपलं आणि परकं यातील भेद त्याला केवळ स्पर्शाने कळतो. रागाने मारलेले आईचे दणके देखील ते निमूटपणं सहन करते. किंबहुना त्या स्पर्शाची त्याला तहानच लागलेली असते. पण परक्या माणसाच्या गोड गोड बोलण्याचा त्याला वीट येतो ही किमया निव्वळ स्पर्शाचीच नव्हे का? पाठीवरुन फिरणारा आजीचा खरखरीत हात देखील अनेक ठिगळं जोडून केलेल्या मऊ गोधडीसारखा लागतो. तर कान पिळणारा दादा देखील कधी कधी हवासा वाटतो. आईला गाऱ्हाणे सांगणारी ताईदेखील मग मोहक वाटू लागते. चोरी करुन निगरगट्ट झालेला मधू केवळ पाठीवरुन फिरणाऱ्या निव्वळ अश्वासक स्पर्शाने कोसळतो. अशी कितीतरी उदाहरणे आपणास देता येतील. सायंकाळी देवासमोर दिवा लावून शुभंकरोती म्हणताना त्या दीपज्योतीचा स्नेहल स्पर्श आपणास दुरून खुणावत असतो.

असेच बालपणीचे सात्विक, खरखरित, स्नेहल आणि रंगीबेरंगी स्पर्श कधी दुरून तर कधी जवळून अनुभवत आपण यौवनात पदार्पण करतो.

"काढ सखे गळयातील तुझे चांदण्याचे हात! क्षितीजाच्या पलीकडे उभे दिवसाचे दूत! चांदण्याचे हात!" स्पर्शाला इतकी सुरेख आणि हळुवार उपमा मला तरी दुसरीकडे कोठेही दिसत नाही. चांदण्याचे हात आणि तेही गळयात इतका नाजूक स्पर्श फक्त तारूण्यातील चांदणंच बरसू शकतं. बालकवींची "सुंदरतेच्या सुमनांवरचे दंव चुंबून घ्यावे" यामधे देखील बालकवींनी फुलावरचं दव हळुवारपणे टिपण्यासाठी किती मोहक शब्दयोजना केली आहे. यामधे देखील आपणास स्पर्शाची अल्हादायकता प्रगट होताना दिसते. असा हा तरूण्यामधील हिरवा स्पर्श आपणास जितके आपले मन संवेदनशील असेल तितक्याच उत्कटतेने तो घेता येतो

'प्रौढत्वी निज शैशवास जपणें.' या ओळीमधूनही आपणास प्रौढपणा देखील बालपणीच्या रेशमी आटवणींचा स्पर्श मनात घोळवीत कसे सुसह्य करता येते याचा सुंदर दाखलाच नाही का मिळत?

असे जीवनाचे अनेक चढउतार अनुभवत आपण कधी उगवत्या सूर्याचा मखमली स्पर्श अनुभवतो तर कधी त्याचीच दाहकता! कधी आईचा प्रेमळ स्पर्श तर कधी जगाचा स्वार्थीपणा. कधी आपण चार भितींच्या आत असतो, तर कधी भर समुद्राच्या मध्यभागी उभे असतो चालत असताना इच्छा असूनही मखमली गवतफुले हाती न घेता पायदळी तुडवावी लागतात आणि घाणेरीची फुले हातात घेउन रानोमाळ भटकणे नशिबी येते. कधी मनाला काव्याच्या मैफलीचा स्पर्श मोहवतो तर जगण्यासाठी एकीकडे रखरखीत हिशेबाच्या वह्या तपासाव्या लागतात. अशी ही चढती उतरती भाजणी आपल्या आयुष्यात घडत असताना आपणास आयुष्यात भोगलेले, निसटलेले कधी हाती येवूनही मनापर्यन्त न पोहचलेले स्पर्श डोळयांना अलगद स्पर्शून जातात.

लाजाळुची मिटलेली पाने, अलगद पायामधे घोटाळत असलेली मनी, मोत्याची हाताला लागलेली खरखरित जीभ, परसातल्या प्राजक्ताची नाजुक फुले, लज्जाहोमामुळे डोळे अजुनही चुरचुरित असलेला धूर आणि पतीचा पहिला स्पर्श असे कितीतरी.

खरंच! अंतकालचा, शेवटचा तो जीवन संपवण्याचा स्पर्श कसा असेल.? भयाण असेल की.– छे, काहींच अंदाज करता येत नाही. चला आजपर्यन्त आपण आयुष्यभरातील अनेक स्पर्शांना जसे धडाडीने बेफिकीरीने सामोरे गेलो तसे आताही जाऊ या! कारण न भिता आपण आयुष्याचे अनेक क्षण भोगले. त्यामुळे आपणास प्रत्येक स्पर्श हा सुंदर आणि नवाच भासला. हा देखील क्षण तसा असणार नाही कशावरुन? तो मनाला स्पर्शेल की शरीराला? हळुवार असेल की अवखळ?

कसाही असो पण आता मला एकच दिसतंय! मन आणि शरीर दोन्हीही अचेतन होऊन डोळयांमधे मात्र सर्व संजीवन एकत्र होऊन पिंपळ वृक्षावरचा अश्वत्थामा मला खुणावतोय आणि माझ्या मनाचं पाखरू ही स्पर्शाची दुनिया सोडून पिंपळ पानावरच्या रंध्रारंध्रामधे विलीन होउन जाण्यासाठी स्पर्शाचा टाहो फोडतंय?

अश्वत्थामा! अश्वत्थामा!!

# घर

पवार शरदचंद्र बबनराव.
एफ्. वाय्. बी. ए.

"एक होता कावळा आणि एक होती चिमणी, चिमणीचं घर होतं शेणाचं आणि कावळयाचं घर होतं मेणाचं, एक दिवस काय झालं, मोट्ठा पाऊस आला आणि चिमणीचं घर वाहून गेलं."

'का हो आण्णा, कावळयाचं मेणाचं आणि चिमणीचं शेणाचं घर का?' याच प्रश्नाचं उत्तर मला आयुष्यात सापडलं नव्हतं. माझ्या मुलाला मी ही गोष्ट सांगत असताना त्यानं नेमका तोच प्रश्न विचारला होता. तेव्हा माझं मन गडबडलं आणि मी अनिलला फक्त दटावले "अनिल झोप बघू तू. लहान मुलांनी जादा हट्ट करायचा नसतो." माझ्या दटाव्यानं तो लहानसा जीव झोपी गेला, परंतू काही करुन त्या रात्री मला झोपच येत नव्हती. माझं मन भूतकाळाकडे ओढ घेत होतं.

जेव्हा मी लहान होतो त्यावेळी आमच्या घराशेजारची ती नीता किती सुरेख गाणी गायची. मला मात्र गाणं येत नसे आणि कुणी मला मुद्दाम गाणं म्हणायला लावत तेव्हा माझा आवाज उगीच कसातरी निघायचा. मग सर्वजण हसायचे. आणि ती निती तर हसू नाही आले तर मुद्दाम हसायची. तशी आमची घरची परस्थिती जेमतेमच. नीताच्या घरी मात्र श्रीमंती होती. त्यामुळं तिच्या कपडयांशी किंवा तिच्या श्रीमंती वागण्याशी आमची तुलना होत नसे. तरीही आम्ही सर्वजण लहानपणी मिळूनच शाळेत जात होतो व खेळत होतो. तसा झाडावर चढण्यात मी पटाईतच होतो. मग मी बोरीच्या झाडावर चढून पिकलेली बोरे काढून म्हणायचो," ए ए नीते हे बघ बोरं" मग ती काकुळतीला येऊन म्हणायची कशी, "ये संजू, दे ना रे बोरं, एवढं काय त्यात" मग आपण उगाचच मूडमध्ये येऊन सर्वांना अंगठा दाखवित असायचो. नंतर नीताच्या पाठीमागून जाऊन तिचे डोळे

झाकून तिचा रुसवा काढीत होतो. बोरं दिल्यावर ती अशी उडचा मारायची की बस्स्. पिकलेली गोड बोरं तिला फार आवडत.

काही वर्षानंतर हळू हळू शाळेतून हायस्कूल आणि हायस्कूलमधून कॉलेज असे आम्ही बालमित्रांनी तारुण्यात प्रवेश केला. आम्ही १६-१७ वर्षांचे होत गेलो तसे नीताला तिच्या आईनें सूचना केली, "नीते, आत्ता मोठी झालीस.मुलांमध्ये खेळणं, उडचा मारणं बंद कर." आणि हळू हळू नीतामध्ये बदल होत गेले. ती काहीशी अबोल व गर्विष्ठ वाटू लागली. एकदाचा तो क्षण मला पूर्ण आठवतो. जेव्हा नीताच्या वडिलांनी नीताला नवीन साडी आणली तेव्हा ती साडी घालून अगदी काकूबाई सारखी पदर सावरीत मैत्रिणींना साडी दाखवून येण्याच्या निमित्ताने आमच्या घरासमोरून दोनवेळा माझ्याकडे बघन बघत गेली. तशी नीता साडीमध्ये खरंच सुरेख वाटायची, परंतु मग मीही थोडीशी गमंत म्हणून तिच्याकडं न पाहिल्यासारखं केलं.

एक दिवस मी तिला 'तू माझ्याशी बोलत का नाहीस' म्हणून दोन-चार ओळींची चिठ्ठी लिहिली आणि एका मित्राजवळ दिली. तर काय जाम भडकली ती माझ्यावर आणि शिवाय म्हणते कशी, "मैत्रिणींसमोर असं करायला नको होतं." तिचं मन मला कळत होतं परंतू माझं मन तिला कळत नव्हतं.ह्यावर कुठल्या एका लेखकाने एक विधान केलं आहे, ते मला सतत आठवतं- समुद्रात बुडी मारुन मोत्यांचे शिपले काढणे ही जशी एक कला आहे तशी दुसऱ्याच्या मनात शिरुन त्याची रहस्ये जाणून घेणे ही एक कला आहे. नीताला तिच्या वडिलांबद्दल आदर होता. हे मी मान्य करत होतो परंतू तिचं म्हणणं असं होतं की एखादया विद्यार्थ्याबरोबर एक मुलगी बोलताना पाहिली तर बाकीचे विद्यार्थी कुतर्क काढतात व त्यात तिच्या वडीलांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असतो. समाजाच्या या लफंडावात कितीतरी तरुण-तरुणींची मने गुदमरुन जात असतील!

काही दिवसानंतर तिच्या वडिलांची बदली जवळच्याच गावी झाली त्यामुळं मला कशातच रस वाटत नव्हता. सारखं नीताला पहावं असं वाटायचं.अन्न आणि प्रेम या मानवी जीवनातल्या अत्यंत महत्वाच्या गोष्टी. पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला समाजाला वेळ नाही. अन्न निर्माण करणाराला ते पोटभर मिळतही नाही. निरपेक्ष प्रेम करणारा प्रसंगी महामूर्ख ठरतो. आज अशी स्थिती आहे हे सुध्दा उघडपणाने वडिलधारी माणसे कबूल करीत नाहीत ! ही स्थिती कशाने निर्माण झाली आहे याची मनमोकळेपणाने चर्चा करायला कॉलेजमधील प्रोफेसरसुध्दा धजत नाहीत.

एकदा मी माझ्या मामांच्या गावी एस्. टी.ने चाललो असताना नीताही त्याच एस.टी. त बसल्याचं मी पाहिलं परंतु तिने मात्र मला पाहिलं नव्हत. बरेच अंतर एस्. टी. गेल्यानंतर माझ्या पाठीमागच्या सीटकडून जरा हलकाच परंतू मोहक आवाज आला 'संजू' मी चटकन पाठीमाग पाहिलं नीता केस सावरीत माझ्याकडं पहात होती. "किती किती बदललायस संजू अं, अरे, मी प्रथम ओळखलं नाही. निदान तू तरी ओळखायला हवं होतस ?" "हो पण मी तुला पाहिलंच नाही, इकडं कुठं निघालीस ?" ती म्हणाली "गावी, आजींना सोडायला चाललेय "नीता, तू कशी गं हल्ली कॉलेजला दिसत नाहीस ?" "अरे मी कॉलेज सोडलंय." तिने कॉलेज का सोडले असावे याचा विचार मी करत होतो परंतू पुढील स्टॉप आल्यानंतर नीता व तिची आजी उतरल्या. त्यामुळं ते विचरायचंही राहिलं. एस् टी तून उतरताना नीताने स्मितहास्य केलं.

माझंही कॉलेज काही दिवसानंतर पूर्ण झालं मला नोकरी मिळणं कठीणच होतं. परंतू सुदैवाने मला बऱ्यापैकी नोकरी मिळाली त्यामुळं माझं मन नोकरीत मग्न झालं. पुढे माझ्या लग्नाविषयी घरात विषय सुरु झाला.

एक दिवस मी माझ्या मित्रातर्फे वडिलांना स्पष्ट सांगितले कीं, "मला नींता पसंत आहे." मला माहितच होतं की, माझे वडिल म्हणणार "त्यांची श्रीमंती कुठे नि आपण कुठे ?" आणि शेवटी झालंही तसंच. माझ्या एककल्लीपणामुळे माझ्या वडिलांना नीताच्या वडिलांकडे जावे लागले आणि निताच्या वडिलांनी स्पष्ट नकार दिला. मी माझ्या विश्वासू मित्राला नीताच्या घरी पाठवले. माझ्या मित्राने नीताच्या आईला समजावून सांगितले तेव्हा निताच्या आईलाही ते पटले असावे. म्हणून माझ्या मित्रासमोरच नीताच्या आईने नीताच्या वडिलांना विचारले, "होय ओ, मी काय म्हणते ते ऐकलंत का ?" "काय सांगता बोला," "तो बीरकरांचा संजू तसा फार गुणी मुलगा आहे.त्याला नोकरीही बऱ्यापैकी आहे,शिवाय देण्याघेण्यातही अडविणार नाहीत.आपली नीता द्यावी म्हणते त्यांना." या प्रस्तावावर तिचे वडिल अतिशय संतापले आणि म्हाणाले, "हं म्हणे देण्याघेण्यातही अडविणार नाहीत ! आहेच काय त्याच्याजवळ.? आजकाल या जगात पैशाला महत्व आहे, आणि मी माझी मुलगी श्रीमंतालाच देणार आहे पुन्हा हा विषय माझ्याजवळ काढू नका." नीताची आईही पुढे बोलू शकली नाही

एक दिवस मी नीताला भेटलो. परंतू तिनेही एकच उत्तर दिले, "संजू, जे काही तू सांगणार आहेस तेमला कालच कळाले आहे व त्याचे उत्तर माझ्या बाबांकडून तुला मिळाले आहे; माझ्याकडून तू कशाचीही अपेक्षा करु नकोस." "नीता, जगातील प्रत्येक माणसाला आपली प्रिय व्यक्ती मग ती गरीब असो वा श्रीमंत, निवडण्याचा अधिकार आहे. तसाच तुलाही तो अधिकार आहे. तो मी हिरावून घेवू इच्छित नाही." असे म्हणून मी घरी परतलो, तेव्हा मला काहीच सुचत नव्हते. मला नीताच्या प्रेमाची जाणीव होती परंतू ती तिच्या वडिलांच्या म्हणण्यापुढे जाणार नव्हती. तिला वडिलांच्या नावाला कलंक लागू द्यायचा नव्हता व स्वतःच्याही. परंतु मला ते काहीच पटत नव्हतं व्यवहारी जगापुढे मी हतबल झालो.

पुढल्याच महिन्यात नीताचं लग्न ठरल्याचं मला कळालं. लग्नपत्रिकाही मला मिळाली.आपण ज्या मुलीवर प्रेम केलं त्या मुलीच्या लग्नाला एखादा प्रेमवेडा गेला नसता. तरी पण मी मात्र गेलो. आणि त्या नवविवाहितांना शुभाशीर्वाद दिले. माझ्या सर्व इच्छा–आकांक्षांचा पुरता चुराडा झाला होता.

अपयश हे प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात येतच असतं, हे त्यावेळी मला चांगलं कळलं. परंतु एखाद्या अपयशाने नाराज होण्यापेक्षा त्या अपयशावर मात करण्याची माणसाची तयारी असावी.

यथावकाश माझाही विवाह ठरला. लग्नाला नीतालाही जरूर बोलावले. व त्या उभयतांनीही आम्हाला शुभाशीर्वाद दिले. आम्ही पूर्णपणे आपापल्या संसारामध्ये गुरफटलो गेलो. परंतु कधी–कधी आठवण येते लहानशा संदीपला गोष्ट सांगताना. तो नेमका तोच प्रश्न विचारतो "काहो आण्णा, चिमणीचं घर शेणाचंच का? व कावळेदादाचं घर मेणाचं का?" मी मात्र त्याला दटावून गप्प करतो.

✻

# प्रत्येकाने घ्यावा असा अनुभव–ट्रेकींग

लक्ष्मीकांत रोहाणी
एस् वाय्. बी. कॉम्.

बऱ्याच दिवसापासून इच्छा होती की, एकदा कुठल्या तरी निसर्ग रम्य ठिकाणी ट्रेकींगला जायच. अनेक वेळा वर्तमान पत्रातून वाचलं होतं की, ट्रेकींग हे तरुणांसाठी एक अवाहन आहे सामान्यतः पुणे, मुंबई सारख्या शहरातील तरुण ते स्वीकारतात. आपणही हा साहसी अनुभव घ्यायला हरकत नाही. म्हणून यावर्षी आम्ही हिमाचल प्रदेश मधील 'कुलू मनाली' या ठिकाणी ट्रेकींगला जाऊन यशस्वी होऊन आलो.

'यूथ होस्टेल असोशिएशन ऑफ इंडिया' या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या वतीने भारतात अनेक ठिकाणी ( गोवा, हिमाचल प्रदेश, दक्षिण भारत, काश्मीर ) दरवर्षी युवक-युवतींसाठी साहसपूर्ण असे ट्रेकींगचे कार्यक्रम अयोजित केले जातात. बारामतीमध्ये या संस्थेचे युनिट असून दरवर्षी भारतातील कुठल्याही ठिकाणच्या ट्रेकींगला पाच जणांना जाता येते. या वर्षी बारामती युनिट मधून आपल्या कॉलेजचे विद्यार्थी संतोष मेहता, विजय शहा आणि मी व कॉलेज व्यतिरिक्त दोघे असे एकूण पाच जण ट्रेकींगमध्ये सामील झालो.

मे महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात आम्ही सर्व तयारीनिशी पुण्याहून रेल्वेने पंजाब मधील पठाणकोट पर्यंत आणि तेथुन पुढे बसने कुलुमनाली पर्यंत गेलो.

तेथे पोहचल्यानंतर मोठे मोठे बर्फाच्छदित पर्वत, नद्या, दऱ्या पाहून प्रथम उगीच मनाला भीती चाटून गेली की आपण हे ट्रेकींग यशस्वीरीत्या पूर्ण करु शकु का ? परंतु ट्रेकींगसाठी आलेल्या अन्य तरुण मित्रांनी आम्हाला मार्गदर्शन करून खूपच धीर दिला. ट्रेकींगसाठी

आलेल्या मित्रांत महाराष्ट्रीयन तरुणांची संख्या जास्त प्रमाणात होती. त्यामुळे सर्वजणांचे मराठी मधूनच संभाषण होई. ही त्यातल्या त्यात सुखद गोष्ट होती. पहिल्या दिवशी आम्हाला 'रॉक क्लाईंबिग चे ट्रेंनिग देण्यात आले. सर्वप्रथम चढणाऱ्यासाठी हे धोका-दायक नक्कीच आहे. कारण खडकाच्या सपाटीतून कसल्याही आधाराशिवाय वर चढून जावं लागतं.दोराला धरुन वर चढण्यासाठी मुख्यत: आपल्या मनाची तयारी असावी लागते. कुठल्याही खडकावरुन जरा काही अन-वधानाने लक्ष विचलित झाले तर? नवशिक्याच्या भीतीने निराश व्हायला होतं. पण सरावाने आमची ही भीती नाहीशी झाली.

दुसऱ्या दिवशी आम्हाला एकूण १३० कि. मी. च्या ट्रेकींगच्या अकरा दिवसात टप्याटप्याने दहा ठिकाणी कोठे कोठे मुक्काम करायचा तेथे राहण्याची, जेवणाची व्यवस्था कशा प्रकारे असेल व ट्रेकींगमध्ये पाळावयाचे नियम याविषयी माहिती देण्यात आली. पाठीला सामानाने भरलेला १० ते १२ किलो वजनाचा हॅवर सॅक व मनामध्ये दुर्दम्य साहस व उत्साह यासह ११ दिवसासाठी आमचा हिमालय ट्रेकींगचा प्रवास सुरु झाला

आमचा एकूण साठ जणांचा ग्रुप होता. त्यामध्ये पंधरा मुली होत्या. आमचा ग्रुप लीडर राजा राजश्रीकर हा होता. त्याने ८० सालापासून ट्रेकींगच्या अनेक मोहिमांमध्ये 'ग्रुप लीडर' म्हणून कार्य केले होते त्यामुळे त्याच्याकडून अनेक ठिकाणी आम्हाला मार्गदर्शन मिळाले. आमच्या ग्रुपमध्ये डॉक्टर, वकील, इंजिनिअर अशा अनेक प्रतिष्ठित व्यक्तींचा सहवास होता. त्यामुळे अनेक क्षेत्रातील वेगवेगळ्या प्रांतातील लोकांबरोबर ओळखी झाल्या. मार्गामध्ये रस्त्यात डेरेदार चिनार, वेद, सफरचंद इत्यादींची वृक्षराजी पाहून मन भरुन येत होते. वरती निळेभोर आकाश त्याखाली पांढरी शुभ्र हिमालयाची शिखरे, चोहीकडे हिरवळ, त्याखाली पर्वतामधून वाहणाऱ्या नदीचे पाणी हे सारे दृश्य अगदीं डोळ्यांना सुख देते.

एकंदर पहिल्या सहा दिवसाच्या प्रवासात कोणत्या स्वरुपाची वाट आपण पुढे चालणार आहोत? याची आम्हाला साधारण कल्पना आली होती. केवळ साधा रस्ता पार करायचा नाही तर खूप चढ-उतार, भयानक वाहणाऱ्या हिमनद्या, सारखे बदलणारे निरनिराळ्या प्रकारचे वातावरण, अतिशय कडाक्याची थंडी या सर्व गोष्टींना तोंड देत जायचे आहे याची कल्पना आली होती. रोज सकाळी लवकर उठून सारे काही उरकायचे. विस्कटलेली हॅवर सॅक पुन्हा नीट करायची, सकाळचा नाष्टा करुन 'पॅकलंच' घेऊन पुढे निघायचे निरनिराळ्या स्वरुपाचा बदलता निसर्ग न्याहाळीत पुढच्या मुक्कामाला जायचे. तेथे विश्रांती घेऊन रात्रीचे जेवण आटपून रात्री 'कॅम्प फायर' व्हायचे. कॅम्प फायर मध्ये प्रत्येकजण आपल्या अंगी असलेले कलागुण दाखवित. कोणी गाणी म्हणत, कोणी नकला करीत, कोणी अभिनय करीत. त्यामुळे प्रत्येक युवकाच्या अंगी असलेल्या गुणांना वाव मिळे आणि एक प्रकारचे स्टेज डेअरींग येई.

कसोल या गावी गरम पाण्याचे झरे पाहून आम्ही सर्व जण आश्चर्यचकित झालो. पहिल्या सात दिवसात फक्त तेथेच आम्ही अगदी मनसोक्त आंघोळी केल्या.

आठव्या दिवशी पुढे जाताना काही ऊच ऊंच झाडे दिसत होती. ही वाट जवळ जवळ ९२०० फुट ऊंचाव-रती होती इथला अनुभव काही वेगळा अस्वथ करणारा वाटला. मध्येच थोडासा पाऊस येतो की काय असं वाटायचं. तर काही वेळेला पर्वतांच्या शिखरांवरती ढग जमलेले दिसयचे. तिथे पाऊस पडतो की काय असं वाटायचं. त्यानतर अगदा बर्फाजवळ असलेल्या कॅंपमध्ये आम्ही मुक्काम केला.

पुढे नवव्या दिवशी आमचा खरा साहसी ट्रेक होता. प्रत्येक तरुणाची तेथे खरी परीक्षा होती. कारण त्या दिवशी १२,२०० फुट ऊंच आणि आठ कि. मी. संपूर्ण बर्फ असा आमचा बर्फातील ट्रेक होता. आमच्या बरोबर एक गाईड दिला होता. तो सांगेल तिकडे आम्ही निसर्ग न्याहळीत एकमेकांशी गप्पा मारत, दऱ्या, डोंगर, चढ उतार ओलांडीत जात होतो थोडी वेडीवाकडी वळणे घेतल्यानंतर बर्फाला खरोखरच प्रारंभ झाला. तेथून आम्हाला संपूर्ण बर्फाच्छादित 'खवली' हा पर्वत ओलांडायचा होता. तेथे पोहोचलो तो क्षण श्रम सार्थकी लागावे असाच होता. बर्फाचे गोळे करुन एकमेकांवर फेकणे, बर्फात मनमुरद खेळणे, घसरणे अशा गोष्टी सिनेमात पाहिल्याप्रमाणे करता येतील अशी आमची कल्पना होती पण ती सोडून देऊन मनाला मुरड घालून गुपचुप पुढे जावे लागले. पुढे बर्फातून जवळजवळ आठ कि. मी चलायचे होते. त्यामुळे सगळे जण जलद गतीने वारकरी मंडळी चालतात तसे पुढे चालत होते. पुढे, मागे, खाली डावीकडे, उजवीकडे पांढरे शुभ्र बर्फ होते. भान हरपून आजुबाजूचे सौंदर्य पाहावे तर घसरण्याची भीती आणि त्यातही पायाखाली अतिशय गार! त्यामुळे आम्हा सर्वांची चमत्कारिक स्थिती झाली होती. असे अजून किती चालावे हे समजत नव्हते नुसते चालत राहणे हा एकच मार्ग होता. या मार्गातील हा बर्फ संपला व आम्ही आता १२२००फूट उंच'खवली' पर्वतावर पोहचलो.

आपल्या ट्रेकींग मधील साहसाची आम्ही अंतिम सीमा गाठली होती. या यशस्वी क्षणाचा आनंद अवर्णनीयच आहे. पांढऱ्या शुभ्र हिम शिखरावरुन निळ्याभोर आका-शाशी संवाद साधावा अशी एक कल्पना मनात उसळी मारुन गेली.

आता त्यानंतर खाली यायचे होते. सगळी उतरण होती आणि आता ही उतरण घसरडी झाली होती शेवटी घसरत घसरत आम्ही खाली येऊन पोहोचलो. 'खवली' पार केल्याचा आनंद सर्वांना झाला होता. त्या-मुळे थकवा अगदी काहीच वाटत नव्हता.

त्यानंतर शेवटचे दोन दिवस मात्र आम्ही अगदी मजेत घालविले. बाराव्या दिवशी आम्ही ट्रेकींग संपवून बेस कॅम्पवर पोहोचलो. त्या दिवशी आमचा ग्रुप फार लकी असा समजला गेला. कारण त्याआधी आमच्या आधीचे काही ग्रुप्स बदलत्या वातावरणामुळे ट्रेकींग पूर्ण करु शकले नव्हते !

तारुण्य आणि साहस यांचे अतूट नाते आहे. खरंच, प्रत्येक तरुणाने घ्यावा असाच हा अनुभव आहे–ट्रेकींगचा!

❊

---

❊ फुकटचे अन्न खाणारा जन्मभर मिंधाच राहतो आणि मग असा माणूस भविष्यकाळात धडाडीने काही करु शकत नाही.

❊ स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद. श्रम हीच आमची पूजा आणि श्रमाच्या मोबदल्यात मोफत शिक्षण हेच आमचे घोषवाक्य!

❊ मनगटातील बळ हीच माझ्या शैक्षणिक प्रयोगाची गुरु-किल्ली आहे.

❊ पैसा नाही म्हणून मी माझे कार्य कधीच बंद पडू देणार नाही. जर वेळ आली तर मी स्वतः विकून घेईन, पण शाळा बंद पडू देणार नाही.

❊ माझ्या दाढीत जितके केस असतील त्यांच्यापेक्षा शत-पटीने अधिक रयतेची मुले व मुली मी शिकवून तयार करणार आणि समाजशोषण करणारांच्या छाताडावर थयथय नाचायला लावणार.

❊ शिक्षण हा माणसाच्या जीवनाचा पाया आहे. मानव-जातीच्या उत्कर्षाचे ते एक प्रभावी साधन आहे.मानवा-च्या अवनतीचे कारण हे शिक्षणाच्या अभावात आहे. प्रभावी शिक्षण हे बलशाली राष्ट्र निर्माण करु शकते.

–कर्मवीर भाऊराव पाटील

अमृत वर्षापर्यन्त ज्यांनी आपल्या चिरतरुण प्रतिभेने
अनेक तरूण मनातील काव्य स्फुलिंग चेतविला
त्या कविवर्य कुसुमाग्रजांना अमृतमहोत्सवानिमित्त
विनम्र अभिवादन व अनंत शुभकामना !

*या प्रसंगी नवोदित कविमित्रांसाठी*

## एक फटका

मम शब्दांनो मयासुराच्या
भुलाव्यात या शिरू नका
निरर्थकाच्या रंगमहाली
पदर धुक्याचे धरू नका
असंभवातुन भ्रमू नका
शून्याचा रस पिऊ नका
नदी मातली कुण्या गावची
घडे भराया धावु नका.
कल्पतरूवर राजस पक्षी
पिसे मिळाया शिणू नका
इंद्रधनूच्या पुलावरोनी
पैल जायचे म्हणू नका
आकाशाची असीम महती
गणू नका पण हिणकस माती
ज्वलनास्तव जर जन्म आपुला
जळावयाला भिऊ नका.

**कुसुमाग्रज**



# ॥कविता॥ ॥कविता॥ ॥कविता॥

## यातना

नको नको दु:ख नको
नको नको या यातना
भळभळत्या जखमा
आत वरती ना खुणा
आतड्यांना पिळणाऱ्या
काळजांना जाळणाऱ्या
मनांतून छळणाऱ्या
इथे तिथे पुन्हा पुन्हा

कंठातून दाटणाऱ्या
ओठाआड गोठणाऱ्या
पापण्यात साठणाऱ्या
मूक साऱ्याच वेदना
रोमरोमी सलणाऱ्या
नि:श्वासात फुलणाऱ्या
आठवणी सोलणाऱ्या
डसणाऱ्या नित्य मना

सारे यातना-सरण
पेटलेले ढणढण
होरपळते जीवन
आता तरी ये मरणा

**कु. लता रंगनाथ गोसावी**
एस्. वाय्. बी. एस्सी.

## अश्रुची लाट !

मिटल्या पापण्यांच्या आंत दडलेले मोतीबिंदू,
मोकाटपणे घळघळून वाहताना,

हृदय फाटल्याप्रमाणे असंख्य वेदना, त्यातून
वहावत निघाल्या.......

वाटलं,थोपवावं त्यांना, चुचकारावं,कुरवाळावं...
पण...? बेभान झालेल्या आसवांना,
थोपविण्यासाठी केलेले माझे सारे श्रम,

टचटचलेले डाळींब कवच फोडून बाहेर पडावे,
तद्वत् आसवं माझ्या प्रयत्नाच्या बांधाला
तटातट तोडून चहूकडे विखरुन गेली. निर्दयपणे!

तरीही वाटली आशा, फुटलेल्या, वाहणाऱ्या त्या
आसवांचे, सहानुभूतीने मन वळवावे............,

नाही, आशा फोलच ठरली ती, 'एकदा फुटून
वाहलेला बांध,
पुन्हा जुळणं शक्य नसतं'... आसवांनीच उलट
प्रति फटकारले!

भावनावेगाला थोपवणं कुणाला जमलंय
आयुष्यात, ज्यानं या वेगाला बांध घालून;

आसवांना मनाच्या कडी कोयंड्यात अक्षरश:
डांबून ठेवलंय,
विरळाच असा मानव सबंध जगतात!

**सुपेकर जयवंत**
टी. वाय्. बी. ए. ( हिंदी विभाग )

## कविता

पलिकडच्या किना-यावर
तू शांत उभा
मी अलिकडे वादळाने
झपाटलेली
आकाशातील चंद्र
मिष्कील
इतकं, सगळं असूनही
माझ्या हातातील
गुलाब तुझ्या कुंडीमधे
वेडया आशेने
वहरतोय.

...... ..... ......................... ...........

झोपडपट्टितून वाहणाऱ्या
गटारगंगेत कधी,
एखादं कृष्णकमळ उगवतं,
हळूच एखादी राधिका
डोळ्यांची उघडमीट करते
तर एखाद्या शिशुपालाचं
निमित्त होऊन त्याच्यातील
अन्याय खवळून उठतो.
पण सत्तेपुढे शहाणपण चालत नसतं
आणि देवकी, यशोदे समोरच
पारध्याचा बाण
त्याच्या वर्मी बसतो.

कु. ज्योती मरकळे
एम. ए. मराठी
प्रथम वर्ष

## वेदना

जीवनात वेदनेची
येता हळूच चाहूल
उभी रात्र थांबते
येवून दोन पाऊले
वाट वाट अंधारली
पान पान गहिवरले
जीव झाला अर्धमेला
कुठे तरी भिरभिरे

वेदनात वेदनेला
कधी लाभे ना शांती,
तीन युगाचा थकवा
कधी मिळेना विश्रांती.

राजकुमार बाफना
एस. वाय. बी ए.

## तुजपाशी

बोलू नये ते बोलून गेलो
मोकळया मनाने तुजपाशी
सच्च्या स्वरात गाऊन गेलो
'दर्दी' समजून तुजपाशी
आपले म्हणून रडत आलो
कित्येक वेळा तुजपाशी
भान सोडून चिडत आलो
माझं समजून तुझ्यावर
तासन् तास गप्पात रंगलो
भूक विसरुन तुजपाशी
केव्हा केव्हा पराजित होऊन
नुसताच मूक बसलो तुजपाशी
कधी कधी मोठी आशा धरुन
आश्रयाला आलो तुजपाशी
काय चुकले, काय बरोबर
त्याचा हिशेब तुजपाशी
माझे असे होतेच काय
तुझ्याबाचून माझ्यापाशी?

करांडे. एस्. एम्.
टी. वाय. बी. कॉम्.

भान हरपून आजुबाजूचे सौंदर्य पाहावे तर घसरण्याची भीती आणि त्यातही पायाखाली अतिशय गार! त्यामुळे आम्हा सर्वाची चमत्कारिक स्थिती झाली होती. असे अजून किती चालावे हे समजत नव्हते नुसते चालत राहणे हा एकच मार्ग होता. या मार्गातील हा बर्फ संपला व आम्ही आता १२२००फूट उंच'खवली' पर्वतावर पोहचलो.

आपल्या ट्रेकींग मधील साहसाची आम्ही अंतिम सीमा गाठली होती. या यशस्वी क्षणाचा आनंद अवर्णनीयच आहे. पांढऱ्या शुभ्र हिम शिखरावरुन निळयाभोर आकाशाशी संवाद साधावा अशी एक कल्पना मनात उसळी मारुन गेली.

आता त्यानंतर खाली यायचे होते. सगळी उतरण होती आणि आता ही उतरण घसरडी झाली होती. शेवटी घसरत घसरत आम्ही खाली येऊन पोहोचलो. 'खवली' पार केल्याचा आनंद सर्वांना झाला होता. त्यामुळे थकवा अगदी काहीच वाटत नव्हता.

त्यानंतर शेवटचे दोन दिवस मात्र आम्ही अगदी मजेत घालविले. बाराव्या दिवशी आम्ही ट्रेकींग संपवून बेस कॅम्पवर पोहोचलो. त्या दिवशी आमचा ग्रुप फार लकी असा समजला गेला. कारण त्याआधी आमच्या आधीचे काही ग्रुप्स बदलत्या वातावरणामुळे ट्रेकींग पूर्ण करु शकले नव्हते.!

तारुण्य आणि साहस यांचे अतूट नाते आहे. खरंच, प्रत्येक तरुणाने घ्यावा असाच हा अनुभव आहे–ट्रेकींगचा!

---

- फुकटचे अन्न खाणारा जन्मभर मिंधाच राहतो आणि मग असा माणूस भविष्यकाळात धडाडीने काही करु शकत नाही.
- स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद. श्रम हीच आमची पूजा आणि श्रमाच्या मोबदल्यात मोफत शिक्षण हेच आमचे घोषवाक्य!
- मनगटातील बळ हीच माझ्या शैक्षणिक प्रयोगाची गुरुकिल्ली आहे.
- पैसा नाही म्हणून मी माझे कार्य कधीच बंद पडू देणार नाही. जर वेळ आली तर मी स्वतः विकून घेईन, पण शाळा बंद पडू देणार नाही.
- माझ्या दाढीत जितके केस असतील त्यांच्यापेक्षा शतपटीने अधिक रयतेची मुले व मुली मी शिकवून तयार करणार आणि समाजशोषण करणारांच्या छाताडावर थयथय नाचायला लावणार.
- शिक्षण हा माणसाच्या जीवनाचा पाया आहे. मानवजातीच्या उत्कर्षाचे ते एक प्रभावी साधन आहे. मानवाच्या अवनतीचे कारण हे शिक्षणाच्या अभावात आहे. प्रभावी शिक्षण हे बलशाली राष्ट्र निर्माण करु शकते.

–कर्मवीर भाऊराव पाटील

अमृत वर्षापर्यन्त ज्यांनी आपल्या चिरतरुण प्रतिभेने
अनेक तरूण मनातील काव्य स्फुलिंग चेतविला
त्या कविवर्य कुसुमाग्रजांना अमृतमहोत्सवानिमित्त
विनम्र अभिवादन व अनंत शुभकामना !

*या प्रसंगी नवोदित कविमित्रांसाठी*

## एक फटका

मम शब्दांनो मयासुराच्या
भुलाव्यात या शिरू नका
निरर्थकाच्या रंगमहाली
पदर धुक्याचे धरू नका
असंभवातुन भ्रमू नका
शून्याचा रस पिऊ नका
नदी मातली कुण्या गावची
घडे भराया धावु नका
कल्पतरुवर राजस पक्षी
पिसे मिळाया शिणू नका
इंद्रधनूच्या पुलावरोनी
पैल जायचे म्हणू नका
आकाशाची असीम महती
गणू नका पण हिणकस माती
ज्वलनास्तव जर जन्म आपुला
जळावयाला भिऊ नका.

**कुसुमाग्रज**



# ॥कविता॥ ॥कविता॥ ॥कविता॥

## यातना

नको नको दुःख नको
नको नको या यातना
भळभळत्या जखमा
आत वरती ना खुणा
आतड्यांना पिळणाऱ्या
काळजांना जाळणाऱ्या
मनांतून छळणाऱ्या
इथे तिथे पुन्हा पुन्हा
कंठातून दाटणाऱ्या
ओठाआड गोठणाऱ्या
पापण्यात साठणाऱ्या
मूक साऱ्याच वेदना
रोमरोमी सलणाऱ्या
निःश्वासात फुलणाऱ्या
आठवणी सोलणाऱ्या
डसणाऱ्या नित्य मना
सारे यातना-सरण
पेटलेले ढणढण
होरपळते जीवन
आता तरी ये मरणा

कु. लता रंगनाथ गोसावी
एस्. वाय्. बी. एससी.

## अश्रुंची लाट !

मिटल्या पापण्यांच्या आंत, दडलेले मोतीबिंदू,
मोकाटपणे घळघळून वाहताना,

हृदय फाटल्याप्रमाणे असंख्य वेदना, त्यातून
वहावत निघाल्या......

वाटलं,थोपवावं त्यांना, चुचकारावं,कुरवाळावं...
पण...? बेभान झालेल्या आसवांना,
थोपविण्यासाठी केलेले माझे सारे श्रम,

टचटचलेले डाळींब कवच फोडून बाहेर पडावे,
तद्वत् आसवं माझ्या प्रयत्नाच्या बांधाला
तटातट तोडून चहूकडे विखरुन गेली. निर्दयपणे!

तरीही वाटली आशा, फुटलेल्या, वाहणाऱ्या त्या
आसवांचे, सहानुभूतीने मन वळवावे............,

नाही, आशा फोलच ठरली ती, 'एकदा फुटून
वाहलेला बांध,
पुन्हा जुळणं शक्य नसतं'... आसवांनीच उलट
प्रति फटकारले!

भावनावेगाला थोपवणं कुणाला जमलंय
आयुष्यात, ज्यानं या वेगाला बांध घालून;

आसवांना मनाच्या कडी कोयंड्यात अक्षरशः
डांबून ठेवलंय,
विरळाच असा मानव सबंध जगतात!

सुपेकर जयवंत
टी. वाय्. बी. ए. ( हिंदी विभाग )

## कविता

पलिकडच्या किना-यावर
तू शांत उभा
मी अलिकडे वादळाने
झपाटलेली
आकाशातील चंद्र
मिष्कील
इतकं, सगळं असूनही
माझ्या हातातील
गुलाब तुझ्या कुंडीमधे
वेडया आशेने
बहरतोय.

------ ----- ----------------------- ----------

झोपडपट्टितून वाहणाऱ्या
गटारगंगेत कधी,
एखादं कृष्णकमळ उगवतं,
हळूच एखादी राधिका
डोळयांची उघडमीट करते
तर एखाद्या शिशुपालाचं
निमित्त होऊन त्याच्यातील
अन्याय खवळून उठतो.
पण सत्तेपुढे शहाणपण चालत नसतं
आणि देवकी, यशोदे समोरच
पारध्याचा बाण
त्याच्या वर्मी बसतो.

कु. ज्योती मरकळे
एम. ए. मराठी
प्रथम वर्ष

## वेदना

जीवनात वेदनेची
येता हळूच चाहूल
उभी रात्र थांबते
येवून दोन पाऊले

वाट वाट अंधारली
पान पान गहिवरले
जीव झाला अर्धमेला
कुठे तरी भिरभिरे

वेदनात वेदनेला
कधी लाभे ना शांती,
तीन युगाचा थकवा
कधी मिळेना विश्रांती.

राजकुमार बाफना
एस. वाय. बी ए.

## तुजपाशी

बोलू नये ते बोलून गेलो
मोकळया मनाने तुजपाशी
सच्च्या स्वरात गाऊन गेलो
'दर्दी' समजून तुजपाशी
आपले म्हणून रडत आलो
कित्येक वेळा तुजपाशी
भान सोडून चिडत आलो
माझं समजून तुझ्यावर
तासन् तास गप्पात रंगलो
भूक विसरुन तुजपाशी
केव्हा केव्हा पराजित होऊन
नुसताच मूक बसलो तुजपाशी
कधी कधी मोठी आशा धरुन
आश्रयाला आलो तुजपाशी
काय चुकले, काय बरोबर
त्याचा हिशेब तुजपाशी
माझे असे होतेच काय
तुझ्याबाचून माझ्यापाशी?

करांडे. एस. एम्.
टी. वाय. बी. कॉम्.



## लोकनीती

'लोकनीति' म्हणजे लोकांनी पाळावयाची नीती
लोकांनी लोकांसाठी पाळावयाच्या रीतिभाती
आता 'राजेशाही' उरलेली नाही,
'सरंजामशाही' जगलेली नाही.
तशीच डळमळते आहे 'भांडवलशाही.'
आता लोकशाहीचा विचार अधिक चांगला
लोकांचा त्यात मान वाढला
माणूस अधिक शहाणा झाला
एक पाऊल पुढे गेला............

पण एवढया पाऊलावर थांबायचे नाही
एवढा शहाणपणा पुरायचा नाही......
लोकशाहीचा विचार तपासला पाहिजे........
एका विचारातून दुसरा विचार
एका आचारातून दुसरा आचार
असा विकास झाला तरच,
नवा माणूस होईल साकार!

आज 'लोकशाही'त 'लोक'च नाहीत.
निवडणूका, मतदान, कायदे, प्रतिनिधी
अल्पसंख्य-बहुसंख्य अशा तंत्रात
हरवला आहे लोकशाहीचा मंत्र.
यावर एकच उपाय- लोकनीती!
म्हणजे कसलीच राहणार नाही भीती.

राजनीतीला लोकनीतीचा शह
सत्तेच्या धुंदीला लोकनीतीचा उतारा.
कोणी संपत्तीने वरचढ नको.
कोणी सत्तेने शिरजोर नको
कोणी बहुसंख्येने डोईजड नको.
एकूण पन्नासावर एक्कावन्नांची आरेरावी नको

लोकांनीच पुढे यावे
सामूहिक हित जतन करावे
सर्वांनाच संधी असावी
सर्वांचीच मान ताठ रहावी.
अशी आहे लोकनीती............
व्यक्ती, समाज, देश, यांची भाग्य विधात्री!

प्रदीप कदम
एफ्. वाय्. बी. ए.

## सवाल

संतांची वाणी युगायुगापासून सांगते-
'जेथे दया, क्षमा, शांती, तेथे देवाची वसती.
सर्व मानवजात ही देवाची निर्मिती.'
तर मग येथे
सारे मानव एकमेकांशी का भांडती?
एकमेकांचा खून का करती?
एकमेकांची धनसंपत्ती का लुटती?
देवाच्याच मंदिराची जाळपोळ का करती?
बलात्कार का होतो अबलेवरती?
प्रत्येक जीवाला जगण्याची का भीती?
स्वातंत्र्याची सर्वांना का वाटते धास्ती?
अशावेळी देव काय करीत असतो?
तत्वज्ञानाची पाने तर सांगतात-
'जे जे दिसे जगी, ती देवाची निर्मिती,'
तर मग कोणी निर्मिल्या या वाईट प्रवृत्ती?

शेलार. आर् पी
एम्. कॉम्. भाग. १

## पाऊलखुणा

आपल्याच 'पाऊलखुणा' या
आपल्याच जुन्या वहाणा या
चला जावू असे आडवाटेने
किती पाऊलवाटा राना या
ही मेंढपाळाची साधी शिळ आहे...
नाहीत गवयांच्या ताना या
दरवळे भोवती गंध मातीचा.
हाच जीवनार्थ जाणाया
कोण होती जननी, कोण रक्षिणी?
विचारा रहस्य पाना या
पहा तो डोंगर! अहा! तो ओहोळ!
नाती जुळवू नाना या
बरस बरस मनसोक्त बरस
चला आळवू घना या........

संदीप सुभेदार
एस्. वाय्. बी. ए.

## रिकाम्या कपबशा !

आजकालच्या वागा या अशा कशा?
जिथं पहावं तिथं फक्त उरल्या रिकाम्या कपबशा
त्यांच्यातही नाही औत्सुक्य ,केवळ...
तोंडावर भाबडं हसं!
चेहरे तरी माणसाने किती निरखावे?
चेहऱ्यांवर सुध्दा आजकाल दिसे अवकळा
बरं, चेहरे तरी कुठे उरलेत आता पहिल्यासारखे?
त्यावर आणलेत आजकाल औपचारिक अुपचार!
त्या चेहऱ्यांच्या पाठीमागे दडल्यात गंभीर खुणा!
किती चेहरे पहावेत! !
प्रत्येक चेहऱ्यात दिसतात वार्धक्याच्या छटा!
म्हटलं, असतील कुठेतरी यौवनाच्या खुणा
पण व्यर्थ ! चेहरेच सांगतात......
माणसाच्या माणुसकीच्या
आक्रसलेल्या, कुरतडलेल्या
मरगळलेल्या भावना !

सुनिल खडके.
एस्. वाय्. बी. ए.

## रजनी

हलके हलके पदन्यास करीत
रात्र धरतीवर आली!
चंद्राच्या प्रकाशात लख्ख न्हाऊन गेली!
पानांच्या कुशीत कळ्या विसावल्या,
उद्याच्या उमलण्याची स्वप्ने पहात निजल्या!
अंधाराच्या संकेतावर रातराणी बहरली,
मंद मंद सुवासात चिंब भिजून गेली!
चांदण्यांकडे पहात काजवा गोड हसला!
झाडीत भटकायला चमकत बाहेर पडला.
रातकिड्यांनी किर्किर आरंभली.
रात्रीने चंद्र किरणांची शाल पांघरली!
रातराणीच्या सुवासात
काजव्यांच्या प्रकाशात
रातकिड्यांच्या किरकिरीत
रात्र धरतीवर आली
उद्या परत येण्याचे आश्वासन देऊन गेली!

कु. शैला गायकवाड
टी. वाय्. बी. ए.

## अखेर

दूरदेशी कोणीतरी
वाट पाहणारे असावे.
विरहाच्या ओठी माझी
सुख-दुःख विसरावे.
यावे आभाळ भरोनी
मन स्मृतींनी भरावे.
पडावेत जलबिंदू
अश्रुजली चिंब व्हावे.
कोण्यातरी विरहणीचे
सुर पडावेत कानी.
मुग्ध प्रेम भावनेत
मन जावे हे गुंतोनी.
सूरावरी विहरत
जावे वृक्ष सावलीत.
निद्रा यावी स्वप्नाविण
| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण |
|---|---|---|---|
| १) पदवी वर्ग | १३२४ | ३४२ | १६६६ |
| २) पदव्युत्तर वर्ग | १८५ | ४९ | ३३४ |
| ३) एकूण | १६०९ | ३९१ | २००० |

**पुनर्रचित अभ्यासक्रम विद्यार्थी संख्या–**

| | |
|---|---|
| १) टी. वाय. बी. ए. | १९२ |
| २) टी. वाय. बी. एस्सी | ८३ |
| ३) टी. वाय. बी. कॉम. | १९३ |
| एकूण | ४६८ |

**वसतिगृह विद्यार्थी संख्या–**

अ) मुलांचे वसतिगृह – ८३

ब) मुलींचे वसतिगृह – ५२

**प्राध्यापक संख्या–**

| पूर्णवेळ | अर्धवेळ | एकूण |
|---|---|---|
| ७१ | ४ | ७५ |

३) **सेवक वर्ग**

| | |
|---|---|
| १) ग्रंथपाल | १ |
| २) क्लार्कस | १७ |
| ३) प्रयोगशाळा सहाय्यक | ४ |
| ४) शिपाई | २४ |
| **एकूण** | ४६ |

**नवागतांचे स्वगत**

१) प्रा. एस. बी. पाटील (इलेक्ट्रॉनिक्स

२) प्रा. एम. आर. साळवे (कॉमर्स)

३) प्रा. एस. एन. जगताप ( „ )

४) प्रा. एस. एस. कापसे ( „ )

५) प्रा. एम. एच. बी शेख ( „ )

६) प्रा कु. व्ही. डी. मूर्ती (काम्प्युटर सायन्स)

७) प्रा. कु. एस. जे. देशपांडे (संख्याशास्त्र)

८) प्रा. एस. जी. तातर (रसायनशास्त्र)

९) प्रा. ए. एस. नेमाडे ( „ )

१०) प्रा. आर. एस. शिंदे (पदार्थविज्ञान)

११) प्रा. कु जे जी. गांधी (अर्थशास्त्र)

१२) प्रा. सौ. एस. सी. तिडके (वनस्पतीशास्त्र)

१३) प्रा. डॉ सी. व्ही. मुरुमकर ( „ )

१४) प्रा. बी. पी. गोडसे (भूगोल)

**हार्दिक अभिनंदन**

पुढील प्राध्यापकांनी आपल्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ केली.

| | |
|---|---|
| १) प्रा. आर. के. खाडे | एम. फिल. |
| २) प्रा. सौ. ए ए. पाध्ये | एम. एड्. |
| ३) प्रा. डॉ. सी. व्ही मुरुमकर | पी. एच. डी. |

**ऋणनिर्देश –**

दिनांक २९ डिसेंबर १९८६ ते १० जानेवारी१९८७ या कालावधीत महाविद्यालयातील प्रथम वर्ष बी.ए/ बी.कॉम. /बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम. व वसतीगृहातील मुले-मुली यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. डॉ. व. मा. कोठारी, डॉ. अजित मोकाशी,डॉ. व्ही. एन. दोशी, डॉ. एम. आर. दोशी, डॉ. के. डी. गुजर, डॉ एन. जी. रणवरे, डॉ. अजित अंबर्डेकर, डॉ के. बी. आटोळे, डॉ. उर्मिला कुर्लेकर, डॉ. ममता गुजर, डॉ. हर्षदा मोकाशी, डॉ. माधुरी मोकाशी या बारामतीतील नामवंत डॉक्टरांनी बहुमोल सहकार्य केले. प्रतिवर्षी लाभणाऱ्या त्यांच्या सहकार्यामुळे आम्ही त्यांचे हार्दिक आभारी आहोत.

वऱ्हाणपूर येथें राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात तेथील ग्रामस्थांची व शालेय विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी पुण्याच्या अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक, डॉक्टर्स व विद्यार्थी यांना आमंत्रित केले होते. याकामी उत्स्फूर्त व मनःपूर्वक सहकार्य दिल्याबद्दल त्या महाविद्यालयाचे प्राचार्य व सहभागी डॉक्टर्स व विद्यार्थी यांचे मनःपूर्वक आभार.



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

अनन्तधर्मणस्तत्त्वं पश्यन्ती प्रत्यगात्मनः
अनेकान्तमयी मूर्तिर्नित्यमेव प्रकाशताम् ॥

# अनेकान्त

**वार्षिक नियतकालिक**
**(कनिष्ठ)**

अंक पंचविसावा १९८७-८८

**अनेकान्त एज्युकेशन सोसायटी**

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## अनुक्रम


**एक लेख :** आजची स्त्री मुक्त आहे काय?
कु. विमल बनकर
११ वी आर्टस् १

**दोन कथा:** लॉकेट दीड तोळ्याचे
कैलास दोडके
१२ वी आर्टस् २

संघर्ष
वाघमारे बी. डी.
१२ वी आर्टस् ५

**सहा कविता:** जीवन
घुले भगीरथ आदिनाथ
११ वी आर्टस ७

श्रमदान
कैलास दोडके
१२ वी आर्टस ७

घात
कु. विमल बनकर
११ वी आर्टस ८

तू एकटाच
आलीम शेख
११ वी आर्टस ८

शब्द पाखरांचे
रेहना खान
१२ वी आर्टस ८

आठवण
आलीम शेख
११ वी आर्टस ८


('वाटतं कधी' ही-गेल्या वर्षीच्या अंकात प्रसिद्ध झालेली श्री. पी. आर. शेलार यांची कविता श्री. तावरे रविन्द्र एकनाथ यांनी चोरली. अनवधाने पुन: प्रकाशित झाली याबद्दल आम्ही दिलगीर आहोत – संपादक)

# आजची स्त्री मुक्त आहे काय ?


कु. विमल बनकर
११ वी आर्टस्


आजकाल लग्न समारंभ म्हणजे प्रत्यक्षात मुला-मुलींची खरेदी विक्रीच झाली आहे.

लग्न म्हणजे सुशिक्षित आणि सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजातील मुला-मुलींचा एका भयानक पद्धतीने केला जाणारा 'बाजार' होय. बाजाराप्रमाणेच सर्व व्यवहार घासाघासीने होतात. पण त्याला 'देवाण-घेवाण' असे गोंडस नाव आहे या व्यवहारात वधू आणि वर दोघेही विकले खरीदले जातात. बहुतेक ठिकाणी मुलीकडून हुंडा घेतला जातो. काही ठिकाणी मात्र मुलाकडूनही हुंडा घेतला जातो.

मुलीकडून हुंडा घेणारा मुलगा एका प्रकारे स्वत:ची विक्री करीत असतः; तर मुलीचे जन्मदाते देखील मुलगी 'दान' देऊन शिवाय आणखी वर 'भर' घालतात. खरं म्हणजे शरीर व मन असणाऱ्या या जीवंत व्यक्तीचा-मुलीचा-हा अपमानच होय असे मला वाटते.

हा हुंडा ठरविण्याचा अधिकार फक्त वरपक्षाचा असतो. मुलीला 'आम्ही पोसतो' असा दावा करुन मुलगा हुंडा घेतो वास्तविक मुलांचा जन्म, संगोपन, नवऱ्याची देखभाल, सेवाशुश्रूषा हे सारे करणाऱ्या मुलीची किमत काय तर नवरा तिला पोसतो ! मुलाच्या शिक्षणाचा होणारा खर्च हुंडारुपाने घेतला जातो पण आज मुलीही शिकलेल्या असतात, मुलींच्या शिक्षणाचा फायदा लग्नानंतर मुलालाच होतो. मग मुलानेच तो खर्च का देऊ नये ? पण असे घडत नाही.तसेच जागेचा प्रश्नही बिकट! तो सोडविण्यासाठी हुंडा घेतला जातो. विवाहानंतरचे जे सहजीवन अपेक्षित आहे, त्याचा भार ही मुलींकडच्यांवर टाकला जातो काही ठिकाणी तर मुलीच्या वाट्याला आलेला वारसा-हक्क 'वर-दक्षिणा' म्हणून घेतात. नाहीतर कधी-कधी तर आई-वडिलांचा हट्ट मोडायचा नाही म्हणून मुलगा हुंडा घेतो. केवढा हा बालिशपणा ! नादानपणा ! कारणं अनेक, पण हुंडा अटळ ! एकूण काय, अशा प्रकारे अधिकांश प्रमाणात लग्नाच्या बाजारात खरेदी-विक्री होत असते. ती होत असताना वधुपक्षावर अधिक ताण पडतो. मुलीची किमत तर बाजारातील एखाद्या निर्जीव वस्तू-प्रमाणेच असते.तिचे मन लक्षात घेतलेच जात नाही.मग कसं म्हणायचं आजची स्त्री मुक्त आहे?

हुंड्याला समाजाची मान्यता आहे. मोठमोठ्या बँकाच्या जाहिरातीत मुलांच्या शिक्षणासाठी, तर मुलींच्या लग्नाच्या तरतुदीसाठी बचत करा असा सल्ला देतात ! मुलगा आणि मुलगी यांत फारकत केली जाते. हुंडा दिला नाही, कमी दिला वगैरे कारणांनी सासरी मुलीचा छळ होतो. कदाचित् खूनही होतात. पण या खूनालाच वकिली डावपेचाने आत्महत्या ठरविले जाते.

एक प्रकारे पुरुषांना सुटकेचा मार्ग मिळतो. तसेच सवलतही मिळते. एकवीसाव्या शतकात प्रवेश करणाऱ्या स्त्रीची ही तऱ्हा!

हुडाविरोधी कायदा होऊनही प्रतिष्ठा या नावाखाली थाटमार, स्वागत–समारंभ, देवघेव इ. चालतात. यात कुठपर्यंत स्वखुशी व कुठून प्रत्यक्षाप्रत्यक्ष दडपण सुरु झाले हे समजत नाही. हे प्रतिष्ठेचे लोण सर्वसामान्यांपर्यन्त पोहोचून सारे अन्यायकारकच बनते. एक रूढी म्हणून सारे केले जाणे, हा एक प्रकारचा अत्याचारच!

या हुंड्याविरोधी कायद्यामध्ये, अवघडपणा आहे. जनतेत त्याविषयी अज्ञान आहे. कायदा आपणास मदत करेल की नाही याबद्दल अविश्वास आहे. आणि मुख्य म्हणजे न्याय्य हक्कांच्या जाणीवांचा अभाव आपल्या ठिकाणी आहे म्हणून हुंडा दिला-घेतला जातो.हुंडा घेणारे छळ करतात व हुंडा देणारे तो छळ सहन करतात. जो-पर्यन्त मुलींच्या पालकांना हुंडा अटळ आहे असे न वाटता तो अपमानास्पद आहे, अन्यायकारक आहे, असे वाटत

नाही, त्यासाठी त्यांचे मन आणि हात समर्थ करणारे लोकशिक्षण मिळत नाही, तोपर्यंत हुंडाविरोधी कायदा होऊनही समाजातील तत्संबंधी अत्याचार कमी होणर नाहीत.

सध्याच्या समाजामध्ये स्त्रीला काही मन आहे, भावना आहेत, इच्छा आहेत हे सर्व मानायला समाज तयारच नाही. म्हणून या समाजाने स्त्रीला एखादचा जोखडात बांधलेय. असे म्हणणेच अधिक योग्य होईल. स्त्रीने जरा काही वेगळे केले तर समाजाला ते मानवत नाही. एखादीने बंड केले तर समाज, म्हणजेच समाजातील पुरुष तिच्यावर दडपण आणतात. तिला परिस्थितीपुढे शरण यायला लावतात.

इतका अंधार तिच्याभोवती आहे की एखादा प्रकाश किरणही तिच्यापर्यन्त पोहोचत नाही.

स्त्रीला महान मानणारी आपली संस्कृती! पण आज हेच स्त्रीत्व शाप ठरत आहे. कारण समाजात स्त्रीला काहीही किंमत नाही. समाज तिच्याकडे एक भोगवस्तू म्हणून पाहतो.समाजाच्या इच्छा समाज स्त्रीला निमूटपणे मान्य करायला लावतो. स्त्रीने गुलामगिरीचे 'सुख' भोगावे असे समाजाला वाटते. थोडक्यात काय तर. अगदी सर्कशीतल्या जनावरांप्रमाणेच स्त्रीचे जीवन 'अबोल' आहे! हे कशासाठी? तर आपणच निर्माण केलेल्या प्रतिष्ठेपायी!

मला वाटते की समाजाची आचार संहिता एका पुरुषाने निर्माण केली; ती जर एखाद्या स्त्रीने निर्माण केली असती तर एवढी क्रूर बंधनें तिने स्वत.वर लादून घेतली नसती. परंतु प्रत्येक पुरुष हा आपल्या बुद्धीचा वापर करीत नाही. जर प्रत्येकाने असा विचार केला की ह्या समाजात आपलीही कोणीतरी बहीण, आई, मावशी, पुतणी इ. कोणाच्या तरी घरी सून या नात्याने वावरत असते. तेंव्हा त्यांना होणारा त्रास लक्षात घेतला व प्रत्येक स्त्रीला बधनातून मुक्त केले तर समाजातील स्त्रीला, एकाच नव्हे तर प्रत्येक स्त्रीला, स्वातंत्र्य का मिळणार नाही?

पण हा विचार करणार कोण?

आयुष्य भर संसाराचा गाडा सतत कष्ट करुन चालविणे हेच स्त्रीचे कर्तव्य आज समाजामध्ये मानले जाते. स्त्रीला अजून कसला तो 'मी' पणा, स्वत:चा हक्क मिळतच नाही.

मग सांगा पाहू–

आजची स्त्री मुक्त आहे काय? उत्तर साहजिकच येते–

नाही! नाही!! नाही!!

❋

---

❋ **लाथ मारीन तेथे पाणी काढीन अशी धमक विद्यार्थ्यात असली पाहिजे. त्याला न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड असली पाहिजे. विद्यार्थ्याने डोक्यावरचे केसच नुसते वाढवावयाचे नसतात, त्याने डोक्यातले विचारही वाढविले पाहिजेत.**

❋ **महाराष्ट्राने यापुढे ब्राम्हण-ब्राम्हणेतरवादास मूठमाती दिल्याशिवाय त्याचा उद्धार होणे शक्य नाही. ब्राम्हणाची बुद्धी, मराठ्याचे मनगट आणि महाराची छाती ही सगळी एक झाल्याशिवाय महाराष्ट्राचा अभ्युदय होणार नाही.**

❋ **कुठल्याही संकटाला न डरता, गर्भगळीत होऊन न राहता, मर्दासारखे उठून पोलादाची कांब वाकवावी तसे परिस्थितीवर मात करुन तिच्यावर आरूढ झाले पाहिजे.**

**–कर्मवीर भाऊराव पाटील**



# लॉकेट दीड तोळ्याचे

**कैलास दोडके**
१२ वी आर्टस्

"ए आई, ए आई,आई. तार आलीय बघ कोणाची" सोनल ओरडतच आत पळाली.

शालिनीबाईंना तर तार म्हणताच कापरं भरलं. त्या स्वयंपाक घरातून पदराला हात पुसतच बाहेर आल्या पोस्टमनने सही साठी कागद पुढे केला. त्यांनी सही केली व तार हातात घेतली. पण त्याना वाचताच येईना. तार इग्रजीत असल्याने काहीच कळले नाही. तो पर्यंत सोनलने तिच्या बाबांना उठविले. बिचारे प्रभाकरराव नुकतेच कामावरुन येवून झोपले होते. तोच हा गोंधळ! नाइलाजाने प्रभाकरराव उठले व शालिनीबाईंच्या हातातील तार त्यांनी घेतली.तारेवरुन नजर फिरवताच त्यांच्या तोंडाचे पाणीच पळाले. "रेशु सिरीयस आहे. लवकर जायला हवं" एवढंच ते कसेबसे बोलू शकले. आणि मटकन् खालीच बसले.

शालिनीबाईंना तर त्राणच उरलं नाही– काही बोलायचं. पोरगी अत्ताच तर महिन्यापूर्वी गेली आणि सिरीयस होण्या सारखं काय घडलं असावं असा विचार करतच त्यांनी कशीबशी जाण्य ची तयारी केली. सोनल, श्रीकान्तला घरी ठेवुनच त्यांनी तासाभरात गाडी पकडली. गाडीने वेग घेतला पण दोघांची मने तर केव्हाच रेशु पर्यन्त जाऊन पोहचली. रेशु.त्यांच्या संसार वेलीवरचं पहिलंच आणि देखणं फुल होतं! स्वभावही मन मिळावू होता. त्या मुळे ती दोघांचीही आवडती, व लाडकी होती. सगळे शेजारी-पाजारी म्हणायचे,

"प्रभाकरराव,दोन्ही काचा एकच हिरा. कसं व्हायचं तुमचं आणि त्यात तुम्ही श्रीकान्तचेच लाड करताय." प्रभाकरराव म्हणायचे "नाही हो, ती तर माझीं फुल पाखरं आहेत. पंख फुटले की मग जातील त्यांच्या-त्यांच्या घरी. नंतर आहेच या बैलोबाचे लाड."

आणि आतातर त्यांचं लाडकं फुलपाखरु सासरच्या घरी अजारी होतं. मनाची नुसती तगमग चालली होती. कधी एकदा जाऊन तिला पाहतोय असं त्यांना झालं होतं.

एकदाचं गाव आलं. घर गाठण्यासाठी दोघेही झपाझप चालत होते चौकातून वळुन पाहतो तर घरा समोर गर्दी दिसली. तसं काळजात धस्स झालं. दोघांच्या पायातली शक्तीच गेली. क्षणार्धात वीज चमकून जावी त्या प्रमाणे नको तो विचार मनात चमकला. अन् डोळ्यापुढे अंधार दाटून आला. पण कसा बसा तोल सावरीत दोघेही वाऱ्या सारखी घरात शिरली. समोरचं दृश्य पाहून सुन्न झाली. क्षणभर आपण काय पाहतोय हेच कळेना आणि जेव्हा कळलं तेव्हा सगळं संपलेलं दिसलं. त्यांचं लाडकं फूल केव्हाच देवाच्या दरबारात गेलं होतं. समोर फक्त होतं तिचं काळंनिळं झालेलं शरीर व विद्रूप चेहरा. दोघांनी हंबरडा फोडला व धाय मोकलून तिच्या प्रेतावर पडून रडू लागले. रेशु या जगात नाही या कटु सत्याने त्यांना हे काय व कसे घडले हा विचार करण्यास संधीच दिली नाही. थोड्या वेळाने शालिनीबाईनी मुलीला निरखून पाहिले. काळं-निळं शरीर, विद्रूप चेहरा ही कुठल्या बरं रोगाची लक्षणं? नाही. हा रोग नाही. रेशुचे काहीतरी बरं-वाईट घडलेलं आहे. असं त्या मनात म्हणाल्या आणि दुसऱ्याच क्षणी त्या ओरडल्या, "नाही मी माझ्या पोरीची अशी बोळवण करु देणार नाही. तुम्ही राक्षसांनी पोरीला मारलीत जीव घेतलाय तिचा. उठा रेशूचे बाबा, काहीतरी करा," अन् प्रभाकरराव रेशूच्या नवऱ्याला सासू सासऱ्याला त्या बद्दल जाब विचारु लागले. पण त्यांनी एकाही प्रश्नाचे उत्तर दिले नाही. शेवटी प्रभाकररावांनी पोलीस स्टेशनचा रस्ता धरला. हे पाहताच दोघातीघांनी त्यांना डांबून धरले व बाकीच्यांनी प्रेत उचललं, हे बघताच रेशुची आई बेशुद्ध झाली. पण त्या नराधमांना त्याचं काहीच नव्हतं स्मशानात जाऊन लोक जेव्हा अग्नी देऊन परत आले तेव्हाच प्रभाकररावांना सोड-

ण्यात आले. क्षणाचाही विलंब न लावता प्रभाकरराव पोलीस स्टेशनकडे निघाले. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. या नराधमांनी अगोदरच तेथील नाकेबंदी केली होती. पोलीस प्रभाकररावांचं म्हणणं ऐकून घेण्याम तयार नव्हते. ते तसेच परत आले. पाहतात तर रेशुची आई शुद्धीवर आली होती व मोठ्याने रडत होती. इतक्यात त्यांचा जावई म्हणाला,

"आमच्या घरात रडायचे नाही, रडायचे असेल तर घरची वाट धरा !"

तापल्या तेलास रखे हे शब्द कानावर पडल्याबरोबर शालिनीबाईचा राग उफाळून वर आला. त्या रागाने थरथरत म्हणाल्या, "मेल्यांनो माझी सोन्यासारखी पोर गेलीय अन् रडू नको ? मग काय हसत बसू काय ? पाय धुवुन पाणी पिऊ का तुमचं ? पण लक्षात ठेवा आज ना उद्या याचा जाब तुम्हाला इथं नाहीतर वर द्यावाच लागणार आहे" इतक्यात प्रभाकररावांनी त्यांचा हात धरुन बाहेर नेलं.म्हणाले," या घरात आता क्षणभर सुध्दा थांबून उपयोग होणार नाही."आणि दोघे-ही स्टँडवर येऊन पोहचले. ते घरी आले. येऊन पाहतात तर काय? रेशुचे जावेचे आई वडील आलेले होते.त्यांनी रेशुबद्दल सांगितलेली कहाणी ही काळीज हेलावणारी होती.

दोन महिन्यांपूर्वी झालेल्या रेशुच्या बहिणीच्या सोन-लच्या लग्नात दीड तोळ्याचे लॉकेट व भारीपैकी सफारी सूट रेशुच्या नवऱ्याला मांडव परतणी म्हणून हवा होता. तसा त्याने व त्याच्या घरच्यांनी सोनलचे लग्न ठरल्या--पासून तिच्या वडीलांना सांगण्यासाठी लकडा लावला होता पण ती काहीच करु शकत नव्हती.व वडीलांच्या आर्थिक स्थितीची चांगली जाण असल्याने तिने सासरच्या लोकांच्या खूप विनवण्या केल्या. पण हे नराधम काही ऐकून घेण्यास तयार नव्हते. मनाशी निश्चय करून धाड-सान तिने फक्त सूट घेवुन देण्यास वडिलांना सांगितले. प्रभाकररावांना दीड तोळ्याच्या लॉकेटची कल्पना नस-ल्याने व असती तरी त्याची पूर्तता करण्याची शक्ती न-सल्याने लग्नात फक्त त्यांनी रेशूच्या नवऱ्याला सूट घेऊन दिला, झाले! तो व त्याच्या घरचे रागाने धुमसतच घरी परतले. ते रेशु येण्याची वाट पाहात होते. पण लग्नात रेशुला कामाचा जास्त त्रास झाल्याने रेशु आजारी पडली व महिनाभर येऊ शकली नाही, त्यामुळे त्यांच्या धुमसणाऱ्या आगीत तेल ओतले गेले.

ती आल्यापासून 'छळ' या त्यांच्या स्तुत्य प्रकारास प्रारंभ झाला रोज या ना त्या कारणावरुन तिला मारहाण होऊ लागली. ती हे सर्व निमूटपणे सहन करत होती पण सहनशक्तीला काही मर्यादा असतात त्या मर्यादेचा बांध अखेर निखळला.

त्या दिवशी तिला क्षुल्लक कारणाने जास्तच मारहाण झाली. सासू नवरा दोघेही मिळुन मारत होते. मार असह्य झाला तेव्हा तिच्या मनानं बंड केलं व दुसऱ्या क्षणी नवऱ्याच्या हातातली काठी हिसकावून घेतली. सासूला राग असह्य झाला. तिने लगेच रेशूचे तोंड दाबून धरले व तिला खाली पाडले. तिच्या नवऱ्यानेही पुढे येवुन मदत केली. शुभ कामास वेळ नको म्हणून तिच्याच नेसत्या साडीचा पदर तिच्याच गळ्याभवती आवळला. आणि थोड्याच वेळात त्या धडपडणाऱ्या आत्म्याच्या शरीराची धडपड संपली आणि तिचा पुरावा नष्ट व्हावा म्हणून त्या दोघांनीही तिला पेटवून दिली. प्रभाकररावांचं फूल जळून गेलं होतं.

आता शालिनीबाईना कळून चुकलं होतं की खरंच तो रोग होता रेशुला लागलेला. पण तो रोग साधा नव्हे, संसर्गजन्य, महाभयंकर रोग! त्या रोगाने आज आपली रेशु गेली, उद्या दुसरी, परवा तिसरी. हा रोग सुसाट धावेल.

"नाही, नाही. यावर काहीतरी करायला हवं. काही-तरी प्रतिबंधक उपाय शोधुन काढायला हवा. नाहीतर, सर्व रेश्मा सारखी फुलं भर यौवनात कोमेजतील. पण त्या क्षणी त्या काहीच करु शकत नव्हत्या. कारण त्यांच्या डोळ्या पुढं नाचत होतं फक्त रेशूच्या गळ्या भवती आवळलं जाणारं

दीड तोळ्याचं लॉकेट!





# संघर्ष

वाघमारे बी. डी.
१२ वी आर्टस्

भरारी मारीत, आवाज देत, वेगात गाडी निळ्या बगल्यासमोर थांबली. गाडीचा दरवाजा उघडला गेला. रामराव पाटील थोड्याशा रागानेच बाहेर आले. दिवाणखान्यातील ते खुर्चीत रागातच बसले, आणि रागातच गड्याला, खाशाबाला हाक दिली. तसा खाशाबा ताबडतोब दिवाणखान्यात आला. मालक तर रागात होते. हे खाशाबाला त्यांच्या चेहऱ्यावरुन लक्षात आले.

रामराव ओरडले, "कुठे होतास तू ?"

"नाय मालक, मी खालच्या तळमजल्यावर झाडलोट करुन साफसफाई करीत होतो."

"बरं !

"का रे, सुजाता कुटयं ?"

त्याने सांगितले, "परस अंगणातील मागच्या बागेत अभ्यास करतीया."

"बरंय, तिला बोलावून आण."

घाबरत घाबरत खशाबा त्यांच्या कन्येकडे, सुजाताकडे गेला आणि म्हणाला,

"सुजाताक्का, तुम्हासनी मालक बोलवत्यात"

सुजाता सुद्धा घाबरत घाबरत आली, आणि तिने म्हटले,

"काय पप्पा ?"

परंतू पप्पा रागात मनात जळत होते. लाजेने त्यांना बोलता येत नव्हते. परंतू रागाच्या भरातच त्यांनी तिला एक ठेवून दिली.

"सुजाता

"सुजाता, मला कळलंय ते खरं आहे का ?"

शांतपणे सुजाता म्हणाली, "पप्पा, तुम्ही आज सकाळी भडकलात का ? तुम्हाला काय कळलं, ते तरी मला कळू द्या !"

"नीच नालायक कार्टे, तू त्या मुलाशी लग्न करणार आहेस हे खरं आहे का ?"

"होय खरं आहे !"

"तो अत्यंत खालच्या जातीचा आहे. याची तुला जाणीव आहे का ?"

"पूर्ण जाणीव आहे !"

"तरी तू लग्नाला तयार झालीस ?"

"होय"

"तू एक स्त्री असून अशी उत्तरं देताना लाज नाही वाटत ? त्यातल्या त्यात तू श्रीमंताची आहेस याची जाणीव ठेव."

"पप्पा, तुम्ही काय म्हणायचं असेल ते म्हणा, मी त्याच्याशीच लग्न करणार.

"तुम्हीच निवडणूकीच्या काळात सभेतून सांगता की, जातीभेद करु नका, आंतरजातीय विवाह करा. जरा स्पष्ट बोलतेय, माफ करा, खालच्या जातीमधील एखादी स्त्री रूपवान असेल तर तुम्ही तिच्यावर भाळता.सौभा-ग्याच्या दानाचे अमिष दाखवून तिला गुलामासारखे तुम-च्या शेतातील गोठ्यात नेऊन ठेवता ! आता हे खरंच बदललं पाहिजे पप्पा ! नुसत्या गप्पा नकोत."

"कार्टे, सुजे, हे तत्त्वज्ञानाचे धडे घरी नको बापाला शिकवूस."

"पण पप्पा, मी तुमच्या उलट केलेले आहे. मीच स्वत: आंतरजातीय विवाह करण्याचा बेत केला आहे. मीच रवींद्रला भावी पती म्हणून मनात वरलं आहे. तो मग खालच्या जातीचा असो..."

"कार्टे पुढे बोलशील तर जीभ हासडून देईन.लक्षात ठेव. चालती हो येथून. एक क्षणभरही थांबू नकोस. आई वारली म्हणून पोरीचे लाड केले तर भलतेच झाले ! वनवासी कार्टी अशीच असतात !"

सुजाता स्वत:शी पुटपुटली, "आज आई असती तर तिच्याजवळ मन मोकळं करुन बोलता आलं असतं.'

अशा विचारचक्रात गढली गेली असतानाच तिला झोप केव्हा लागली कळले नाही. सकाळी नोकर चहा घेऊन

सुजाला कडेच येत होता. खाशाबाकडे बघत सुजाताने म्हटले, " आज इकडे चहा आणलास ?" चहाची कपबशी सुजाताच्या हातात देत खाशाबा म्हणाला, " तुम्हाला एक बातमी सांगतो सुजाताक्का"

" कोणती बातमी आणि कसली ?" चहाचा घोट पित सुजाताने म्हटले.

" तुमचे डॅडी ( मालक ) महिनाभर गावी गेले आहेत"

" ही बातमी होय ?"

मिश्किलपणे खाशाबा म्हणाला, " सुजाताक्का, मी तुमचा दिल ओळखतो. त्या रवींद्राशिवाय तुमासनी करमत नाही हे मला माहीत आहे. आक्का, तुम्ही कोर्टात जाऊन लग्न उरकून या मालक पुढे काही करणार नाहीत"

नंतरचे दोन दिवस घरातच अगदी उदासपणे घालविले.

रवींद्राचे आई वडील मास्तर होते.हे प्रकरण कळल्या-नंतर रामराव पाटलांनी रवींद्राच्या आई-वडिलांची बदली लांब केली होती. सुजाताला याची काही कल्पनाच नव्हती. तिसऱ्या दिवशी ती आपले दुःख व निश्चय रविंद्राला सांगण्यासाठी म्हणून त्याच्या घरी गेली. पण तेथे कोणी नव्हते. घराला कुलूप होते तिने शेजाऱ्यांकडे चौकशी केल्यानंतर तिला कळले की त्यांची बदली झाली.

काही दिवसानंतर बदलीच्या गावी ती रवींद्राला भेट-ण्यासाठी गेली. मोठ्या उत्सुकतेने व निर्धाराने तिने त्याचा शोध घेतला. पण, पण तिला बातमी कळाली वेगळीच. रवींद्राचा खून झाला होता. तोही दुसऱ्या गांवात. सुजातावर आता आकाशच कोसळलं. तिला आपल्या पित्याचाच केवळ राग आला नाही, तर साऱ्या समाजाचीच तिला घृणा आली.

❊

## शिक्षण क्षेत्रातील अद्‌भुत चमत्कार

**ऋग्वेदातील ' न ऋते श्रान्तस्य सख्याय देवा :– 'जो परिश्रम करतो आणि श्रान्त होतो त्याच्याशीच देवाचे सख्य जडते. बायबलमधील** 'Work is workship '— **श्रम हीच परमेश्वराची पूजा किंवा** ' you shall eat the bread by the sweet of thy brow '— **तू तुझी भाकरी निढळाच्या घामाने मिळवलेलीच खाशील, हे श्रमाचे आणि घामाचे तत्वज्ञान विशद करणारा विचार कदाचित ती आण्णांनी प्रत्यक्षात वाचला नसेल.** ' Education makes the man ' (cawthorn) **किंवा** the only really educated men are self educated' (Bennett) **हा शैक्षणिक स्वावलंबनाचा किंवा 'शिक्षण हा सर्व सुधारणांचा आणि सामाजिक क्रांतीचा पाया आहे.' हा बर्ट्रंड रसेल या तत्वचिंतकाचा सामाजिक जाणिवेचा आणि बांधिलकीचा विचारही त्या त्या ग्रंथातून ती आण्णांनी कदाचित् वाचला नसेल. पण आपल्या उभ्या हयातीच्या जीवन ग्रंथातून आणि स्वानुभवातून जो विचार विशेषतः आचार आणि जे प्रत्यक्ष शैक्षणिक कार्य केले ते पाहता 'ती आण्णा शिक्षणक्षेत्रातील एक अद्‌भुतरम्य चमत्कार होय' असे म्हणण्याचा मोह अनावर होतो.**



# ॥ कविता ॥ ॥ कविता ॥ ॥ कविता ॥

## वाटतं कधी

वाटतं कधी कॉलेज सोडावं
राजकारणात पडावं
भ्रष्टाचार आणि लाचलुचपत यांचा गळा दाबावा
ढोंगी पुढाऱ्यांचा बुरखा फाडावा.
    वाटतं कधी कॉलेज सोडावं
    संपादक व्हावं
    भ्रष्टाचाराचा बुरखा फाडावा
    अन्यायाला वाचा फोडावी
    नाहीच मिळाली दाद तर
    बेभान होऊन भटकावं.
वाटतं कधी कॉलेज सोडावं
खेड्यात जावं
अज्ञान रुढीचा करावा प्रतिकार
मागास बंधु-भगिनींना करावे हुषार
त्यांचा आनंद आपला मानून जीवन कंठावे.
    वाटतं कधी कॉलेज सोडावं
    कुठतरी काम करावं-लग्न करावं
    कामावरुन थकून आल्यावर
    तिनं दिलेलं पाणी प्यावं
    भाकरी होईपर्यंत तिच्या बांगड्यांची
    किणकिण
    पैजणांची छुम छुम ऐकत रहावं.
तिनं केलेली भाकरी
चवीनं खावी
जेवता जेवता तिचं बोलणं गोडीनं ऐकावं
आणि शेवटी.
    तिच्यातच आपलं जीवन समर्पित करावं
    कधी वाटतं कॉलेज सोडावं

**तावरे रविंद्र एकनाथ**
११ वी आर्टस.

## जीवन

मी चालत होतो
चालत रहाणार आहे
चालतच जाणार आहे
डोंगर आले तरी
दऱ्या आल्या तरी
    मागे फिरणार नाही
    चालतच रहाणार आहे
    मी चालतच रहाणार आहे
हा रस्ता खाचाखळग्यातून
दगड धोंड्यातून, काट्याकुट्यातून
दऱ्याखोऱ्यातून जातो आहे.
    चालत रहाणार आहे
    मी चालतच जाणार आहे
चालताना दिसत होते
  एका बाजूला,
    बहरणारे वृक्ष बहरतच होते
  दुसऱ्या बाजूला,
    खुरटणारी झाडे खुरटतच होती
पाहवेना मला ते
    तरी मी चालत आहे
    चालतच रहाणार आहे
    मी चालतच रहाणार आहे
दुखःचा आवंढा गिळत
आनंदाचा आस्वाद घेत घेत
तरी मनात माझ्या प्रश्न एक उभा
खुरटणाऱ्यांना मिळणार कधी मुभा
का ??……हे असेच चालत रहाणार ?

**घुले भगीरथ अदिनाथ**
आकरावीं आर्टस्

## श्रमदान

कैलास दोडके.
१२ वी आर्टस्.

जिवाचे रान करुन
रानातला रस्ता
श्रमदानाने आम्ही
पूर्ण केला
माती खोदताना
उचलुन टाकताना
ज्या झाल्या वेदना......
त्या आम्हास झाल्या
मात्र ज्यांना मातीचा
कधीच स्पर्श नाही
सत्कार त्यांचा झाला
आम्ही फक्त टाळ्या वाजवल्या !

## घात

कु. विमल बनकर
११ वी आर्टस्

एकदा भेटायचंय तुला फार... फार...
रस्त्यात प्रवासात कुठेतरी
लागलीय मला विलक्षण चुटपुट
चेहऱ्याचा तोल सांभळणारं
बाकदार तुझं नाक
विशाल कपाळ, भोकरी डोळे
आभाळागत तुझे ते केस
नव्याकोऱ्या रेशमी वसनातल्या
त्या लांबसडक वेणीवरनं
हळूच फिरवावा वाटतोय
एकदा माझा हात, पण प्रिये
खेळ मांडण्यापूर्वीच तो आटोपून
तू केलास ग माझा घात !

## तू एकटाच

आलीम शेख
११ वी आर्ट

दूर दूर पसरणाऱ्या काटेरी वाटेवर
आसवांची फुले अंथरून
तू एकटाच चालत जा
भीतीने लपेटून जाताना
आपल्याच छातीतल्या आत्म्यास
न भिता साथ देत जा
आणि सूर्य अस्तास जाताना
पिवळे मोती विसरु नकोस
मात्र अंधारल्या डोहात बुडताना
निळे डोळे मिटू नकोस.

## शब्द पाखरांचे

शब्द पाखरांचे आणू नकोस ओठी
कोवळ्या कळ्यांच्या सांगू नकोस गोष्टी...
या साऱ्या जुन्यांना भास आहे नव्याचा
कथा विल्वरांची काचेसमान खोटी···
तू दिल्यास हाका, मी थांवलो हमेशा
फुलांच्या बेड्यांची गाणी नको वांझोटी ··
अश्रूंना माझ्या भरतीचा शाप आहे
फुंकरू नको ग उष:पी ओहोटी ··
नव्या दर्पणांनी तुला रिझविले ग
ह्याच बाजाराची झाली तुला हातोटी ··

रेहाना खान
१२ वी सायन्स

## आठवण

चाळीत वाढलो, गल्लीत खेळलो
वारा पाऊस वगैरे शोधीत राहिलो,
ढगावर बसून राजा बनलो,
शाळेत गेल्यावर विद्यार्थी झालो.
एकदा गुरुजी
वेड्याची गोष्ट सांगत होते.
शिव्या देणे, दगड मारणे वगैरे वगैरे
ऐकून हे सारे अनावर मी हसलो.
तशी गुरूजींनी भडकावली.
रागातच उठलो.
तोपर्यंत दुसरी ठेवून दिली.
तसा मग शांत झालो.
फाटकी विजार वर ओढून
खाली वसत वसत विझून गेलो.
त्यानंतर कधी रागावलोच नाही
शपथ ! अगदी आजपर्यंत.

आलीम शेख
११ वी आर्टस्.





उज्ज्वल यशाचे मानकरी
(प्रथम श्रेणीत महाविद्यालयात प्रथम क्रमांक)



आर.डी. झोपे
१२ वी शास्त्र



कु. निर्मला भुसे
१२ वी कला



बी.एल्. दरेकर
१२ वी वाणिज्य



आंतरशालेय क्रीडास्पर्धा : पुणे जिल्हा
प्राचार्यांच्या समवेत खो खो उपविजयी संघ

## आंतरशालेय क्रीडा स्पर्धा
## ( कनिष्ठ महाविद्यालय )
## पुणे जिल्हा

४ × १०० मी. रिले.
उपविजयी



कबड्डी
उपविजयी



# कार्यवृत्तांत

### जिमखाना

वरिष्ठ महाविद्यालया प्रमाणेच कनिष्ठ महाविद्यालयाने देखील क्रीडा क्षेत्रात आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्पर्धा पावसाळी सत्र व हिवाळी सत्र अशा विभागात घेतल्या जातात. पावसाळी सत्रातील स्पर्धा यावर्षी आमच्याच महाविद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर आयोजित करण्यात आलेल्या होत्या बारामती गटातील खालील स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या संघांनी अजिंक्य पद संपादिले.

१) **खो-खो:** (मुले) बारामती गटांच्या आंतरशालेय खो-खो स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या खो-खो (मुले) संघाने चुरशीच्या लढाईत बलाढ्य शेळगाव विद्यालय शेळगाव या संघाचा दणदणीत पराभव करून अजिंक्यपद संपादिले. पुढे पुणे येथे झालेल्या पुणें जिल्हा आंतरशालेय खो-खो स्पर्धेत उपविजेतेपद संपादिले, त्याचे सर्व श्रेय श्री भुजबळ बी. एल व श्री कदम आर. एन यांच्या पळतीला व श्री पवार वी. एन, जाधव ए.यु. नलगे, भुजबळ व कदम यांच्या आक्रमणाला आहे.

२) **कबड्डी** (मुली) आमच्याच महाविद्यालयाच्या क्रीडांगणा वर बारामती गटाच्या झालेल्या आंतर शालेय कबड्डी (मुली) च्या चुरशीच्या अंतिम स्पर्धेत म. ए सो हायस्कूल बारामती या संघाचा दणदणीत पराभव करुन अजिंक्यपद संपादिले. याचे सर्व श्रेय कु अत्रे, कु. मोकाशी, कु. मुळे यांच्या चढायांना व कु. गुजर, अर्पिता व आनंदी या भगिनींच्या उत्कृष्ट पकडीला आहे पुणे येथे झालेल्या पुणे जिल्हा आंतरशालेय कबड्डी (मुली) स्पर्धेसाठी आमच्या महाविद्यालयाच्या कबड्डी (मुली) संघाची निवड होऊन पुणे जिल्हा कबड्डी (मुली) स्पर्धेत उपविजेते पद संपादिले.

त्याचप्रमाणे हिवाळी सत्रातील क्रीडा स्पर्धा आमच्याच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आल्या होत्या. बारामती गटातील स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने मैदानी स्पर्धेत जनरल चॅम्पियनशिप मिळविली. मैदानी स्पर्धेत प्रामुख्याने खालील खेळाडु यशस्वी झाले.

१) श्री. कदम आर. एन्. १५०० मी. धावणे-प्रथम क्रमांक
२) कु. भापकर एस्. ई. थाळीफेक-प्रथम क्रमांक
३) ४x१०० रिले ( मुले ) प्रथम क्रमांक सर्व श्री. भुजबळ, पवार, जाधव, कुलकर्णी
४) ४X१०० रिले (मुली) प्रथम क्रमांक कु. अत्रे, कु. मोकाशी, कु. गुजर, व कु. गुजर
५) ४X४०० रिले (मुली) प्रथम क्रमांक कु. अत्रे, कु मोकाशी, कु. गुजर, कु. गुजर
३) श्री रणदिवे एच्. डी. गोळा फेक, भाला फेक- व्दि-तीय क्रमांक
७) श्री भुजबळ बी. एल् -उंच उडी-प्रथम क्रमांक, लांब उडी-व्दितीय क्रमांक, तिहेरी उडी-व्दितीय, क्रमांक १०० मि.धावणे व्दितीय क्रमांक
८) पवार बी. एन्.-४०० मि. धावणे-व्दितीय क्रमांक

वरील सर्व खेळाडूंची पुणे येथे झालेल्या पुणे जिल्हा आंतरशालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड होऊन या स्पर्धेत ४x१०० रिले(मुली) हा संघ उपविजयी ठरला.

बारामती येथील शिवसेना व प्रिन्स क्लब यांनी मेरॅथॉन स्पर्धा आयोजित केली होती. या मेरॉथॉन स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या १२ वी आर्टस् मधील खेळाडू श्री पवार एस्. एन् याने प्रथम क्रमांक मिळविला.

या सर्व खेळाडुंचे हार्दिक अभिनंदन.

**प्रा. एस्. बी. इंगवले**
शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख

**प्रा. ए. एस्. किर्णिगे**
चेअरमन जिमखाना विभाग

### वार्षिक स्नेहसंमेलन

या वर्षाचे कनिष्ठ महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन दि. २२, २३ व २४ जानेवारी १९८७ रोजी अत्यंत उत्साहाने पार पडले.

विद्यार्थी-विद्यार्थिनींनी वैयक्तिक व भांगडा, टिपरी इ. सामूहिक नृत्ये, गाणी, (श्री. वसंत सबनीस कृत "चोर आले पाहिजेत",) ही एकांकिका,नकला, यासारखे अनेक कार्यक्रम सादर केले.

विद्यार्थ्यांनी हा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम २३।१।८७ ला सादर केला. तसेच दि २४।१।८७ रोजी पुणे येथील 'सेवन स्टार' चा ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम झाला. स्नेह-संमेलनाची सुरुवात दि. २२।१।८७ ला बातमीपत्र व फिशपाँड वाचन व अल्पोपाहाराने झाली. यावेळी कला व रांगोळी प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. शिवाय फनी गेम्स, फनफेअर मध्ये अनेकविध छोटे छोटे खेळही मांडण्यात आले होते.

एकंदरीत तीन दिवसांचा हा सोहळा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला

प्रा. ए बी. भगाटे
प्रमुख

## प्रगतीची वाटचाल

**परीक्षांचे निकाल :– मार्च १९८६.**

| वर्ग | टक्केवारी |
|---|---|
| १) १२ वी आर्टस्– | ६९.५७ |
| २) १२ वी वाणिज्य– | ८१.५५ |
| ३) १२ वी सायन्स– | ६०.६२ |

**विद्यार्थी संख्या :–**

| वर्ग | तुकड्या | विद्यार्थी | विद्यार्थीनी | एकूण |
|---|---|---|---|---|
| ११ वी कला | ३ | २३१ | ५० | २८१ |
| ११ वी वाणिज्य | ३ | १८७ | ६२ | २४९ |
| ११ वी सायन्स | २ | १७४ | ५३ | २२७ |
| १२ वी कला | ३ | १८३ | ५१ | २३३ |
| १२ वी वाणिज्य | ३ | १८१ | ५३ | २३४ |
| १२ वी सायन्स | २ | १३७ | ४२ | १७९ |
| एकूण | १५ | १०९३ | ३११ | १४०४ |

**प्राध्यापकांची संख्या**

पूर्ण वेळ :– ३४ अर्ध वेळ :– ६

**नवागताचे स्वागत :–**

१) प्रा. आर. एस् पाटसकर ( इंग्रजी )
२) प्रा. एस्. बी. गायकवाड ( इतिहास )
३) प्रा. व्ही. आर. भट्टड ( गणित )
४) प्रा. एच्. बी. घारे ( वनस्पतीशास्त्र )
५) प्रा. कु. टी. टी. निगडे ( प्राणीशास्त्र )
६) प्रा. कु. एस्. व्ही दाते (इलेक्ट्रॉनिक्स, व्होकेशनल कोर्स )
७) श्री व्ही.डी गोलांडे (इलेक्ट्रॉनिक्स, व्होकेशनल कोर्स)
८) प्रा. व्ही. बी. परकाळे ( हिंदी )

**हार्दिक अभिनंदन :–**

१) प्रा. व्ही. बी. परकाळे :– एम्. ए. अर्थशास्त्र
१) प्रा. श्रीमती यु. एम्. चौधरी :– डी. एच्. ई
३) प्रा. बी. एल्. दबडे :– एम्. फिल

## सूची विभाग

**१२ वी परीक्षा मार्च १९८६ मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेंल्या विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे सूची**

### १२ आर्टस्

| अ. न. | मेरीट ऑर्डर नं. | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १) | १ | कु भुसे निर्मला नामदेव |
| २) | २ | श्री. गावडे विष्णुदास पांडुरंग |
| ३) | ३ | कु. जाधव अलका विठ्ठल |
| ४) | ४ | श्री ताकवणे सुनिल नारायण |
| ५) | ५ | कु लाकुळे कल्पना लक्ष्मण |
| ६) | ६ | श्री पवार राजू किसन |
| ७) | ७ | कु. तावरे नंदिनी श्रीपती |
| ८) | ७ | कु थोरात साधना भाऊसाहेब |
| ९) | ८ | कु. मेहता सुनिता प्रकाश |
| १०) | ९ | श्री आचार्य विनय विजयकुमार |
| ११) | १० | बंडगर राजाराम माणिकराव |
| १२) | १० | श्री. खाडे विश्वास महादेव |
| १३) | १० | श्री. पवार दिलीप हरिभाऊ |
| १४) | ११ | श्री. वारवकर ज्ञानदेव अर्जुन |
| १४) | १३ | श्री लोणकर रमेश रामचंद्र |
| १५) | १४ | श्री सोमाणी मिलिंद हिरालाल |
| १६) | १५ | कु चौधरी रेखा मधुसुदन |
| १७) | १६ | श्री कदम शशिकांत भगवानराव |
| १८) | १६ | श्री सूर्यवंशी सुभाष दगडू |
| १९) | १७ | श्री कदम सुधीर भगवानराव |
| २०) | १८ | कु चव्हाण छाया आनंदराव |
| २१) | १९ | कु. कदम सुस्मीता पुरुषोत्तम |
| २२) | १९ | कु. मेहता वृषाली सुधीर |
| २३) | १९ | कु. शहा स्वप्ना मगनलाल |
| २४) | २० | श्री पाटील भिका काशिनाथ |
| २५) | २० | श्री पुरंदरे अनिरूद्ध आनंद |
| २६) | २० | श्री व्होरा प्रीतम विनोद |
| २७) | २१ | श्रीं जगताप प्रमोद बाळासाहेब |
| २८) | २१ | कु कदम सुपर्णा पुरूषोत्तम |
| २९) | २२ | श्रीं पिसाळ बाळू जयसिंग |
| ३०) | २३ | श्रीं आहुजा अनुपकुमार रामप्रकाश |
| ३१) | २३ | श्रीं माळीं नंदकुमार दामराव |
| ३२) | २४ | कु. तावरे मनिषा दिगांबर |
| ३३) | २५ | कु. कुलकर्णी सुनिता हनमंत |
| ३४) | २६ | कु. सोनार कल्पना दत्तात्रेय |
| ३५) | २७ | श्रीं जाधव सुनिल दत्तात्रेय |
| ३६) | २८ | कु राऊत माधवीं जगन्नाथ |

### १२ वी सायन्स

| | | |
|---|---|---|
| १) | १ | श्री. झोपे राजेंद्र ज्ञानेश्वर |
| २) | २ | कु शहा वैशाली जंबुकुमार |
| ३) | ३ | कु. नासिकवाला दुरिया ताहेरभाई |
| ४) | ४ | कु नवाथे चित्रा शरद |
| ५) | ५ | श्री लोंढे श्रीनिवास निळकंठ |
| ६) | ६ | कु. दोशी मंजुषा अरविंद |
| ७) | ७ | कु. नासिवाला मुनिरा सैफुद्दीन |
| ८) | ८ | श्री शहा विशाल जंबुकुमार |
| ९) | ९ | पाटील हर्षवर्धन बाळासाहेब |
| १०) | १० | कु. गुगळे अनिता मोतीलाल |
| ११) | १० | कु. मगदूम सुनिता धनचंद्र |
| १२) | ११ | श्री भोंगळे विजय राणुजी |
| १३) | १२ | कु शहा चंद्रमा बाहुबली |

### १२वी कॉमर्स

| | | |
|---|---|---|
| १) | २ | श्रीं दरेकर बाळासाहेब लक्ष्मण |
| २) | २ | कु. पराडकर बींना श्रींजोत |
| ३) | ३ | कु. तावरे अहिल्या किसन |
| ४) | ४ | कु. शहा लिना विजयकुमार |
| ५) | ५ | श्री. यालकर अनिल सूर्यकांत |
| ६) | ६ | कु. भंडारी गीता नारायण |
| ७) | ७ | श्री. किर्वे नंदकुमार मुरलीधर |
| ८) | ८ | श्री. बारटक्के अनिल श्रीरंग |
| ९) | ९ | श्री. जगताप शरद बुवासाहेब |
| १०) | १० | श्री. डोंबे राजकुमार महारूद्र |
| ११) | ११ | कु पलसे नीलिमा विजयकुमार |
| १२) | १२ | कु. भालेराव सुवर्णा अंबादास |

## शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची सूची.

**१) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १) कु. निगडे संजीवनी त्रिबकराव | १२ वीं सायन्स | रु. ७२० |
| २) श्री गाडे महेश यशवत | १२ वीं सायन्स | रु. ७२० |
| ३) कु. बनसोडे सुषमा विठ्ठल | १२ वीं सायन्स | रु. ७२० |
| ४) श्रीं. झोपे सजय ज्ञनेश्वर | १२ वीं सायन्स | रु. १०२० |
| ५) कु. वाघ मंजुषा रामचंद्र | ११ वी सायन्स | रु. ५४० |

**२) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १) कु. शहा स्वरूपाराणी राजकुमार | १२ वी सायन्स | रु. ३०० |

**३) राष्ट्रीय शिष्यवृत्ती ( जिल्हा परिषद पुणे )**

| | | |
|---|---|---|
| १) श्री. चाहुरे अतुल ज्ञानेश्वर | १२ वी सायन्स | रु. ७२० |

**४) आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती**

| | | |
|---|---|---|
| १. कु. शहा किशोरी सुहास | १२ वी आर्टस्. | रु. ४०० |
| २. कु. दुगम मनीषा विठ्ठल | १२ वी कॉमर्स. | रु. ५०० |
| ३. श्री. खोत अंकुश कृष्णा | १२ वी सायन्स | रु. ४०० |
| ४. श्री पुराणिक केदार सूर्यकांत | १२ वी सायन्स | रु. ४०० |
| ५. श्री. शिंदे अविनाश शिवाजीराव | १२ वी सायन्स | रु. ७०० |
| ६ श्री. घनवट संजय शिवाजी | १२ वी सायन्स | रु. ४०० |
| ७. कु. गुजर आनंदी सुरेश | ११ वी कॉमर्स | रु, ४५० |
| ८ श्री. काळे रतन बबनराव | ११वी आर्टस्. | रु. ३६० |
| ९, श्री. जगताप दशरथ पंढरीनाथ | ११ वी आर्टस्. | रु. ३६० |

१०. श्री. तोंडे संजय तुळशीराम — ११ वी आर्टस्. — रु. ३६०
११. श्री. खारतोडे धनंजय केरबा — ११ वी आर्टस्. — रु. ३६०
१२. श्री. खारतोडे बाळू सोपाना — ११वी आर्टस्. — रु. ३६०
१३. श्री. चांदगुडे किसन रामचंद्र — ११ वी आर्टस्. — रु. ३६०
१४. श्री. ढोरगे मनोज केशव — ११ वी सायन्स — रु. ३६०
१५. श्री. शिंदे राजेंद्रकुमार शिवाजी — ११ वी सायन्स — रु. ६३०
१६. श्री. लावंड नारायण बाळासाहेब — ११ वीं सायन्स — रु. ३६०

**५) श्री. गणेश मनोहर व शंकरराव गणेश दाते ट्रस्ट स्कॉलरशिप**

१. कु. गोसावी गौरी रंगनाथ — १२ वीं कॉमर्स — रु. १५०
२. कु. गोसावीं विजया विनायक — १२ वीं कॉमर्स — रु. १५०
३. कु कुलकर्णी वासंतीं दत्तात्रय — ११ वीं कॉमर्स — रु. ३००

**६) साईबाबा संस्थान शिर्डी शिष्यवृत्ती**

१ कु. मुळे मंजुषा रघुनाथ — ११ वीं सायन्स — रु. १५०

## विशेष पारितोषिके

**१) कॉलेज पारितोषिके**

१. कु शहा किशोरी सुहास — ११ वी कला प्रथम — रु ५१
२. कु शहा स्वरुपाराणी राजकुमार — ११ वी वाणिज्य प्रथम — रु ५१
३. पवार सोमेश्वर रामचंद्र — ११ वी वाणिज्य प्रथम — रु ५१
४. कु भुसे निर्मला महादेव — १२ वी कला प्रथम — रु ५१
५. झोपे राजेंद्र ज्ञानेश्वर — १२ वी शास्त्र प्रथम — रु ५१
६. दरंकर बाळासाहेब लक्ष्मण — १२ वी वाणिज्य प्रथम — रु ५१

**२ डॉ. एस्. ई. गवसणे पारितोषिके**

(१२ वी सायन्सला फिजिक्स, केमेस्ट्री, मॅथेमॅटिक्स व बांयॉलॉजी या चार विषयात मिळून सर्वाधिक गुण)
१. झोपे राजेंद्र ज्ञानेश्वर — रु. ७५
२. कु. नासिकवाला हुरिया त.हेरभाई — रु. ६०

**३) पोपटलाल चंदनमल पारितोषिक**

१. झोपे राजेंद्र ज्ञानेश्वर — १२ वी शास्त्र प्रथम — रु. १०१

**४) 'अस्मिता दर्शन' पारितोषिके**

१. श्री. देशपांडे १२ वी शास्त्र — चित्रकला — रु ११
२. श्री. कल्याण देवकाते १२ वी आर्टस् — कविता — रु. ११

**५) 'सामान्यज्ञानस्पर्धा' पारितोषिके**

१. चाहुरे अतुल ज्ञानेश — १२ वी शास्त्र — रु. ५१
२. चाहुरे सुनील ज्ञानेश — ११ वीं शास्त्र — रु २१

**६) स्नेहसम्मेलन पारितोषिके**

१. कु जगताप हेमलता ११ वीं वाणिज्य — रांगोळी — रु. ११
२. अष्टपुत्रे विनायक ११ वीं शास्त्र — गायन — रु. ११



Anekant Education Society's

# TULJARAM CHATURCHAND COLLEGE, (Baramati)

## Teaching Staff (Senior College) 1986-87

**Marathi**
1. Prof. Dr. D. T. Patil
2. Prof. D. S. Shaha
3. Prof. R. T. Shah
4. Prof. N. G. Londhe

**Hindi**
1. Prof. Dr. K. M. Surve
2. ,, M. B. Kandarkar

**English**
1. Prof. V. V. Upadhye
2. ,, A. K. Isarana
3. ,, K. S. Iyer
4. ,, Miss P. B. Sawant
5. ,, P. D. Wadgaonkar

**History**
1. Prof. A. S. Kininge
2. ,, V. A. Sangai

**Economics**
1. Prof. S. G. Bondre
2. ,, A. B. Desai
3. ,, Dr. V. V. Acharya
4. ,, R. G. Patil
5. ,, R. K. Khade
6. ,, R. W. Joshi
7. ,, Miss J. G. Gandhi

**Politics**
1. Prof. V. D. Kakade
2. ,, A. N. Sawalkar

**Psychology**
1. Prof. S. B. Mane
2. ,, K. M. Jadhav

**Sociology**
1. Prof. S. P. Kadam
2. ,, Sou. Kelkar Prabhune Padmaja

**Geography**
1. Prof. B. P. Joharapurkar
2. ,, M. V. Godse
3. ,, B. P. Godse

**Defence Studies**
1. Prof. P. R. Patil
2. ,, T. K. Khot

**Mathematics & Computer Science**
1. Prof. B. B. Patil
2. ,, Dr. P. D. Wavre
3. ,, M. D. Bhagat
4. ,, Miss V. D. Murthy

**Statistics**
1. Prof. V. G. Padvekar
2. ,, N. J. Subandh
3. ,, A. S. Pandhari
4. ,, R. N. Galpelly (३१-१२-८६ अखेर)
5. ,, Miss S. J. Deshpande

**Chemistry**
1. Prof. R. J. Gandhi
2. ,, Dr. S. B. Kharosekar
3. ,, H. M. Wadde
4. ,, S. G. Tatar
5. ,, A. M. Nemade
6. ,, Miss N. K. Shah

**Physics**
1. Prof. S. R. Nawathey
2. ,, E. K. Patil
3. ,, G. V. Gaikwad
4. ,, M. K. Kokare
5. ,, S. B. Patil
6. ,, R. S. Shinde

**Botany**
1. Prof. Dr. D. K. Magdum
2. ,, Sou. N. A Patil
3. { ,, Dr. N. N. Patil (३०-११-८६ अखेर)
   { ,, C. V. Murumkar (१-१-८७ पासुन)
4. ,, Mrs. S. C. Tidke
5. ,, K. S. Sangar

**Zoology**
1. Prof. V. A. Vakil
2. ,, A. N. Shendge
3. ,, Dr. D. V. Sarwade

**Commerce**
1. Prin. Dr. J. K. Godha
2. Prof. J. B. Magdum
3. ,, P. D. Farsole
4. ,, N. M. Nare
5. ,, R. M. Mişal
6. ,, Mr. A. A. Padhye
7. ,, S. S. Patwardhan
8. ,, D. B. Jagtap
9. ,, A. V. Ingale
10. ,, P. G. Meher
11. ,, M. R. Salve
12. ,, M. H. B. Shaikh
13. ,, S. N. Jagtap
14. ,, S. S. Kapase

**Physical Director**
1. Shri A. S. Meher

A. E. Society's

# Tuljaram Chaturchand College Baramati

## Teaching Staff (Junior College) 1986-87

**Mrathi**
1 Prof. P. B. Ghere
2 ,, T. D. Yadav
3 ,, Smt. U. M. Choudhary

**Hindi**
1 Prof. V. B. Parkale

**English**
1 Prof. B. G. Deshmukh
2 ,, Miss M. D. Vaidya
3 ,, Smt. R. K. Surve
4 ,, R. S. Pataskar

**History**
1 Prof. P. B. Ingawale
2 ,, S. B. Gaikwad

**Economics**
1 Prof. B. L. Dabade
2 ,, S. P. Gholve

**Politics**
1 Prof. D. K. Gurav

**Sociology**
1 Prof. D. P. Wakode

**Psychology**
1 Prof. S. K. Kumbhar

**Defence Studies**
1 Prof. R. M. Bankar

**Geography**
1 Prof. A. B. Bhagate

**Mathematics**
1 Prof. S. S. Kanse
2 ,, V. R. Bhattad (CHB)

**Chemistry**
1 Prof. V. K. Diwan
2 ,, S. S. Shah
3 ,, S. N. Battin

**Physics**
1 Prof. A. B. Patil
2 ,, R. K. Nale
3 ,, S. K. Walunj

**Biology (Botany & Zoology)**
1 Prof. A. J. Alandkar
2 ,, H. B. Ghare
3 { ,, Miss T. T. Nigade (१८-८-८६पासून)
  ,, Dr. A. N. Phad (९-७-८६ पर्यन्त) }

**Commerce**
1 Prof. B. R. Kalange
2 ,, V. S, Bhosale
3 ,, C. B. Choudhari
4 ,, B. B. Nirpankar
5 ,, A. S. Upadhye
6 ,, A. P. Gaikwad

**Vocational Courses**

**Marketing & Salesmanship**
1 Prof. R. D. Rajderkar
2 ,, R. L. Shinkar

**Electronics**
1 Miss S. V. Date
2 Shri V. D. Golande

**Physical Instructor**
1 Shri S. B. Ingawale

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## शिक्षकेतर सेवक वर्ग १९८६-८७

**जनरल ऑफिस**
१) श्री. सुरवडे आर्. एल्. (सुपरिटेंडेट)
२) ,, व्ही, डी. महामुनी (अॅसि. सुपरिटेंडेट)
३) ,, व्ही. जी. कुंभार
४) ,, एस्. एन. कुदळे
५) ,, डी. एल्. पारख
६) ,, आर्. एम. शहा
७) ,, वाय्. के. कुलकर्णी
८) ,, आर. जी. शहा
९) ,, एल. ओ. पडळकर
१०) ,, व्ही. एन. बेलदार

**अकौन्ट ऑफिस**
११) श्री. बी. एम. शहा
१२) ,, जे. पी. दोशी
१३) ,, व्ही बी परकाळे (१३-८-८६ पर्यन्त)

**ग्रंथालय विभाग**
१४) श्री. एस. एन. पाटील (लायब्ररीयन)
१५) ,, जी. डी. चौरे (असि. लायब्ररीयन)
१६) ,, डी. बी. देवकर
१७) ,, पी. ए. साळुंके
१८) ,, ए. जी. मोकाशी

**प्रयोगशाळा सहाय्यक**
१९) श्री. पी. के. मोरे
२०) ,, आर. के. गलांडे
२१) ,, बी. यु. टेके
२२) ,, व्ही. डब्ल्यु देशमुख
२३) ,, ए. एम. शेख (प्लंबर)
२४) ,, इ. एन. शेख (वायरमन)

**शिपाई**
१) श्री. के एस. नेवसे (प्रमुख)
२) ,, एम. ए. सावंत (प्रमुख)
३) ,, जे. व्ही. शहा
४) ,, जे. के उपाध्ये
५) ,, वी. एस. कोथमिरे
६) ,, एस. एस. पळशीकर
७) ,, एम. एम. मोरे
८) ,, डी. डब्ल्यू शहा
९) ,, एम. एस, सुतार
१०) ,, एस. जी. पाटील
११) ,, एस. एम. जगताप
१२) ,, जी. आर. जाधव
१३) ,, बी. जी. लव्हे
१४) ,, एम. बी. जाधव
१५) ,, ए. एम. वागजकर
१६) ,, एस. डी. जगताप
१७) ,, सी. बी. गावडे
१८) ,, ए. जी. खोमणे
१९) ,, ए. बी. चव्हाण
२०) ,, एम. ए. पवार
२१) ,, बी. टी. मदनें (वॉचमन)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयव्दारा संचलित

## अनेकान्त मुद्रणालय व झेरॉक्स सेवा

आपल्या महाविद्यालयाच्या आवारातच सुबक व मोहक छपाईची तसेच झेरॉक्स कॉपीज त्वरित काढून मिळण्याची सेवा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी याचा आवश्य फायदा घ्यावा. अधिक चौकशी महाविद्यालयाच्या कार्यालयात करावी.

*With Best Compliments from*

MANNEYS

BOOK SELLERS

7, Arsenal Road, POONA 411001.

☎ 63683

*With Best Compliments From*

**The Modern Book Stall**

**1 Gen. Thimmayya Road, (East Street)**

**Pune-411001.**

☎ **62597**

प्रकाशक- प्राचार्य डॉ. जे. के. गोधा, एम् कॉम्., बी. ए. एल्एल्. बी, पीएच्. डी.

मुद्रक- अनेकान्त मुद्रणालय, बारामती (पुणे)